म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. नं. ८२

वंदे मातरम्।

# — दरिद्रनारायणाचे चरणीं —

म्हणजेच

[गज]ानन नारायण कानिटकर,
संचालक, देशसेवाश्रम, पुणें,

यांनीं

## विधायक कार्यक्रमाविषयीं

## लिहिलेले लेख व दिलेलीं व्याख्यानें

भाग १ ला

खर्चवेंच जाऊन उरलेली रक्कम स्वावलंबी
कार्याकडे खर्च केली जाईल.

REFBK-0004610

किंमत आठ आणे

म. नि ४८९

वंदे मातरम् ।

# —दरिद्रनारायणाचे चरणीं—

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं. क्र. ४८९०.

## पुष्प पहिलें

REFBK-0004610

## एकाचें बलिदान

देव जवळी, अंतरीं । भेटि नाहीं जन्मवरी ॥
मूर्ति त्रैलोक्यीं संचली । दृष्टि विश्वाची चूकली ॥

—श्रीरामदास

'कायरे सदू, येतोस का पंढरपूरला ? उद्यां एकादशी. पंढरीला जाऊं, विठोबारायाचं दर्शन घेऊ, चंद्रभागेंत स्नान करूं, यात्रेचा सोहोळा पाहून परत येऊं. चल येत असलास तर.' मोरशास्त्री सदूला म्हणाले.

मोरशास्त्र्यांचे हे शब्द कानीं पडतांच सदाशिव जरा विचारांतच पडला. शास्त्रीबोवा व तो एकाच वाड्यांत बिऱ्हाडानें रहात असत. सदूचा त्यांचें संबंधानें मोठा आदर. त्यांचेंही त्याच्यावर तसेंच प्रेम. दोघांच्या वयांत वीस वर्षांचें अंतर. पण मोरशास्त्री सदाशिवाला एखाद्या बरोबरीच्या जिवलग अशा मित्राप्रमाणें वागवीत. मनुष्य मोठा सालस, सरळ, निगर्वी, पण कडक. धर्माचे बाबतींत त्यांना वेडेंवांकडें बिलकुल खपत नसे. त्यामुळें सदाशिव या बाबतींत त्यांचेपाशीं जरा जपूनच बोलत असे. पण—

पण सदाशिवहि कांहीं कमी नव्हता. तत्त्वाचा प्रश्न आला कीं, तोही स्वतःला मोठा कडक समजत असे. तो नुकताच मुंबई विश्वविद्यालयाची शेवटची परीक्षा पास झालेला होता. स्वातंत्र्याचा मोठा भोक्ता. मिल, स्पेन्सर, आगरकर, टिळक यांच्या लेखांचीं पारायणें केलेलीं. स्नेह्यांशीं

वादविवाद करीत असतां अंधश्रद्धा, मतस्वातंत्र्य, परंपरेचा जुलूम, धर्मभोळे-पणा, प्रामाणिक मतभेद, नवा मनु वगैरे शब्दांचा कीस पाडलेला. ‘ कशाला पंढरपूरला जायचें ? आहे काय तेथें ? केवळ टाळकुट्यांचें राज्य ! ’ तो मनाशीं म्हणाला व कांहीं तरी सबब पुढें करून त्यानें तो प्रसंग टाळला. शेवटीं शास्त्रीबोवा एकटेच पंढरपूरला गेले.

* * *

**‘ क्यौं बे लडके ! किदर है तेरा बाप ! साला बदमाष ? ’** एक काळीकभिन्न व्यक्ति उद्गारली. गरीब बिचारा बब्या, ती अक्राळविक्राळ मूर्ति पाहून गर्भगळितच झाला !

सकाळीं सात वाजण्याची वेळ. थंडी मी म्हणत होती. तांबडें लाल आरक्त सूर्यबिंब नुकतेंच क्षितिजावर येऊन आपला रोजचा मार्ग आक्रमा-वयास लागलें होतें. धर्माजी थोरात हातीं गोफण घेऊन माळ्यावरून हुर-ड्याला आलेला शाळू राखीत होता. बब्या व त्याची पाठची बहीण पारी एका वाडग्यांत शिळी भाकरी व लसणाचें तिखट घेऊन न्याहारी करीत होतीं. त्यांची आई चिमाबाई नुकतेंच दळण संपवून ओढ्यावर पाण्यासाठीं जाण्याच्या विचारांत होती. इमानी टिप्या तुळशीवृंदावनाजवळ उभा राहून आलेल्या व्यक्तीच्या अंगावर जोरजोरानें भुंकत होता.

‘ जाफर मिया ! जरा दमा. राखणीवरून इकत्यात येत्याल. जरा ऱ्हयेका की घोंगडीवर. ’ चिमाबाई बाहेर येऊन आर्जवानें म्हणाली व तिनें आंग-णांत घोंगडी टाकली.

‘ सुवरकी अवलाद ! दो बरस हुवे ! अबीतक पैसा देते नही साले ! ’ जाफर गुरगुरला. इतक्यांत धर्माजी तेथें आला. दोघांची खूप बाचाबाची झाली. जाफरनें नाहीं नाहीं त्या शिव्या धर्माजीला हांसडल्या. शेवटीं धर्माजी त्याच्या पायां पडला. जाफरच्या चढावाची ठोकर त्याच्या डोक्यावर बसली. डोक्यांतून रक्ताची धार सुरू झाली. चिमाबाई ओकसाबोकशीं रडूं लागली. मुलांनीं रडून आकांत केला.

**जाफर पठाण धर्माजी थोराताचा सावकार.** दुष्काळाचें नापीक साल. पट्टी भागविण्यासाठीं जवळ छदाम नाहीं. पाटीलकुळकर्ण्यांचा सारखा तगादा

एक गाय व तीनचार शेरड्या विकल्या तरी रक्कम उभी राहीना. जाफर पठाणाकडून बाकीची रक्कम काढल्याशिवाय उपाय नव्हता. रुपयाला दोन आणे व्याज! तें भरतां भरतां डोळे पांढरे झाले. मुद्दलाची फेड लांबच राहिली. पठाणाचा तगादा सुरू झाला. त्यानें हेलपाट्यावर हेलपाटे घातले. भर बाजारांत अब्रू घेतली. आजची त्याची सातवी खेप. पाटीलतलाठी त्याला सामील. जप्तीचें वॉरंट घेऊन तो आज आला होता.

' मिया साहेब! जरा दम खा ना. औंदा समदी रक्कम घेतो बगा. येवढा शाळू निघाला कीं निमी देतों. आखिरीला बाकीची देतो. ठेवीत नाहीं.' धर्माजी गयावया करून पुन्हा म्हणाला.

जाफर ऐकेना. त्याच्या मुलखांत बंड उठलें होतें. तिकडे जाण्याची त्याला घाई झाली होती. त्याला देशावरून तसा निरोप आला होता. चोराच्या हातची लंगोटी! मिळेल तेवढा वसूल करून पसार होण्याचा त्याचा बेत. त्याच्या हातांत सरकारी हुकमाशिवाय दंडुकाही होता. त्याच्या जोरावर त्यानें धर्माजीचीं भांडींकुंडीं व इतर संसाराचें सामान बाहेर काढलें. दावणीचे बैल सोडले. गाडी जोडली. आंत सारा माल भरला. गोठ्यांतली म्हैसही सोडली. तिच्या पाठीवर उरलेला माल लादला व बैलांना आसूड हाणला. धर्माजी मटकन् खालीं बसला. त्यानें दोन्ही हातांनीं बोंब ठोकली. चिमाबाई गाडी-पुढें आडवी पडली. बैलजोडी पुढें पाऊल टाकीना. जाफरनें असुडानें त्यांची पाठ रक्तबंबाळ केली; पण आपल्या अन्नदात्या धनिणीला तुडवून त्या मुक्या जनावरांची पुढें पाऊल टाकण्याची तयारी नव्हती. शेवटीं पठाणानें चिमा-बाईची एक तंगडी धरून तिला फरफरां ओढून बाजूला काढली! टिप्यानें त्याच्या तंगडीचा लचका तोडला. जाफर त्याच्या डोक्यांत आपल्या सोट्याचा तडाखा लगावणार इतक्यांत डोक्याला टापशी बांधलेले व घामाघूम झालेले एक बामणबुवा तेथें धांपा टाकीत आले.

* * *

' चला! पंढरपूर-पंढरपूर-दोन रुपये शीट!' या किंवा अशा शब्दांच्या गोंगाटानें शनवारवाड्यापुढें जमलेल्या उतारूंच्या कानठाळ्या बसत होत्या. ' जय बंभोलानाथ मोटार कंपनी 'च्या मोटारींत फक्त दोन सीट रिकाम्या होत्या. त्याही शेवटीं भरल्या. मोटार चालू झाली. आंत एकंदर

नऊ उतारू बसले होते. पैकीं एक ड्रायव्हरशेजारीं. बाकीचे आंत. या नऊ असामींची वर्गवारी मोठी मजेची होती. एक पोलिस इन्स्पेक्टर. अर्थात् त्यांना ड्रायव्हरशेजारची ऐसपैस अशी आरामाची जागा मिळाली होती. इन्स्पेक्टरसाहेब स्पेशल कामगिरीवर निघाले होते. आंत ड्रायव्हरच्या मागील कोंपऱ्यांत एक पेन्शनींत निघालेले ब्राह्मण सब-रजिस्ट्रार गळ्याला व कानांला गळपट्टा बांधून मोठ्या बंदोबस्तांत बसले होते. त्यांच्याच शेजारीं त्यांचें द्वितीय संबंधाचें कुटुंब. रजिस्ट्रारसाहेबांचा सारा जन्म गोरगरीब शेतकऱ्यांकडून बऱ्यावाईट रीतींनीं पैसा उकळण्यांत गेलेला; तथापि ते, आपली गेल्या पंचवीस वर्षांत एकही पंढरीची वारी चुकली नाहीं, ही मुद्याची बातमी इतर उतारूंच्या कानांवर मोठ्या अभिमानानें घालण्यांत गुंग होऊन गेले होते. त्यानंतर त्यांच्या कुटुंबाशेजारीं रेशीमकांठी धोतराची चौघडी पांघरलेली एक वयस्क विधवा बाई बसली होती. ती त्यांच्या कुटुंबाची आत्या. आत्याबाई स्वतः जवळ बराचसा ऐवज बाळगून होत्या. हरिदासपुराणिकांना त्यांच्याकडून दरसाल मोठी प्राप्ति. दुर्दैवानें बालपणींच वैधव्य आलेलें. तेव्हांपासून देहू, आळंदी, पंढरपूर, गाणगापूर, काशी, प्रयाग, रामेश्वर वगैरे यात्रा करण्यांत आपला काळ घालवून त्यांनीं आपल्या मतानें स्वतःच्या आयुष्याचें सार्थक केलें होतें. त्यांच्या शेजारींच रजिस्ट्रारसाहेबांच्या पहिल्या संबंधापासून झालेला एक आठ वर्षे वयाचा मुलगा बसला होता. समोरच्या बांकावर रजिस्ट्रारसाहेबांच्या समोरच एक प्रशस्त पोटाचे गवळीबोवा चंची सोडून बसले होते. त्यांचा पुण्यास दुधाचा धंदा मोठ्या जोरांत चालू होता. सगळ्या हॉटेलांचें गिऱ्हाईक त्यांच्याकडे. म्युनिसिपॉलिटीचा नळ हा त्यांचा भागीदार. त्याच्या तोंडावर दरसाल दहावीस रुपये फेंकले कीं, तो भरपूर माल पुरवी. त्याच्या मदतीनें गवळीबोवांनीं चांगलीच माया जमविली होती. त्यांचीही दरसालची पंढरीची वारी चुकत नसे. बाकीचे उतारू आपले सामान्यच होते. विलायती फरकॅप घातलेला एक कॉलेजचा विद्यार्थी. त्याच्या शेजारीं एक विड्याचीं पानें विकणारा, खादीची पांढरी टोपी घातलेला मुसलमान व नववे उतारू आपले मोरशास्त्री.

**अरे पण हा आवाज कसला झाला?** 'फडाड फट्–फट्–फट्' पुंडलीक वरदे हारि विठ्ठल! सोलापूर रस्त्याच्या सदतिसाव्या मैलाजवळ

मोटारच्या एका चाकाला पंक्चर झालें. झालें. तास दीड तासाची निश्चिंती झाली. सर्व उतारू मुकाट्यानें खालीं उतरले. इलाजच नव्हता. पांच चार मंडळी, डायव्हर पंक्चर दुरुस्त करण्याच्या उद्योगाला लागला होता त्याच्या भोंवतीं घोळका करून उभी राहिली. इतक्यांत रजिस्ट्रारसाहेबांना चहाची तल्फ आली. इन्स्पेक्टरसाहेबांचें व त्यांचें अगोदरच मेतकूट जमलें होतें. एका साहेबांनीं दुसऱ्या साहेबांस टेकू दिला. ठमाबाईनीं ( आत्याबाईचें नांव ) लगेंच स्टोव्ह पेटवला. अरे पण उपयोग काय ?—दुधाचा फिरकीचा तांब्या उघडला तों काय आश्चर्य! दूध नासलेलें! बंभोलानाथ! मोठेंच संकट. शेवटीं उभयतां साहेबांचें वॉर कौन्सिल भरलें. सर्व उतारूंत आमचा मोरशास्त्री गरीब दिसला. त्याला हुकूम सुटला. शास्त्रीबोवांस मनाविरुद्ध चहासाठीं दूध आणण्याची स्पेशल कामगिरी पतकरणें भाग पडलें. त्यांनीं प्रथम पुष्कळ ताणून धरलें. पण उभयतां साहेब कसले ऐकतात ! त्यांनीं त्यांची खूप खरडपट्टी काढली. बेचाळीस कुळ्या उद्धरल्या. शेवटीं तिसरे साहेब--ड्रायव्हरसाहेब--मध्यें पडले. स्पेशल ड्यूटी बजावली नाहीं तर मध्येंच सोडून देण्याचा त्यानें धाक घातला. शेवटीं पंढरी बुडेल या धाकानें शास्त्र्यानें मुकाट्यानें शेजारच्या वाडीचा रस्ता सुधारला. ते वाडींत पाऊल टाकण्याला व जाफर पठाण चिमाबाईची तंगडी धरून फरफटत ओढीत नेण्याला एकच गांठ पडली......तो देखावा पाहून ब्राह्मणाच्या काळजाचें पाणी झालें !

* * *

**आर्देसर इराणी व सदाशिव यांची कॉलेजांतली गट्टी.** आर्देसरची लोणी काळभोरजवळ उंसाची अफाट शेती होती. मोरशास्त्री पंढरीला गेले, त्याच्याच दुसऱ्या दिवशीं आर्देसर सदाशिवाला आपल्या शेतावर घेऊन गेला. सबंध दिवस दोघांनीं मोठ्या मजेंत घालविला. गुऱ्हाळाचा मोसम. ताजा रस, कढईतील गुळावरची खमंग साय, ताजा हुरडा, कोवळा हरबरा व हिरव्या गार गव्हाच्या लुसलुसीत ओंब्या, दाट दूध, विहिरींत मनसोक्त डुंबणें. या सर्वांवर आर्देसरच्या बहिणीनें—शिरीननें—आपल्या कर्णमधुर फ्ल्यूटवादनानें कळस केला. वेळ हां हां म्हणतां निघून गेला. सायंकाळीं आर्देसरचा निरोप घेऊन सदू परतला. मुंढव्याजवळ जेमतेम येतो तों काय

चमत्कार ! एकाएकीं ढग चारी बाजूंनीं जमून आले. दिशा धुंद झाल्या. काळाकुट्ट अंधार पडला. विजांचा लखलखाट व मेघांचा कडकडाट सुरू झाला. मुसळधार पाऊस कोसळला. गारांनीं नको नको असें केलें. पाणीच पाणी. त्यांत एक गोष्ट बरी झाली कीं, रस्त्याजवळच एक मारुतीचें जुनें देऊळ होतें त्यांत सदूला आसरा घेतां आला. पाऊस थांबण्याचा रंग दिसेना. थांबला तरी वाटेंत दोन चार नाले. त्यांना पूर येणार ही गोष्ट हमखास. पलीकडे कसलें जातां ? शेवटीं सदूनें पोक्त विचार केला. देवळांत शिरून एका कोपऱ्यांत सायकल ठेवून तिला कुलूप ठोकलें व ओव्हरकोट हातांत घेऊन तो सभामंडपाची पायरी चढतो तों—

**पंढरीचा वास, चंद्रभागें स्नान । आणिक दर्शन विठोबाचें ।।**
**हेंचि मज घडो जन्मजन्मांतरीं । मागणें श्रीहरी दुजें नाहीं ।।**
**सदा मुखीं नाम संतांचें दर्शन । जनीं जनार्दन ऐसा भाव ।।**

हा अभंग कोणी तरी सुस्वर गळ्यानें घोळून घोळून म्हणतांना त्याच्या कानीं आला. पुंगीच्या नादाचा अस्सल नागावर परिणाम होतो तसा त्या अभंगाचा सदूवर झाला. एक सत्तर वर्षांची म्हातारी, केंस पिकलेले, मान वांकलेली, एका हातीं चिपळ्या, दुसऱ्या हातांत एकतारी, अशा थाटांत मारुतिरायापुढें घोंगडी टाकून त्यावर बसलेली त्याच्या दृष्टीस पडली. शेजारीं एक ९।१० वर्षांचा मुलगा तिचें भजन ऐकण्यांत तल्लीन होऊन गेलेला त्याला दिसला. सदाशिवही खांबाजवळ ओव्हरकोट टाकून त्यावर भजन ऐकत बसला. त्या तंद्रींत त्याला डुकली केव्हां लागली हें त्याला कळलें नाहीं. सकाळीं उठून पहातो तों देवळांत म्हातारी नाहीं व तो मुलगाही नाहीं ! त्यानें चौकशी केली तेव्हां त्याला कळलें कीं, ती एक आंधळी वारकरीण असून तो मुलगा तिचा नातू होता. दरसाल पंढरपूरची वारी करण्याचा तिचा नियम; तो कधींही टळला नाहीं ! काय असेल तें असो—ईश्वर जाणे—सदूलाही एकवार पंढरीची यात्रा करण्याची इच्छा झाली. तो तडक पुण्याला आला व दुपारीं पंढरपूरच्या मोटारींत बसला.

* * *

'शिव, शिव! पांडुरंगा! काय हें मी पहात आहें?' मोरशास्त्री उद्गारले. त्यांच्या डोळ्यांपुढें चक्कर आली. जाफर पठाणानें आपल्या हाताच्या एका हिसक्यासरशीं त्यांना बाजूला ढकललें. तिरीमिरी येऊन ब्राह्मण खालीं पडला. धर्माजीनें वारा घालून त्याला सावध केलें; त्याच्या कानावर सर्व हकीगत घातली. योगायोगाच्या गोष्टी! शास्त्रीबोवांच्या जानव्याला तीन तोळ्यांचें वळें होतें तें त्यांनीं धर्माजीच्या हवालीं करून कर्ज फेडण्याला सांगितलें. धर्माजीला गहिंवर आला. ऐन वेळीं पांडुरंग प्रत्यक्ष उभा राहिला कीं काय, असें त्याला वाटलें. त्यानें जाफर पठाणाची समजूत काढली. पठाणानें खूष होऊन कागद फाडून टाकला व तो मुकाट्यानें आपल्या रस्त्याला लागला. धर्माजी व चिमाबाईनें मोरशास्त्र्यांच्या पायांवर लोटांगण घातलें. रहाण्याचा त्यांना आग्रह केला; पण त्यांचें सारें लक्ष पंढरीकडे. तांब्याभर दूध घेऊन शास्त्रीबोवांनीं मोटारच्या रस्त्याकडे धूम ठोकली. वाटेंत दोन-तीन ठिकाणीं बाभळीचे भले मोठे कांटे मोडले; पण कशीबशी धांपा टाकीत स्वारी एकदांची रस्त्यावर आली–आली पण उपयोग काय? मोटार केव्हांच पुढें निघून गेली होती!

* * *

विठ्ठल! विठ्ठल! विठ्ठल—पुंडलीक वरदे हारि विठ्ठल—देवळांत काय, रावळांत काय, कीं चंद्रभागेच्या वाळवंटांत काय–हरिनामाच्या गजराची मोरे एकच दंगल उडून गेली होती. त्या हमाम्यांत आमचा सदूही रंगून गेला. त्यानें तेथें नाना प्रकार पाहिले. पांडुरंगाचें दर्शन त्याला मोठ्याच मुष्किलीनें घडलें. बडव्यांचा तो दर्शनाचा व्यापार बघून त्याला किळस आली. चार दोन मठांतही तो जाऊन आला. तेथील प्रकारही त्याला और वाटला. तेथें पाहतो तों मठाधिपति बोवा भोंवतालीं भाविक शिष्यशिष्यिणींचा घोळका जमवून शाब्दिक वेदांताचा कीस काढण्यांत गुंग होऊन गेलेले. भक्तिमार्गाच्या पवित्र पेठेंतही त्याला दंभ, दर्प, अभिमानादिकांचा उग्र भपकारा आल्यावांचून राहिला नाहीं. आपण येथें उगाच आलों असेंही त्याला वाटलें. मोरशास्त्र्यांचा त्यानें पुष्कळ तपास केला, पण व्यर्थ! शेवटीं एकदांची एका मोटारवाल्याकडून त्याला सदतिसाव्या मैलावर एक भटजीबोवा मागें राहिल्याची बातमी लागली. लगेच त्यानें दुसऱ्या दिवशीं

परत फिरून वाटेंत शास्त्रीबोवांना गांठण्याचा बेत केला. तो दिवस व रात्र त्यानें वाळवंटांत निरनिराळे भजन व कीर्तनाचे फड पडले होते तेथें हिंडण्यांत घालविलीं. या फडांत मात्र त्याचें चित्त कांहीं बोवांच्या निरूपणांत चांगलेंच रंगलें. या बोवांत एक वारकरी पदवीधर त्याला आढळले. त्यांच्या निरूपणाचा तर त्याच्या मनावर कांहीं विलक्षण परिणाम झाला. बोवांची मुद्रा मोठी भव्य, शुद्ध व सात्त्विक अशा भावांनीं नटलेली दिसत होती. बोवांनीं शुभ्र खादीचा पोषाख परिधान केलेला होता :—

काया हे पंढरी, आत्मा हा विठ्ठल ।
नांदतो केवळ पांडुरंग ।।

या अभंगावर बोवांचें निरूपण चालू होतें. वर्षाची एक पंढरीची वारी झाली कीं मग वाटेल तें पातक करावयास हरकत नाहीं, अशा पद्धतीनें वागणाऱ्या दांभिकांचा त्यांनीं खरपूस समाचार घेतला. देह हीच खरी पंढरी, तदंतर्भूत आत्मस्वरूप विठोब्बारायाची उपासना करून दया, क्षमा, शांति यांच्या वाळवंटांत रात्रंदिवस हरिनामाचा गजर करीत रहाणें व अशा रीतीनें आत्मसाक्षात्कार करून घेऊन जन्माचें सार्थक करणें हेंच खऱ्या वारकऱ्याचें लक्षण होय. या मुद्याचें बोवांनीं मोठ्या रसाळ वाणीनें अनेक प्राचीन व अर्वाचीन साधुसंतांचे दाखले देऊन विवेचन केलें ! श्रोत्यांच्या नेत्रांतून अश्रूंचा प्रवाह चालू होता. सदाशिवाचेंही हृदय भरून आलें. बोवांच्या पायांवर डोकें ठेवून तो परतला व सकाळीं मोटारींत बसून सदतिसाव्या मैलाजवळ उतरला.

* * *

'**अयाई ! काय हा ठणका ! पांडुरंगा** ! आतां सहन होत नाहीं ! काय तुझ्या मनांत आहे कोण जाणे ! तुझ्या भेटीला म्हणून निघालों व वाटेंतच असा हा अडकून पडलों ! तुझी इच्छा न्‌ दुसरं काय ? ' मोरशास्त्र्यांचे हे शब्द होते. धर्माजीच्या खोपटांतच एका कोपऱ्यांत दोनतीन कांबळीं आंथरून त्यांच्यावर चिमाबाईनें त्यांना निजविलें होतें. मोटार गांठण्यासाठीं धांवपळ करीत लगबगीनें जात असतां त्यांच्या टांचेंत एक मोठा कांटा मोडला होता. त्याचाच पुढें नायटा झाला. पाय हा भप्प सुजला ! अन्न जाईना, झोंप येईना. आज तिसरा दिवस. उभयतां नवराबायकोंनीं त्यांची जिवापाड

शुश्रूषा केली. पाय शेकला, जवसाचें पोटीस बांधलें, नाना प्रकार केले पण उपयोग होईना. शेवटीं त्यांनीं वाडींतल्या न्हाव्याला आणून त्याच्याकरवीं वस्तऱ्यानें जखम फोडली व आंतली सर्व घाण काढून टाकली. तेव्हां कोठें जरा मोरशास्त्र्यांना बरें वाटलें. ठणका कमी झाला, सूज उतरली. त्यांचा तोंडानें सारखा विठोबाच्या नामाचा गजर चालूंच होता. रात्रीं बाराला डोळा लागला—

'अरे पण हें काय? हा प्रकाश कसला? छे! डोळे दिपून गेले बोवा! कांहींच दिसत नाहीं! काय ही प्रभा! काय हें तेज!—अरे, पण मी हें काय पहात आहें?—अहाहा—मोरेश्वरा! धन्य तूं—तुझी पंढरी अंतरली, पण प्रभूनें आज या गरीब शेतकऱ्याच्या—दरिद्रनारायणाच्या खोपटांत येऊन तुला दर्शन दिलें!—अहाहा! काय हें रूप! पुंडलीक वरदे हारि विठ्ठल—ज्ञानदेव तुकाराम—अरे! भगवंतांनीं माझ्या मस्तकावर हात ठेवला—अहाहा! मी हें काय ऐकतों आहें?—जणूं अमृताचा वर्षाव होत आहे—धन्य—धन्य— '

'बाळा! तुझी पंढरी यापुढें येथेंच. माझी—दरिद्रनारायणाची—वसति असलेलें हें लहानसें खेडें—ही वाडी—हेंच तुझें देऊळ व राऊळ—येथेंच तूं रहा—येथील दीन झालेले लोक हीं माझींच स्वरूपें आहेत—त्यांची उपासना—भक्ति—सेवा कर—त्यांना सद्भावनेचें स्नान घालून शुद्ध करून घे—त्यांच्या पुढें ज्ञानाचा धूपदीप पाजळ—राष्ट्रप्रेमाचा शुद्ध, सात्त्विक असा नैवेद्य त्यांना दाखव—साबरमतीची यात्रा कर—आजचें क्षेत्र तें—तेथल्या सत्पुरुषाचे पाय धर—तो तुला आजच्या मनूंत शेतकऱ्याला तारणारें—त्याचें अधःपातापासून—उपासमारीपासून रक्षण करण्यास समर्थ असें सुदर्शनचक्र देईल—तें तुला मार्ग दाखवील—परवां तुझ्या हातून झालेल्या यज्ञानें तूं हजारों पंढरीच्या वाऱ्यांचें पुण्य संपादन केलें आहेस—सुखी हो—माझा तुला आशीर्वाद आहे— '

'पंढरीराया! तुझी आज्ञा शिरसावंद्य आहे.' मोरशास्त्री म्हणाले.

* * *

दुसरे दिवशीं धर्माजीचा निरोप घेऊन परत येण्याच्या बोलीनें मोरशास्त्री साबरमतीला निघून गेले. महात्माजी त्यांची वाटच पहात होते. त्यांनीं त्यांना खादीची दीक्षा दिली. चरख्याच्या मंत्राचा उपदेश केला. महिनाभर ठेवून घेऊन नंतर त्यांस परत जाण्यास परवानगी दिली.

लवकरच मोरशास्त्री व सदाशिव यांची भेट धर्माजी थोराताच्या वाडींत झाली. त्यांना प्रथम सदाशिव ओळखूं शकला नाहीं. कारण त्यांचा वेष आतां अगदीं पूर्णपणें बदलून गेलेला होता. अंगांत खादीचा पांढरा शुभ्र सदरा, डोक्याला खादीची टोपी, गळ्यांत तुळशीची माळ, हातांत खराटा अशा थाटांत शास्त्रीबोवांची स्वारी त्या वाडींतील गलिच्छ रस्ते झाडून साफ करण्यांत गुंतलेली सदाशिवाला दिसली. वाडींतले लोक हा प्रकार पाहून कांहींसे आश्चर्यानें, कांहींसें कुतूहलानें त्यांचे भोंवतीं जमा झाले होते. त्यांस मधून मधून शास्त्रीबोवा स्वच्छता, आरोग्य वगैरेंचें महत्त्व पटवून देण्याचा प्रयत्न करीत होते. पुढें लोकही त्यांच्या बरोबर कामाला लागले. सदाशिवाचें अंतःकरण अष्ट सात्त्विक भावनांनीं उचंबळून आलें. त्याच्या शरिरावर रोमांच उभे राहिले. त्यानें शास्त्रीबोवांचे पाय धरले. त्याच दिवशीं सायंकाळीं त्यानें मारुतिरायाच्या पायांवर हात ठेवून खेड्यांतील झोंपड्यांत वास करणाऱ्या पांडुरंगाची—दरिद्रनारायणाची—यावज्जन्म सेवा करण्याची प्रतिज्ञा केली.

**उदयोन्मुख महाराष्ट्रीय युवका ! ही काल्पनिक कथा तूं खरी करून दाखवशील काय ?**

---

## पुष्प दुसरें

# गांधी कां लेनिन ?

**आज चाळीस वर्षें स्वदेशीचा टाहो चालला आहे,** तरी विशेष उपयोग झालेला दिसत नाहीं. कोणी विचारतील, 'कां हो ? पुन्हां पुन्हां तेंच तेंच काय आम्हांला सांगतां ?' उत्तर—'मनुष्य हा विस्मरणशील आहे, म्हणून त्याला हलवून जागें करावें लागतें. दुसरें असें कीं, तो एक आशाळभूत प्राणी आहे. लोकांनीं काल आपलें ऐकलें नाहीं तर ते आज ऐकतील; आज ऐकावेंसें वाटलें नाहीं तरी उद्यां त्यांच्या मनांत ऐकण्याची इच्छा उत्पन्न होईल ही आशा मनुष्याला सुटत नाहीं. म्हणून हा निगरगट्टपणा आम्ही करतों.'

भर बाजारपेठेंतून तोंडांतून सारखे विलायती चिरुटाच्या धुराचे लोटच्या लोट सोडीत मोठ्या ऐटींत चाललेला व नखशिखांत विलायती कापडानें नटलेला एखादा **कॉलेजांतला तरणाबांड मला चालेल.** लोक त्याच्याकडे पाहून हंसतच असतात; त्यांची टीका चाललीच असते; याला त्या कशाचीही पर्वा नसते; तो आपल्याच मजेंत असतो. तो म्हणतो, 'हें विसावें शतक आहे. **व्यक्तिस्वातंत्र्याचा** हा काल आहे. मी वागावें कसें, काय खावें, काय प्यावें, काय करावें व काय करूं नये, हें माझें मी ठरविण्याचा जन्मसिद्ध हक्क माझा आहे. दुसरा मला कोण शिकविणार?' **ही ऐट मला परवडेल**; मी मनाशीं म्हणेन 'कांहीं हरकत नाहीं. मनुष्य गब्रू आहे! मरतमढें नाहीं. थोडासा बहकला आहे; वांकड्या मार्गावर आहे; आज ना उद्यां वळणावर येईल.' हा चालेल. **मला मरतमढीं नकोत.** याच्यांत जिवंतपणा आहे. हाच उद्यां डोळे उघडतांच एका निमिषार्धांत सर्व विलायती पोषाखाची होळी करून नखशिखान्त खादीनें नटलेला दिसेल व असा एक दिवस येईल कीं, ज्या वेळीं हाच तरुण हातांत राष्ट्राचा तिरंगी, चरखांकित झेंडा धरून पारतंत्र्याच्या 'बॅस्टील' किल्ल्यावर चाल करून जाईल. कारण **याच्यांत स्वाभिमानाची, जिवंतपणाची ज्योत जागृत आहे.**

बॅस्टील किल्ला हा फ्रान्समधील गुलामगिरीच्या अमदानीचें केंद्र होता. गरिबांनीं कष्ट करावेत, मरमर मरावें व श्रीमंतांनीं चैनी कराव्यात, हा प्रकार सररहा चालू होता. एक दिवस असा उजाडला कीं, कंगाल बनलेल्या शेतकऱ्यांना या जुलमशाहीची चीड आली. ते जागे झाले. त्यांना आपल्या अंगीं वसत असलेल्या गुप्त सामर्थ्याची जाणीव झाली. त्यांनीं श्रीमंतांवर हल्ला केला. फ्रान्स देशांत रक्ताच्या नद्या वाहूं लागल्या. धर कीं मार हा क्रम सुरू झाला. Liberty-Equality-Fraternity,' 'स्वातंत्र्य–समता–बंधुभाव' या आरोळ्यांनीं नभोमंडल दुमदुमूं लागलें. शतकानुशतकें फ्रान्समध्यें धुमाकूळ घालणाऱ्या जुलमी कारभाराचा भयंकर सूड घेण्यांत आला. **इतिहासाची पुनरावृत्ति होणारच.** रशियानें याच ग्रंथाची सुधारून वाढविलेली आवृत्ति काढिली. या नवीन तांबड्या लाल ग्रंथाचें पठण आज सर्व जगभर चालू आहे. गरिबांच्या कष्टांवर गब्बर झालेल्या लक्ष्मीपुत्रांची भीतीनें घाबरगुंडी झालेली आहे.

**आज हिंदुस्थानांत काय चालू आहे?** शहरांतील महाल, माड्या, हवेल्या अगर बंगले पहा. शहराबाहेरील फर्ग्युसन कॉलेज पहा. त्याच्याही पलीकडचें तें मुळामुठेच्या पलीकडचें डेक्कन कॉलेज पहा. हवेल्यांत रहाणारे श्रीमंत व कॉलेजांत विद्याभ्यास करणारे विद्यार्थी यांच्याकडे जरा नजर फेका. ते काय खातात, काय पेहेरतात, काय खेळतात, काय बोलतात व काय गातात याचें जरा निरीक्षण करा. आपणांला तें सर्व पाहून थोडासा विचारच करावा लागेल. वकील, डॉक्टर, पेन्शनर, प्रोफेसर, कॉंक्ट्रॅक्टर, व्यापारी वगैरे बड्या बड्या लोकांनीं या महालमाड्या बांधलेल्या आहेत. हे मोटारींतून हिंडतात. परदेशी कापडांनीं नटलेले असतात. संध्याकाळीं टेनिस, क्रिकेट, बॅडमिंटन, पिंगपॉंग, बिलिअर्डस् वगैरे परदेशी महागडे खेळ खेळून जिवाची मुंबई करून घेतात. **यांचे हे लठ्ठ लठ्ठ पगार व पेन्शनें कोठून आलीं?** मोटारीला लागणाऱ्या रकमा यांना कोठून मिळाल्या? यांचे मुलगे, मुली, नातू अगर पणतू ज्या टोलेजंग शाळांतून व कॉलेजांतून शिकतात त्या शाळाकॉलेजांच्या उंचीउंची इमारतींना लागणारा पैसा कोठून आला? हा पैसा कां विलायतेंतल्या मोठमोठ्या अमीरउमरावांनीं अगर मँचेस्टर, बार्मिंगहॅम येथील बड्या बड्या कारखानदारांनीं मनिऑर्डरी करून इकडे पाठविला?

नाहीं नाहीं—आपणांला एकच उत्तर द्यावें लागेल कीं, **हा पैसा विलायतेहून इकडे आला नाहीं.** अप्रत्यक्ष अगर प्रत्यक्ष रीतीनें हिंदुस्थानांतल्या कंगाल शेतकऱ्यानें रात्रंदिवस राबून सरकारला दिलेल्या शेतसाऱ्याच्या उत्पन्नांतूनच हा बहुतेक पैसा खर्च झालेला असतो!

**हा शेतकरी आपला काळ कोणत्या रीतीनें घालवतो?** हा सुखी आहे का? याचीं पोरेंबाळें आनंदांत आहेत का? तीं अंगापिंडानें गुटगुटीत आहेत का? दूधतूप राहूं द्या, पण त्यांना पोटभर अन्न तरी खायला मिळतें का? आंगभर वस्त्र तरी त्यांच्या अंगांवर तुम्हांला दिसतें का? त्यांचीं रहाण्याचीं घरें कशीं असतात? आरोग्यशास्त्राचे नियम लागूं केले तर त्या परीक्षेंत तीं पास होतील काय? त्यांच्या शिक्षणाची काय वाट? हा पठाण अगर भय्या त्यांच्या घराच्या आसपास कां म्हणून घिरट्या घालीत असतो?

प्रत्येक प्रश्नाला नकारघंटा हेंच उत्तर. **हा सुखी नाहीं.** त्याचीं मुलेंबाळें आज कोणत्याही दृष्टीनें पाहिलें तर सुस्थितींत नाहींत; सर्वस्वीं अत्यंत

हीन, दीन व करुणाजनक अशा स्थितींत आज सर्वांचें मायपोट जो शेतकरी तो आहे, ही गोष्ट आपणांला कबूल करावीच लागेल. त्याला लिहितां-वाचतां येत नाहीं; सहीही करणें मुष्कील; कोणींही यावें व त्याला टांग मारावी; दहा रुपये द्यावेत, शंभराचा कागद करून घ्यावा; शेतांत दोन आणे पीक असलें तर दहा आण्यांचा रिपोर्ट मामलेदारानें करावा; पोलीस पाटील, तलाठी, जमादार, फौजदार, मामलेदार, फडणीस, रजिस्ट्रार...... सर्वच याचे यजमान–एक दिवस पट्टीला उशीर झाला कीं, भांडींकुंडीं बाहेर निघालींच म्हणून समजावें. पांढरपेशाला कांहीं एका यत्तेनंतर इन्कम-टॅक्स सुरू; शेतकऱ्याची टीचभर कां जमीन असेना, त्याला पट्टी ही दिलीच पाहिजे; त्याला माफी नाहीं.....अशा कितीक गोष्टी सांगाव्यात... ?

प्रश्न असा आहे कीं, **याला जबाबदार कोण ?** वास्तविक रीत्या रामराज्याची ऐट आणणाऱ्या सरकारावर या अनर्थाचें खापर फुटावयास पाहिजे. पण सरकार बोलूनचालून परकीय ! त्यानें काय म्हणून इतरांची काळजी करावी ? परोपकारासाठीं चार पांच हजार कोस समुद्र ओलांडून साहेबमजकूर इकडे आले नाहींत. त्यांना काय म्हणून दोष द्यावा ? **आपलेंच नाणें खोटें, हींच खरी गोष्ट.** लहान भाऊ कंगाल झाला तर साहजिकच मोठ्या भावाकडे त्याची जबाबदारी येते.

**महात्मा गांधी** आज हेंच म्हणत आहेत–हातापायां पडून शिकलेल्या लोकांच्या विनवण्या करीत आहेत. तुम्ही कोणीही असा--वकील असा, डॉक्टर असा, सरकारी अधिकारी–व्यापारी–कारखानदार–जहागीरदार--इनामदार-संस्थानिक–कोणीही असा, **गांधीजींचें** म्हणणें इतकेंच आहे कीं, शेतकऱ्यांच्या जिवावर तुमचे सर्व व्यवहार व प्रपंच चालले आहेत; तो शेतकरी आज संकटांत आहे. त्याला या नाहीं त्या रीतीनें मदत करणें हें तुमचें आद्य कर्तव्य आहे. **तुमचा मोठेपणा तुमच्या फक्कड पोषाखावर नाहीं**–तो तुमच्या अंतःकरणांतील कृतज्ञताबुद्धि, दया, स्वाभिमान वगैरे सद्‌गुणांवर अवलंबून आहे. आज तो गरीब बिचारा शेतकरी, तो नांगरहाक्या, निजलेला आहे. एक दिवस असा उजाडेल कीं, ज्या दिवशीं तो खडबडून जागा होईल व मग आसपास दृष्टि फेंकून स्वतःला असें विचारील कीं, '**मला माझ्या संकटाच्या दिवसांत कोणीं मदत केली व कोणीं केली नाहीं ?**'

नंतर तो श्रीमंतांकडे, पांढरपेशांकडे येईल व स्पष्ट जबाब विचारील कीं, ‘मित्रा! मी तुला आज शतकानुशतकें झार्ली–पोशीत आलों; दुर्दैवानें मी पागल झालों, झोंपीं गेलों, माणुसकीला पारखा झालों–त्या वेळी, अरे शहाण्या व विद्वान् मनुष्या! **तूं माझ्यासाठीं काय केलेंस**? माझ्या शिक्षणाची काळजी घेतलीस का? माझ्या पोटापाण्याची चिंता त्या वेळीं तूं वाहिलीस का? माझ्या आयाबहिणींनीं फुरसतीच्या वेळीं कष्ट केले, सूत काढून त्याची खादी तयार करविली, तिला तूं आश्रय दिलास का? कां तूं मला--तुझ्या पोशिंद्याला–तुझ्या लहान, अडाणी भावाला व त्याच्या आया-बहिणींना–उपाशी ठेवून परकीयांच्या मालाला आश्रय देऊन त्यांची धन केलीस?’ हा सरळ सवाल तो तुम्हांला टाकील व त्या वेळीं तुम्ही त्याला काय उत्तर द्याल?

**महात्माजी** म्हणतात--अजून वेळ आहे, संधि गेली नाहीं; मुदत संपली नाहीं; वेळींच सावध होऊन, **हे शहरांत राहणाऱ्या शहाण्या व समजूतदार मित्रांनो!** हे अर्थशास्त्रज्ञांनो! हे राजकारणपटु मुत्सद्यांनो! धर्मकारण-कुशल महाशयांनो! तुमच्या गरीब देशबांधवांना व त्याच्या आयाबहिणींना मदत करा. तो अत्यंत सरळ, निष्पाप व सालस अंतःकरणाचा प्राणी आहे. तो तुमचे उपकार—उपकार कसले? कर्तव्य—विसरणार नाहीं. तो **शिवाजी, राणा प्रताप, अकबर** इत्यादि महापुरुषांचा वंशज आहे–दिलदार आहे–**तो तुमची देवाप्रमाणें पूजा करील**—तुमचे जोडे डोक्यावर घेईल—काय सांगूं? तो तुमच्यासाठीं पंचप्राणांच्या आहुतीही देईल—पण हें सर्व केव्हां?— जर तुम्ही वेळींच सावध होऊन आपल्या कर्तव्याला जागलांत तर—

**आणि जर ही सद्बुद्धि तुम्हांला झाली नाहीं तर?—महात्मा गांधी** म्हणतात, तर काय होईल तें मला तरी सांगतां येत नाहीं–तें माझ्या कल्पनाशक्तीच्या बाहेर आहे–**कदाचित् त्या वेळीं मी माझी इहलोकींची यात्रा संपवलेली असेल**–तुम्ही आज नाहीं उद्यां जागे व्हाल अशी चातक पक्षाप्रमाणें वाट पाहून शेवटीं निराशेनें विव्हळ झालेले माझे चर्मचक्षू त्या वेळीं मिटलेले असतील–आणि अशा त्या वेळीं काय होईल तें तुम्हांला, एकच मनुष्य सांगूं शकेल. त्याचें नांव **लेनिन**—

कारण, मनुष्याच्या सहनशक्तीला मर्यादा आहे—तिचा केव्हांना केव्हां तरी अंतकाळ येतोच व नंतर मनुष्याला भान रहात नाहीं. तो एकच वाक्य आपल्याशीं म्हणत असतो--' वाघ ' म्हटलें तरी खातो--' वाघोबा ' म्हटलें तरी सोडीत नाहीं, मग अरे ' वाघ्या ' असें म्हणून एकदांचा त्याचा कपाळमोक्ष कां न करून टाका ?—सुडाचें समाधान तरी होइल—

म्हणून शेवटची प्रार्थना—नम्रतापूर्वक केलेली एकच याचना--ती ही कीं, शिकलेल्या—शहरांत रहाणाऱ्या—चैनींत हवा तसा खर्च करण्याचें सामर्थ्य असलेल्या, स्वतःला सुसंस्कृत म्हणविणाऱ्या देशबंधुभगिनींनीं कमींत कमी इतकी गोष्ट तरी आपल्या गोरगरीब शेतकरी बंधुभगिनींकरितां करावी कीं, त्यांनीं स्वकष्टानें तयार केलेल्या खादीला आश्रय द्यावा. त्यांना येवढा विश्वास वाटावा कीं, आम्ही तयार केलेल्या मालाला गिऱ्हाईक नाहीं म्हणून तो दुकानांत पडून रहाणार नाहीं. आम्ही खादी उत्पन्न करण्याचा अवकाश, कीं, ती घेण्यासाठीं माझा सुशिक्षित बंधु टपून बसला आहे. या एका भावनेनें त्यांनीं निश्चिंत असावें; कमींत कमी इतकें होऊं शकलें तरच शिवाजी-संभाजींच्या व लोकमान्यांच्या नांवाचा जयजयकार करावा. किमानपक्षीं हें झालें तरच त्या महापुरुषांचीं नांवें सांगण्यांत पुरुषार्थ--तरच त्यांचे उत्सव करण्याचा उपयोग--नाहीं तर नाटकांत राणा भीमदेवाचा पार्ट घेऊन आवेशाचीं भाषणें करणाऱ्या नटव्या नटांत व आपणांत काय फरक ?

( पुणें—१९२९ ).



# पुष्प तिसरें

## धर्मगुरूंनो ! शपथ घ्या ! !

देवाच्या सख्यत्वासाठीं । पडाव्या जिवलगांसी तुटी ।
सर्व अर्पावें शेवटीं । प्राण तोही वेंचावा ॥—श्रीसमर्थ.

एक शहर होतें. त्यांत एक ब्राह्मण होता. ब्राह्मण अत्यंत कडक, तपोनिष्ठ, निःस्पृह. खरें वाटेल तें बोलायचा, बोलण्याप्रमाणें चालायचा. आंत एक, बाहेर एक, हें त्याला माहीत नव्हतें. गांवचे लोक महाशिष्ट. देशांतील लोक अडाणी. दोघेही मायावी सुधारणेच्या पाशांत सांपडलेले. त्यांना हा उपदेश करी. प्रथम त्यांना तो गोड वाटला; पण कृतीची गोष्ट आली तेव्हां ते विचकले. त्याला नांवें ठेवूं लागले. पुढें तर त्याला ते त्रास देऊं लागले. 'यथा राजा तथा प्रजा' हीही गोष्ट कांहीं खोटी नाहीं. त्यांचा राजा त्यांच्याप्रमाणेंच त्यांना मिळाला होता. तो प्रजेला सारखा लुटीत होता. प्रजेच्या तें गांवींही नव्हतें. ब्राह्मण राजालाही उपदेश करूं लागला. ब्राह्मणाच्या कटकटीनें राजा व प्रजा दोघांनाही 'नको ही पीडा' असें होऊन गेलें. एक दिवस राजानें ब्राह्मणाची उचलबांगडी केली. दूर शंभर कोसांवर एका अरण्यांत त्याला नेऊन ठेविलें; शहरांत येण्याची बंदी केली.

ब्राह्मणाला दोन मुलगे होते. एक मेघःशाम, दुसरा शामसुंदर. बायको मरून गेली होती. मुलगे मोठे पितृनिष्ठ. ब्राह्मणानें तपश्चर्येला सुरुवात केली. मुलांनीं रात्रंदिवस पित्याची सेवा करावी. त्याच्या तपांत किंचिन्मात्र खंड पडूं नये, असा क्रम सुरू झाला. ब्राह्मण एकच मंत्र जपत होता. 'परमेश्वरा, माझ्या देशाला व राजाला सुबुद्धि दे. त्यांचे डोळे उघड,' हाच तो मंत्र. पहांटे तीनला उठायचा; प्रातर्विधि, स्नानादि आटोपून शंकराची पूजा करायचा; पूजा आटोपून जपाला बसायचा तो रात्रीं दहापर्यंत. तोंपर्यंत तोंडांत अन्न नाहीं कीं पाणी नाहीं. दहानंतर स्नान, संध्या, पूजा, थोडेंसें दुग्धप्राशन, थोडीशी निद्रा की पुन्हां तोच क्रम. झोंपेंत सुद्धां स्वप्नें देशाचींच. ध्यानीं, मनीं, स्वप्नीं

एकच मंत्र. ' शंकरा, देशाला सुबुद्धि दे. राजाचे डोळे उघड. ' हा क्रम बारा वर्षें चालला होता.

**इकडे त्या देशांत दुष्काळ पडला.** प्रजा अगोदरच आळशी व निरुद्योगी झाली होती. त्यांत राजाचा प्रजेला पिळून काढण्याचा क्रम अव्याहत चालू होताच. अन्नावांचून प्रजा तडफडूं लागली. राजाची व राजपुरुषांची चैन चालूंच होती. देव कोपला. पाऊस पडेना. भयंकर महागाई झाली. प्रजा पटापट मरूं लागली. रोगराईचें तो देश माहेरघर बनला. भयंकर दंगेधोपे, लुटालूट सुरूं झाली. कोणी कोणाला विचारीना; धर्मगुरु भ्रष्ट झालेले. त्यांनाही जो तो शिवीगाळ करूं लागला. लोक हवालदील झाले. प्रलयकाळ येतो कीं काय, ही भीति उत्पन्न झाली.

**ब्राह्मणाची खडतर तपश्चर्या चालूंच होती.** शरीर शुष्क काष्ठाप्रमाणें होऊन गेलें. अस्थिपंजर मात्र राहिलें. कैलासपर्वतावर शंकरपार्वती सारीपाट खेळत होतीं. त्यांच्या ही गोष्ट लक्षांत आल्यावांचून कशी राहील? त्यांचें सारें लक्ष त्या ब्राह्मणाकडे होतेंच. पार्वती शंकराला म्हणाली, ' शंकरा, प्रसन्न व्हा. किती दिवस आतां त्या बिचाऱ्याचा अंत पाहणार? ' शंकर म्हणाले, ' पार्वती, जरा थांब. त्याची ठरलेली मुदत संपूं दे. पूर्वसंचिताचा हा सारा खेळ आहे. तो पुरा झाल्याखेरीज मी तरी काय करणार? '

**बारा वर्षें पुरीं झालीं.** आतां ब्राह्मण जागचाही हलूं शकत नव्हता. अन्न, पाणी व निद्रा हीं तर त्यानें केव्हांच सोडून दिलीं होतीं. एकदां जें आसन घातलें तें कायम. भोंवतालची बिलकुल शुद्ध नाहीं. एकच मंत्र, ' शंकरा, माझ्या देशाला सुबुद्धि दे. राजाचे डोळे उघड. ' बिचाऱ्याच्या कुडींत प्राण कसा राहिला होता हें एक शंकरालाच माहीत! मुलांची पितृसेवा चालूंच होती. जी बापाची अवस्था तीच जवळजवळ मुलांची झालेली. फक्त पित्याचें संरक्षण करितां यावें, वनचरांपासून, श्वापदांपासून त्याला कोणताही उपद्रव होऊं नये एवढी व्यवस्था ते करीत. त्याच बेतानें अन्नपाण्याचें सेवन करीत.

**एक दिवस सर्वच देखावा पालटला.** आकाश ढगांनीं भरून आलें. मेघांचा गडगडाट सुरूं झाला. विजा कडकडूं लागल्या. मुसळधार पाऊस पडायला सुरवात झाली. खरोखरच प्रळयकाळ आला असें वाटूं लागलें.

ब्राह्मणाचा झोंपडींतील क्रम चालूंच होता. त्यांत मुळींच खंड नव्हता. झोंपडी एक प्रकारच्या विलक्षण तेजानें भरून गेली. ब्राह्मण तर डोळे मिटून ध्यानस्थच होता. मुलांचे डोळे आरंभीं त्या तेजानें दिपून गेले. किंचित्काळ लोटल्यावर, ते डोळे उघडून पहातात तों काय चमत्कार वर्णावा! पुढें साक्षात् शंकरपार्वती उभे! एका बाजूला षडानन, एका बाजूला गजानन, मागें नंदी, भोंवतालीं गणांचा परिवार. हा प्रकार पाहून मुलगे क्षणमात्र स्तिमित होऊन गेले. आपण जागे आहोंत कां स्वप्नांत आहोंत, हें त्यांस कळेना. त्या दोघांनीं साष्टांग नमस्कार घातले.

**शंकरांनीं त्यांच्या डोक्यांवर हात ठेवला;** त्यांना उठवलें. ब्राह्मणाची ध्यानविसर्जनाची वेळ झाली. त्यानें डोळे उघडले. समोर आदिमाया जगदंबा व त्रैलोक्यतपस्वी शंकर यांच्या मूर्ती पहातांच त्याच्या अंगावर रोमांच उभे राहिले. डोळ्यांतून अश्रूंच्या धारा सुरू झाल्या. त्यानें साष्टांग नमस्कार घातला, व ' दयानिधे, देशाला सद्बुद्धि द्या. राजाचे डोळे उघडा. ' हे शब्द त्याच्या तोंडांतून बाहेर पडले.

शंकरांनीं त्याच्याही डोक्यावर हात ठेवून आशीर्वाद दिला व त्याला उठवून शंकर म्हणाले, ' द्विजश्रेष्ठा, धन्य आहेस तूं. मी प्रसन्न झालों आहें, वर माग. '

**' कैलासाधिपते! देशाला सुबुद्धि द्या. राजाचे डोळे उघडा, '** ब्राह्मण पुन्हां म्हणाला.

' बेटा, भलतीच गोष्ट बोलूं नको. तुला स्वतःला काय पाहिजे तें माग. तुझ्यावर मी प्रसन्न आहें. देशाच्या व राजाच्या पापपुण्यांचा भार देशावर व राजावर आहे. त्यांचा भागीदार तूं होऊं शकत नाहींस. तुला स्वतःला काय हवें तें मागून घे. मी प्रसन्न आहें. काय, तुला द्रव्य पाहिजे? आतां कुबेराला आज्ञा करतांच तुझ्यापुढें द्रव्याच्या राशीच्या राशी येऊन पडतील. काय, तुला अष्टमहासिद्धि हव्यात? तुझ्या तोंडांतून निघण्याचा अवकाश, तुझ्यापुढें त्या हात जोडून उभ्या राहतील. फार काय सांगूं? तुला या सर्व पृथ्वीचें राज्य पाहिजे? माग. तुला या नवखंड पृथ्वीचा अधिपति करून टाकतों. तूं मागायचा अवकाश, तूं म्हणशील तें होईल. '

' देवाधिदेवा! मला द्रव्य नको. सिद्धि नकोत, राज्य तर मुळींच नको. मला या गोष्टी घेऊन काय करायच्या आहेत? मला काय कमी आहे? अंग टाकायला भूमाता आहे; पांघरायला आकाश आहे; वृक्ष फळें देतात, लता फुलें देतात, गंगामाई पाणी देते; तारका प्रकाश देतात, पक्षी माझ्यासाठीं मधुर गायन करतात; रानांतील हरिणबालकें येऊन मातृ-वात्सल्यानें माझें अंग चाटतात—अखिल ब्रह्मांडाशीं मी समरस होऊन गेलों आहें. मला काय कमी आहे? इच्छा एकच, मागणें एकच—माझ्या देशाला सुबुद्धि द्या. राजाचे डोळे उघडा. मला धन नको, दौलत नको, राज्य नको, सिद्धि नकोत. देश शहाणा झाला, उद्योगी झाला, धनधान्या-दिकांनीं समृद्ध झाला, राजा प्रजेवर पुत्रवत् प्रेम करूं लागला कीं, मला सर्व मिळालें. मी राजा झालों व प्रजा मूर्ख व अडाणी राहिली तर त्याचा काय उपयोग? द्यायचें असेल तर हें द्या. नाहींतर माझा हा क्रम चालू आहेच.'

शंकर विचारांत पडले. पार्वतीमाई गोंधळून गेल्या. हा प्रकार आहे तरी काय? या ब्राह्मणाला वेड तर नाहीं लागलें? शंकरांनीं पुन्हां त्याची समजूत घालण्याचा यत्न केला. पण नाहीं, त्याचा आपला एक मंत्र 'माझ्या देशाला सुबुद्धि द्या. राजाचे डोळे उघडा.'

शंकरांनीं पुन्हां विचार केला व ते म्हणाले, 'द्विजवर्या! ठीक आहे. तुझ्या म्हणण्याप्रमाणें होईल. पण एकच अट आहे. मी सांगेन ती गोष्ट कबूल केली पाहिजे.'

'कबूल. आपण सांगाल ती गोष्ट करीन. पण माझी इच्छा पूर्ण करा, ही एकच आपल्या चरणांजवळ माझी मागणी आहे,' ब्राह्मणानें उत्तर दिलें.

शंकर मेघःशाम व शामसुंदर या दोघां भावांकडे पाहून म्हणतात, 'या तुझ्या दोघां मुलांची अग्निकुंडांत तूं आपल्या हातानें पूर्णाहुति दिल्याखेरीज आदिमाया भवानीची तृप्ति होणार नाहीं. आहे या गोष्टीला कबुली?'

ब्राह्मण क्षणमात्र गोंधळला. डोळ्यांतून घळघळां अश्रू वाहूं लागले. पण ही स्थिति फारच अल्पकालपर्यंत टिकली. अष्टसात्त्विक भावांनीं त्याचा देह थरारून गेला. शंकरांना पुन्हां एकदां साष्टांग प्रणिपात करून तो म्हणाला, 'देवा, धन्य आहें मी. अखिल जगतांत मला जी अत्यंत प्रिय वस्तु तिचा यज्ञ करण्याची आपण मला संधि आणून दिलीत. आपले उपकार जन्मो-

जन्मींही फिटणार नाहींत. आपली आज्ञा शिरसामान्य करण्यास मी एका पायावर तयार आहें.'

झाली. सर्व तयारी झाली. शंकरांनीं आज्ञा केली. यक्षकिन्नरांनीं प्रचंड होमकुंड तयार केलें. गणांनीं समिधा आणून आंत टाकल्या. गणपतीनें अग्नि प्रदीप्त केला. शंकर म्हणाले, 'भूदेवा ! तयारी आहे यज्ञाची.'

ब्राह्मणानें मेघःशाम व शामसुंदर या उभयतांना पोटाशीं धरलें. अश्रूंच्या धारा सारख्या चाल्ंच होत्या. मुलगे म्हणाले, 'बाबा, आपण आमच्यासाठीं मुळींच खेद करूं नका. आज आमच्या जन्माचें सार्थक होणार.' धन्य तो पिता! धन्य ते पुत्र!

होमकुंडांतल्या ज्वाला गगनापर्यंत जाऊन भिडल्या. ब्राह्मणानें आपल्या हातानें दोघां मुलांच्या त्यांत आहुति दिल्या. स्वर्गांतून देवांनीं फुलांचा वर्षाव केला. दुदुंभि वाजूं लागल्या. अप्सरा गाऊं लागल्या. आकाशवाणी झाली, 'धन्य, धन्य ती भूमाता कीं जी अशा नररत्नांना प्रसवली!'

अरे, पण हा काय चमत्कार? शंकरपार्वती व त्यांचा तो परिवार कोठें गेला? एकाएकीं त्या सर्व मूर्ती अदृश्य कशा झाल्या? आणि हा आवाज कसला? सनया, नगारे, भेरी, वगैरेंचा दशदिशा दुमदुमून सोडणारा हा प्रचंड निनाद होण्याचें काय कारण? आज चमत्काराचाच दिवस दिसतो! काय हा धुळीचा लोट! हा प्रकार आहे तरी काय?

ब्राह्मणाच्या हें गांवींही नव्हतें. यज्ञकुंडासमोर पद्मासन घालून तो पुन्हां ध्यानस्थ बसला होता. समोर त्या देशचा राजा हात जोडून उभा होता. सभोंवार प्रधानादि सर्व परिवार व हजारों प्रजाजन! याचें एक नाहीं, दोन नाहीं. समाधि उतरण्याचें चिन्ह दिसेना. शेवटीं राजानें साष्टांग नमस्कार घातला. इतरांनींहि तेंच केलें. राजा सद्गदित होऊन म्हणाला, 'गुरुवर्य, दयानिधे! दासाकडे एकदां डोळे उघडून पहा. अपराधी आहें, क्षमा करावी.' ब्राह्मणाची समाधि उतरली. त्यानें नेत्र उघडले. पहातो तों अगदींच निराळा देखावा. अंतर्ज्ञानानें त्यानें सर्व जाणलें.

राजा म्हणाला, 'महाराज, चलावें आतां आपल्या नगराला.' ब्राह्मण म्हणाला, 'राजा, तुझ्या नगरांत माझें आतां प्रयोजन काय आहे? माझें काम झालें. माझे दोघे पुत्र देह विसर्जन करून कृतकृत्य झाले. माझीहि

४६७०

आतां निजधामाला जाण्याची वेळ आलेली आहे. वृथा आग्रह करूं नको. माझा तुला पूर्ण आशीर्वाद आहे.'

राजाचें कांहीं चालेना. निरुपाय होऊन तो व त्याचे प्रजाजन यांनीं पुन्हां एकदां ब्राह्मणाला साष्टांग प्रणिपात केला व सर्व मंडळी कष्टी होऊन परत गेली.

**ब्राह्मणाच्या जीविताचें साफल्य झालें.** त्यानें प्रायोपवेशन सुरू केलें व समाधि लावली. त्याचा आत्मा ब्रह्मांडीं गेला तो कायमचाच!

त्याच्या तपश्चर्येच्या योगानें लोकांवर फार मोठा परिणाम झाला. त्रिविध-तापांनीं ते अगोदरच पोळले होते. त्यांना पश्चात्ताप झाला. ते सद्धर्मानें वागूं लागले. उद्योगी बनले. आपआपसांतले तंटे त्यांनीं मिटविले. जिकडे तिकडे शांततेचें साम्राज्य झालें. चारी वर्ण आपआपलीं कर्तव्यें श्रद्धायुक्त अंतःकरणानें करूं लागले. राजा प्रजेवर पुत्रवत् प्रेम करूं लागला. 'स पिता पितरस्तासां केवलं जन्महेतवः' हें कविकुलगुरूचें वचन त्यानें सार्थ केलें. योग्य वेळीं भरपूर पाऊस पडूं लागला. वृक्ष व लता फलपुष्पादिकांनीं भरून गेल्या. गोधनाची समृद्धि झाली. पृथ्वी धनधान्यादिकांनीं युक्त अशी झाली. पृथ्वीचें नंदनवन झालें.

* * *

**धर्मगुरूंनो!** ही गोष्ट खरी कीं खोटी हें आम्हांला माहीत नाहीं. ती खरी असो, वा खोटी असो, तिच्यांतील तात्पर्य मात्र लक्षांत ठेवा. तें त्रिकालाबाधित असें सत्य आहे. तात्पर्य, श्रीरामदासांच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे हें—'मनीं धरावें तें होतें। विघ्न अवघेंचि निरसूनि जातें। कृपा केलिया रघुनाथें। प्रचीत येते॥' हेंच तें तात्पर्य.

**रघुरायाची कृपा झाल्याशिवाय कोणचीही गोष्ट शक्य नाहीं.** या **दिवसांत** रघुनाथाची कृपा संपादन करण्याचा एकच मार्ग. देशांतील कोट्या-वधि अर्धपोटी नारायणांची सेवा हीच आमची तपश्चर्या! त्यांना साक्षर करणें, त्यांच्या पोटापाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठीं अहोरात्र प्रयत्न करणें, त्यांना औषधपाणी देऊन त्यांच्या हालअपेष्टा कमी करणें, त्यांसाठीं पडेल तो स्वार्थत्याग करण्याची तयारी ठेवणें, प्रसंगीं सर्वस्वाचीही होळी करणें हाच आजचा यज्ञयाग!

बोला, या यज्ञाला तुमची तयारी आहे कां? आमची खात्री आहे कीं, तुम्ही तयार व्हाल. नाहींतर तुमचा व तुमच्या देशाचा सत्यानाश ठरलेला. पण हो, अशी अभद्र कल्पना कराच कशाला? तुम्ही वसिष्ठवामदेवादिकांचे वंशज आहांत. वायां जाणार नाहीं. तर मग अष्टमहासिद्धींची उपेक्षा करून योगदीक्षा घेतलेल्या व घरोघरीं भिक्षा मागणाऱ्या कैलासाधिपति शंकराला साक्षी ठेवून घ्याच शपथ कीं, "आम्ही देशासाठीं व धर्मासाठीं सर्वस्वाची आहुति द्यावयास तयार आहोंत."—**स्वावलंबन**—ता. १।८।२६.

---

## पुष्प चवथें

# आमचा दारूगोळा

राज्य नेलें म्लेंछीं क्षेत्रीं । गुरुत्व गेलें कुपात्रीं ॥
आपण अरत्रीं ना परत्रीं । कोठेंचि नाहीं ॥—श्रीसमर्थ

**त्या दिवशीं मंगळवार होता.** मनांत आलें कीं, आज जोगेश्वरीला जावें. आदिमाता जगदंबा ती. तिच्यापुढें हिंदुस्थानच्या नशिबाचा पाढा वाचावा. तिला दया येईल.

**दुसराही एक हेतु त्यांत होता.** गेलीं दोन तीन वर्षे पुण्यांतील निरनिराळ्या भागांत खादीचा प्रचार केला. राष्ट्राचें काळीज शाबूत आहे अशी खात्री झाली. खादी खपविण्याचा घरोघरीं जाऊन प्रयत्न केला तर ती खपेल कीं नाहीं याबद्दल शंका उरली नाहीं. जाणत्या सुशिक्षितांत अगोदर फारसा विरोध नव्हताच. थोडाबहुत होता तोही जवळ जवळ नाहींसा झालेला आढळून आला. विद्यार्थिवर्ग खादीकडे पहात नव्हता तो हौसेनें खादी वापरूं लागला. यूथ लीगची चळवळ व देशांतील निवळलेलें वातावरण यांकडे याचें श्रेय आहे. बहुजनसमाज अजून उदासीन आहे. पण तोही विरघळण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत.

**पण येवढयानें कसें भागणार?** एकट्या पुणें शहरानें खादी वापरण्याचें मनांत आणिलें तर सबंध हिंदुस्थानला ती पुरवणें आजच्या घटकेला तरी शक्य होणार नाहीं. आमची खात्री आहे कीं, महाराष्ट्राचें काळीज जें पुणें शहर तें खादीशिवाय दुसऱ्या कापडाला शिवणार नाहीं असा दिवस आज न उद्यां उजाडल्याशिवाय राहणार नाहीं. त्या दिवसाची तयारी अगोदरपासून करणें जरूर नाहीं काय? तहान लागल्यावर विहीर खणण्यांत कोणता शहाणपणा? हा मुद्दा लक्षांत आल्यामुळेंच एका मंगळवारीं आम्हीं आपला मोर्चा जोगेश्वरीकडे वळविला.

**'जोगेश्वरीचा व खादीचा काय संबंध?'** असें कोणी विचारतील; त्यांना उत्तर कीं खादीची निपज वाढविण्याचे मार्ग तीन. (१) खेडेगांवांत राहणाऱ्या बेकार लोकांकडून सूत काढून घेऊन तें कोष्टयांकडून विणून घेणें, (२) शेतकरी लोकांनीं शेतीचा धंदा नसलेल्या वेळीं सूत काढून कोष्टयांकडून विणून घेणें व (३) खेडयांत अगर शहरांत राहणाऱ्या सुखवस्तु लोकांनीं रोज अर्धा पाऊण तास सूत काढून तें कोष्टयांकडून विणून घेणें व अशा रीतीनें वस्त्रस्वावलंबनाचा प्रश्न सोडविणें. या तीन मार्गांपैकीं मार्ग नं. १ व २ यांचा आज विचार कर्तव्य नाहीं. ३ ऱ्या मार्गाचाच आज विचार करूं. या मार्गाकडे लोकांचें लक्ष वेधून तो यशस्वी झाला तर खादीचा प्रश्न निम्माअधिक सोडविला जाईल, अशी आमची प्रामाणिक समजूत आहे. कारण आज आपल्या देशापुढें मुख्य प्रश्न सुताचा आहे. मागांचा नाहीं. लक्षावधि हातमाग आज चालू आहेत; पण दुर्दैवाची गोष्ट अशी कीं, त्यांवर बहुतेक विलायती अगर जपानी सूत विणलें जात आहे. या परदेशी सुताची हकालपट्टी करून त्याची जागा पूर्ण स्वदेशी सुतानें भरून काढणें हा आजमितीला आमच्या राष्ट्रापुढें महत्त्वाचा प्रश्न आहे.

**हें महत्त्वाचें कार्य कसें होणार?** कोण करणार? याला एकच मार्ग आहे. आमच्या धर्मगुरूंनीं या प्रश्नाकडे पाहिलें पाहिजे. ते कोणीही असोत. ते हरिदास असोत, पुराणिक असोत, रामदासी अगर वारकरीबोवा असोत, मंत्रगुरु असोत, उपाध्याय असोत, पुरोहित असोत, मौलाना असोत वा मिशनरी असोत, त्यांनीं हा प्रश्न हातीं घेतला पाहिजे. राष्ट्राचा उद्धार, त्याचें स्वावलंबन, त्याचा स्वाभिमान व त्याचें स्वातंत्र्य त्यांचे हातांत आहे.

जोगेश्वरी अगर रामेश्वर या देवालयांत रोज संध्याकाळीं एकत्र जमणाऱ्या पुरोहितवर्गावर तर या बाबतींत मोठी जबाबदारी आहे. कारण एकच—

**राष्ट्राचें फार मोठें मनुष्यबळ स्त्रिया व लहानमोठे विद्यार्थी, बालक व बालिका यांमध्यें सांठलेलें आहे**—दुर्भाग्य हिंदुस्थानचें कीं, आपलें हें बळ राष्ट्रकार्याकडे उपयोगांत आणलें जात नाहीं. दुर्दैवानें पुन्हा असें म्हणावें लागतें कीं, इंग्रजांचे नेमके दुर्गुण तेवढेच अनुकरण्यांत आम्हीं मोठें चातुर्य दाखविलें आहे! कपडे, करमणुकी, खाद्य वगैरे बाबतींत—त्यांच्या पावलांवर पाऊल टाकण्यांत आमचा पुढें पाय!

**मडम पियानो वाजवते**, आमच्या बायकापोरींचे पेट्यांचे वर्ग सुरू झालेच पाहिजेत. साहेब कोट, जाकीट, गळपट्टी घालतो; आम्ही तसें केलें नाहीं तर शिवाजीमहाराज काय म्हणतील? जिमखान्यावर टेनिस, क्रिकेट, बिलिअर्डस्, पिंगपाँगच्या मैफली चालू आहेत; आमच्या तरुण पदवीधरांच्या हातांत टेनिसचे झारे दिसले नाहींत तर, शिक्षणाचें चीज काय झालें? गेल्या दीडशें वर्षांत वाघिणीचें दूध कशाला प्यालों? नशीब त्या सीतारामाचें किंवा लक्ष्मीनारायणाचें कीं, आमच्या तरुणतरुणी अजून हातांत हात घालून तुळशीबागब्रेलबागेच्या सभामंडपांत, बँडच्या तालावर बॉल नाचूं लागल्या नाहींत!

**थट्टेचा विषय नव्हे**. आज खरोखरच या दिशेकडे आमचा समाज जाऊं लागला आहे. खडकीच्या लढाईंत बापू गोखला धडाडधूमच्या धडाक्यांत दोन्ही हातांनीं पट्टे चालवीत असतांना इकडे बाजीरावसाहेबांनीं सोंगट्या-गंजिफांच्या दंगलींत गुंग होऊन रहावें, तशांतला प्रकार आज समाजांत—विशेषतः सुशिक्षित समाजांत—सर्रहा मोकाट रीतीनें चालू आहे. जा आणि पहा. खात्री होईल.

हा राष्ट्रीय अधःपात, हा राष्ट्राचा पळ ( Rout ) थांबविण्याचें कार्य आमच्या धर्मगुरूंनीं करावयास नको काय? ही धार्मिक जबाबदारी त्यांचे माथ्यावर नाहीं काय? त्यांच्या पायांचें तीर्थ आजपर्यंत राष्ट्र घेत आलें तें कशासाठीं? लोकांना त्यांनीं मार्ग सांगावा, अंधारांत उजेड दाखवावा यासाठीं, कां यजमानांची मर्जी संभाळून, त्यांचा तालमाल पाहून त्यांनीं पोटाची खळगी भरावी यासाठीं? कधींही नाहीं. **स्वर्गस्थ रामशास्त्री प्रभुण्यांचा**

**इतिहास आम्हांला असें सांगत नाहीं.** त्यांच्या परंपरेचा अभिमान बाळगणारा व तींतच वाढलेला पुरोहितवर्ग असें कसें म्हणूं शकेल? आज राष्ट्र संकटांत आहे, खिंडींत सांपडलेलें आहे; अशा निर्वाणीच्या प्रसंगीं त्यांनीं जरूर पुढें झालें पाहिजे व समाजांतील आबालवृद्धांना मार्ग दाखविला पाहिजे व हीच गोष्ट त्यांचे पुढें मांडण्यासाठीं एका मंगळवारीं आम्ही जोगेश्वरीला गेलों व तेथें जमलेल्या आमच्या धर्मगुरूंच्या—वर्णगुरूंच्या—पायां पडून म्हणालों, '**गुरुवर्य ! पुढें व्हा.**'

**या कार्याचा 'हरि ॐ' आमच्या उपाध्यायांच्या हातूनच झाला पाहिजे.** त्यांना वेळ असतो. त्यांचें पोट कोणत्याही कचेरीवर अगर पेढीवर अवलंबून नसतें. गोमातेची चरबी लावलेल्या सुताचें कापड वापरण्याच्या महापातकापासून त्यांचें रक्षण करणारा चरखा एकीकडे फिरत आहे व दुसरीकडे तोंडानें अस्खलितपणें वेदघोष चालू आहे, असा देखावा ज्या दिवशीं दिसूं लागेल त्याच दिवशीं खरोखर स्वातंत्र्ययुद्धाच्या तयारीला तोंड लागलें असें आम्हांला वाटेल. कारण **आमचा पुरोहितवर्ग आमच्या राष्ट्राचा आत्मा व प्राण आहे.** त्यानें हजारों वर्षांपासून आपल्या तपोबळाच्या प्रभावानें धर्माचें रक्षण केलेलें आहे व पुढेंही करील. किंचित्काळ तो स्वकर्तव्यपराङ्मुख झालेला दिसत असेल, पण ही स्थिति फार दिवस चालणें शक्य नाहीं. वसिष्ठवामदेवांचा तो वंशज आहे. त्या पुण्यपुरुषांचें रक्त त्याच्या नसानसांतून वहातें आहे. त्यांची स्फूर्ति व त्यांची प्रेरणा आजपर्यंत त्यांना अनेक संकटांतून जगवूं शकली आहे. हें सर्व वायां कसें जाईल?


**आणि एकदां पुरोहितवर्ग हालला कीं राष्ट्र हाललें म्हणून समजावें.** विलायतेंतील पुरोहितवर्ग हालला; **चार्लस राजाला राज्याला व मस्तकाला मुकावें लागलें!** इतिहासाची ही साक्ष आहे. क्रांतिदेवतेचा हा मंत्र आहे. पुरोहितांच्या मागोमाग हिंदुस्थानच्या पंधरा कोटि स्त्रिया व त्यांच्या मागून मुलें हा क्रम सुरू झाला कीं, या प्रचंड प्रवाहाला इतरांना अटकाव करणें जड जाईल; त्यांना मस्तक नमवावेंच लागेल—स्वातंत्र्यदेवता प्रसन्न होईल—

**म्हणून पुन्हां एकदां म्हणतों, 'गुरुवर्य! पुढें व्हा व दारूगोळा तयार करा.'**

**कांहींना आमचे शब्द कडू लागले;** पण आनंदाची गोष्ट कीं, अनेकांना ते पटले; त्यांनीं प्रेमानें व सहानुभूतीनें आमचें म्हणणें तरी काय याबद्दल चौकशी केली व आपल कर्तव्य करण्याची तयारी दर्शविली. आज नाहीं उद्यां राष्ट्राचा भाग्योदय होणार अशी आशा कां वाटूं नये?

आमचें म्हणणें इतकेंच–'मागणें लई नाहीं'–पुनर्जन्मावर विश्वास नसतांना सुद्धां तळहातावर शिरें घेऊन देशाच्या स्वातंत्र्यासाठीं पंचप्राणांच्या आहुती देणाऱ्या महायुद्धाच्या काळांतील इंग्रजांचें व त्यांच्या वायकापोरांचें अनुकरण करा. देशाचें ज्यावांचून अडलें होतें, त्या वस्तु म्हणजे–बंदुका व तोफांना जरूर तो दारूगोळा–निर्माण करण्यासाठीं त्यांनीं न भूतो न भविष्यति असे कष्ट केले नाहींत काय? रात्र नाहीं, दिवस नाहीं, गरीब, श्रीमंत, स्त्री, पुरुष वगैरे कांहीं पाहिलें नाहीं. 'दारूगोळा नाहीं तर तोफा, बंदुका व चुलीपुढच्या फुंकण्या या सारख्याच;' अशी बोंब **लॉइड जॉर्ज व किचनेर** यांनीं सर्व देशभर करतांच राष्ट्र पुढें सरसावलें. त्यानें पुढाऱ्यांची आज्ञा पाळली. इंग्लंडचें स्वातंत्र्य कायम राहिलें.

**हातानें काढलेलें सूत हा आज आपला दारूगोळा** आहे. हा उत्पन्न झाला, त्यासाठीं राष्ट्र झटलें तर कापडाच्या बहिष्काराचा प्रश्न सुटेल. खादीचा प्रसार व परदेशी कापडाचा बहिष्कार ही स्वातंत्र्ययुद्धाची तयारी आहे, पहिली पायरी आहे. ही ओलांडून जाण्याची धमक राष्ट्रानें दाखविली तरच पुढच्या पायऱ्या चढून जातां येतील, कापडाच्या बहिष्काराचा प्रश्न सुटेल व स्वातंत्र्य-देवीचें दर्शन होईल.



## पुष्प पांचवें

# पाहिजेत ! साडेसात लक्ष ब्राह्मण पाहिजेत

जेथें पाहें तेथें देवांचे पर्वत ।
पायावीण भिंत तांतडीची ।।—श्रीतुकोबाराय

' **काय, ब्राह्मण पाहिजेत?** आणि ते साडेसात लक्ष? साडेसात लक्ष ब्राह्मण पाहिजेत? आणि ते कशाला आणि कुठें? काय शिंदे-सरकार-सारख्या एखाद्या धर्मनिष्ठ संस्थानिकानें राज्यारोहणानिमित्त ब्राह्मणभोजन घालण्याचें ठरविलें आहे कीं काय?' या लेखाचा आरंभ वाचून कोणीं असे उद्गार काढल्यास नवल नाहीं.

पण नाहीं. कोणी साडेसात लक्ष ब्राह्मणभोजन घालण्याचें ठरविलें असल्या-बद्दल आम्हीं तरी अजून ऐकलें नाहीं आणि तसें असलें तरी त्याकडे लक्ष्य देण्याची आम्हांला जरूरी नाहीं. तरीही आम्ही म्हणतों कीं, 'होय, ब्राह्मण पाहिजेत; आणि तेही साडेसात लक्ष ब्राह्मण पाहिजेत.'

**सवाल मोठा गंमतीचा आहे.** ब्राह्मण हा शब्द ऐकला कीं, भोजनाची आठवण होते. ब्राह्मण हा शब्द कानीं पडतांच 'ब्राह्मणो भोजनप्रियः' हें वाक्य डोळ्यांपुढें चटकन् उभें रहातें आणि यांत कांहीं खोटें नाहीं. ब्राह्मण व भोजन या दोन्ही शब्दांचा तसाच संबंध आहे. अत्यंत निकटचा, अत्यंत जिव्हाळ्याचा असा संबंध आहे. जरा गूढ अर्थानें मात्र या प्रश्नाचा विचार करा.

**चला, आपलें धर्मशास्त्र आपणांस काय सांगतें तें पाहूं.** आपल्या धर्मानें ब्राह्मणांच्या पाठीमागें कोणतीं कामें लाविलीं आहेत? ब्राह्मणांचीं कामें सहाः–(१) अध्ययन, (२) अध्यापन, (३) यजन, (४) याजन, (५) दान आणि (६) प्रतिग्रह. या गोष्टी करील तोच खरा ब्राह्मण. या षट

कर्माचें प्रयोजन काय? अध्ययन कशासाठीं करावयाचें? स्वतः ज्ञानसंपन्न होऊन त्या ज्ञानाचें दान इतरांस करतां यावें म्हणून. यज्ञ कशासाठीं? भगवान् कृष्ण म्हणतात—"**अन्नाद्भवन्ति भूतानि पर्जन्यादन्नसंभवः। यज्ञाद्भवति पर्जन्यो यज्ञः कर्मसमुद्भवः॥**" यज्ञ कशासाठीं करावयाचा? यज्ञ अशासाठीं करावयाचा कीं, अन्नाची उत्पत्ति भरपूर व्हावी. स्वतः ब्राह्मणानें यज्ञ करावयाचा, इतकेंच नाहीं तर तो इतरांकडूनही करावावयाचा. नंतर दान. पुष्कळांची कल्पना ही कीं, ब्राह्मण म्हटला कीं, त्यानें हात पुढें केलाच पाहिजे. पण नाहीं. शास्त्रानें प्रथम दान ही गोष्ट त्याच्या मागें लावली आहे; मग तें विद्यादान असो, अन्नदान असो अगर द्रव्यदान असो. दान करील तरच त्याला प्रतिग्रहाचा अधिकार. **आम्ही दान करण्याचें विसरलों; प्रतिग्रह तेवढाच लक्षांत ठेवला!**

**सारांश, खऱ्या ब्राह्मणाला चवदा विद्या व चौसष्ट कला अवगत असल्या पाहिजेत.** त्यांची माहिती त्याला इतरांना देतां आली पहिजे. त्याची यज्ञाची—त्यागाची—तयारी असली पाहिजे. व हा त्याग इतरांकडून आचरून घेण्याची खुबी त्याला साधली पाहिजे. नंतर दान व शेवटीं प्रतिग्रह म्हणजे भोजन. एवंच ब्राह्मण व भोजन यांचा संबंध येण्यापूर्वीं मध्यें इतक्या पायऱ्या त्यानें ओलांडल्या पाहिजेत. तरच त्याचा प्रतिग्रहावर भोजनावर—हक्क पोहोंचतो; **नाहीं तर 'सेवेविण मोल मागतसे' अशी स्थिति व्हावयाची. ब्राह्मणानें जगावयाचें व मरावयाचें कशासाठीं? त्याचें जगणें व मरणें याचसाठीं कीं, त्यामुळें इतरांना, मनुष्यप्राण्यांनाच काय पण पशुपक्ष्यादिकांना सुद्धां, सुग्रास भोजन, गेला बाजार पोटभर अन्न तरी मिळावें.** ही गोष्ट राष्ट्र ज्ञानसंपन्न व त्यागप्रवण असल्याशिवाय होणें अशक्य. ज्ञान देणें व त्याग शिकविणें हें ब्राह्मणाचें काम व हें काम बंद पडलें कीं, राष्ट्र ठार झालेंच. ब्राह्मणाचा व भोजनाचा असा निकट संबंध आहे. क्षत्रिय म्हटला म्हणजे तलवार डोळ्यांपुढें चमकते. वैश्य हा शब्द ऐकला कीं, संपत्तीची कल्पना डोळ्यांपुढें उभी राहते. शूद्र हा शब्द सेवेची आठवण करून देतो. त्याप्रमाणें प्राणिमात्राचा योगक्षेम—नुसता जिवंत रहाणें या अर्थानें नव्हे, तर तो उत्कृष्ट तऱ्हेनें—चालावा यासाठीं लागणारें ज्ञान ब्राह्मण शब्दानें सुचविलें जातें.

**ठीक. तत्त्वज्ञान पुष्कळ झालें.** आजची गोष्ट बोला. सांगा, तुम्हांला साडेसात लक्ष ब्राह्मण कशाला पाहिजेत तें? असा प्रश्न पुन्हा येणारच. होय. आम्हांला साडेसात लक्ष—नांवाचे नाहींत—तर वरील पद्धतीनें आचरण करण्याची तयारी असलेले ब्राह्मण हवे आहेत. कशाला तें सांगतों.

**परतंत्र हिंदुस्थानास स्वतंत्र करण्यासाठीं आम्हांला इतक्या ब्राह्मणांची जरूरी आहे.** तेवढे मिळाले कीं, बाकी सर्व आपोआप घडून येईल. आज हिंदुस्थान म्हणजे साडेसात लक्ष खेडीं. यांची स्थिति काय आहे हें आतां सर्वांना माहीत झालेंच आहे. प्रत्येक खेड्यासाठीं आम्हांला निदान एक ब्राह्मण तरी हवा. तो जातीनें कोणीही असो; वृत्तीनें व कर्मानें तो ब्राह्मण असला पाहिजे. कारण आतां सत्ययुग राहिलें नाहीं. झांकून ठेवण्यांत अर्थ नाहीं.

**समर्थांच्या** ग्रंथराज दासबोधांतील '**पुढें पुढें तों वर्णसंकर। होणार आहे॥**' या भविष्याप्रमाणें आज परिस्थिति उत्पन्न झाली आहे. म्हणून धर्माज्ञेप्रमाणें वागेल तोच ब्राह्मण असें आम्ही म्हणणार!

**कबूल. पण त्यांनीं खेड्यांत काय करावयाचें?** आणि त्यांनीं खावयाचें तरी काय? शहरांत कोठेंही चार पाट्या टाकल्या कीं, पांच पन्नास रुपड्या मिळतात. कसाबसा कच्च्याबच्च्यांचा निर्वाह होतो. खेड्यांत कोण खायला देणार? आणि त्यांतून आतां सत्य-समाज उठला आहे. त्यांनीं काय तेथें उपाशी मरायचें? हा प्रश्न रास्त आहे; पण त्यालाही उत्तर आमच्या खादीच्याच पोतडींत आहे.

**पहिली गोष्ट ही कीं, आतां तोंडपाटीलकीचे दिवस गेले.** ग्राम-कार्याची आमची पुराणी कल्पना म्हणजे कुठें व्याख्यान देणें; प्रवचन, भजन अगर कीर्तन करणें; पोथी वाचून दाखविणें; एखादें वाचनालय काढणें; फार तर एखादी अर्धी रात्रीची शाळा चालविणें. मुळशी सत्याग्रहानें आमचे डोळे उघडले व चांगलेंच कर्णोत्पाटन केलें. अनुभव असा आला कीं, आमच्या देशांत कोठेंही जा, तात्त्विक वेदांताच्या ज्ञानाची मुळींच कमतरता नाहीं. एखादी मंडईतील भाजीवाली बाईसुद्धां चांगल्या इंग्रजीवाल्या पदवीधराला सांगतां येणार नाहीं असा वेदांत बोलते. मुख्य प्रश्न हा नाहीं.

मुख्य प्रश्न पोटापाण्याचा आहे. दत्त व दादाभाईनीं वर्णिलेल्या कोट्यवधि अर्धपोटी प्रजेस पुरेसें अन्न खाऊं घालण्याची तजवीज करील तोच मनुष्य हा ग्रामसंघटणेचा प्रश्न सोडवील व हिंदुस्थानाला स्वतंत्र करील. मग तो ब्रह्मकुलोत्पन्न टिळक असो, क्षत्रियकुलोत्पन्न विठ्ठलराव शिंदे असो, बनिया गांधी असो, शूद्र असो, अतिशूद्र असो, हसन निजामी मुसलमान असो, वा मुक्तिफौजेचा जनरल बूथ असो. तुकारामबोवांची मेख सारी येथेंच आहे. मुळशीकर मावळे आर्थिक बाबतींत स्वतंत्र व स्वावलंबी असते व आणखी चारदोन वर्षें टिकाव धरण्याची आर्थिक ताकद त्यांचे अंगीं असती तर शेवटपर्यंत मुळशी लढली असती व विजयश्रीनें मावळ्यांनाच माळ घातली असती.

तात्पर्य—खेडेगांवांतील कार्यकर्त्यानें वस्त्रस्वावलंबनाचे पायावर स्वावलंबी ग्रामसंघटनेचा प्रश्न सोडविला पाहिजे. त्यावर त्याचा स्वार्थ व परमार्थ या दोन्हीही गोष्टी अवलंबून आहेत. ( या कार्याच्या तपशिलाचा खुलासा शेवटीं 'स्वावलंबी ग्रामसंघटणा' या लेखांकांत केला आहे. )

---

## पुष्प सहावें

# युवक, फांशी व दरिद्रनारायण

( पुणें–१४।४।१९३१ )

कांहीं ग्रंथ सहेतुक लिहिलेले असतात. उदाहरणार्थ, अंकल् टॉम्स केबिन ही कादंबरी. तिचें पर्यवसान अमेरिकेंतील गुलामांच्या पारतंत्र्याचा नाश होण्यामध्यें झालें. लेखिकेचा हेतु पूर्ण झाला. कार्यकर्त्यांनीं, यापुढें लेख लिहितांना अगर व्याख्यान देतांना हेंच धोरण पुढें ठेविलें पाहिजे.

अमेरिकेंतील गुलामांस मुक्त करण्याचा ज्यानें प्रथम प्रयत्न केला त्यास बंडखोर म्हणून सरकारकडून फांशीं देण्यांत आलें. त्यानें केलेलें कृत्य सरकारच्या दृष्टीनें अत्याचाराचें ठरलें. अत्याचार हा केव्हांही वाईटच; परंतु

अशा नैमित्तिक अत्याचाराच्या मानानें जुलुमी सरकारकडून जुलुमी राज्यपद्धतीच्या रूपानें चोवीस तास होणारा अत्याचार अनेक पटींनीं भयंकर असतो, अशा प्रकारचें मत **महात्मा गांधींनीं** यंग इंडियाच्या एका अंकांत प्रतिपादिलें होतें. देशाच्या हलाखीच्या स्थितीनें अंगाचा भडका उडून त्या संतापाच्या भरांत एखादा अत्याचार करणाऱ्याच्या कपाळीं फांशीची शिक्षा लिहिलेली असते. परंतु दारिद्र्यामुळें अंगांत त्राण नसलेल्या व त्यामुळें इंन्फ्लुएंझासारख्या भयंकर सांथीला बळी पडणाऱ्या साठ लक्ष लोकांच्या मृत्यूला अप्रत्यक्ष रीतीनें कारणीभूत होणाऱ्या राजसत्तेच्या कपाळीं काय लिहिलेलें असतें? जगांतील निरनिराळ्या राज्यक्रांत्यांचे इतिहासच या प्रश्नाचें उत्तर देऊं शकतील.

**भगतसिंगासारख्या** देशभक्ताला पांच अगर दहा मिनिटांची फांशी भोगणें प्राप्त व्हावें ही माझ्या दृष्टीनें अत्यंत खेदाची गोष्ट होय. **भगतसिंग** हा एक अत्यंत थोर दर्जाचा युवक होता. अशा **युवकाचा व दरिद्रनारायणाचा संबंध या पांच मिनिटांच्या फांशीनें येऊं शकत नाहीं; हें सिद्ध करण्यासाठीं** इतिहासाचें थोडेंसें सिंहावलोकन करूं या.

**लोकमान्य टिळक यांनीं** देशांत स्वतंत्र वृत्तीचे व स्वावलंबी बाण्याचे युवक निर्माण करण्यासाठीं न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना केली. मिळतील ते तुकडे पदरांत पाडून घेण्यासाठीं परकीयांच्या तंत्रानें वागणें ही महाराष्ट्राची परंपरा नाहीं. विजापूरच्या सुलतानानें देऊं केलेली जहागिरीची नोकरी नाकारणाऱ्या स्वराज्यसंस्थापक **शिवाजीमहाराजांपेक्षां** दुसरा कोणताही लायक साक्षीदार ही गोष्ट शाबीत करण्याला मिळणार नाहीं हें सत्य **लोकमान्यांनीं** ओळखिलें होतें. त्यांचा हेतु न्यू इंग्लिश स्कूलच्यामार्फत तडीस जाण्याचा संभव दिसेना म्हणून त्यांनीं **केसरी** वर्तमानपत्राच्या द्वारें जास्त व्यापक स्वरूपाची व महाराष्ट्रांतील लक्षावधि युवकांच्या अंतःकरणांवर प्रभुत्व मिळविणारी राष्ट्रीय शाळा काढिली. या पाठशाळेमार्फत स्वराज्यप्राप्तीच्या कामामध्यें युवकांनीं प्रामुख्यानें भाग घेतला पाहिजे, अशी शिकवणूक त्यांनीं महाराष्ट्रांतील युवकांस दिली. गुजराथविद्यापीठांत भाषण करितांना **महात्मा गांधींनींही** हाच संदेश युवकांस सांगितलेला आहे. भावी स्वराज्यांत हिंदी युवकच मोठमोठ्या सरकारी नोकऱ्या मिळविण्यासाठीं अर्जे केल्यावांचून

राहणार नाहींत. त्यांचा तो हक्कच आहे. लोकमान्यांचें म्हणणें इतकेंच होतें कीं, स्वराज्यांत हक्कानें नोकऱ्या मिळविण्यासाठीं पुढें हात करणाऱ्या युवकांनीं, देश स्वराज्यप्राप्ति करून घेण्यासाठीं अटीतटीचा झगडा करण्यांत गुंतला असतांना आपलें कर्तव्य करण्यांत चुकारपणा करितां कामा नये.

महात्मा गांधींही आज तेंच म्हणत आहेत. अशा चुकार युवकांना स्वराज्य-पार्लमेंटचे अध्यक्ष असा सरळ प्रश्न विचारतील कीं, 'युवकांनो, आज तुम्ही कलेक्टर, कमिशनर वगैरेसारख्या नोकऱ्यांसाठीं मागणी करीत आहांत; देश संकटांत होता आणि स्वराज्यप्राप्तीसाठीं 'न भूतो न भविष्यति' अशा प्रकारचा झगडा करीत असतांना तुमच्या मातृभूमीनें तुम्हांला हांक मारली होती. त्या वेळेला तुम्ही कोठें होतां? तुम्ही आपल्या मातृभूमीच्या हांकेला ओ दिली काय? मायभूमीच्या हांकेला ओ देण्याऐवजीं तुम्ही त्या वेळीं बेकन घोकीत होतां. शेक्स्पिअरची घोकंपट्टी करीत होतां. ॲरिस्टॉटलचीं पारायणें करण्यांत गुंतलां होतां. टेनिस, क्रिकेट, पिंगपाँगसारख्या गुलहौशी खेळांत दंग झालां होतां. सेवेवांचून मोल मागण्याचा आज तुम्हांस काय अधिकार आहे?' असा प्रश्न त्या वेळच्या एखाद्या जवाहिरलाल नेहरूनें अथवा सुभाषचंद्र बोसनें युवकांस केला तर त्यांत त्यांची काय चूक होईल? देशांतील युवकांनीं या प्रश्नाचा जरूर विचार केला पाहिजे. अजून वेळ गेलेली नाहीं.

पंचवीस वर्षांपूर्वीं महाराष्ट्रांतील टिळकांनीं एका बंगालचे दोन तुकडे केल्याबद्दल सरकारचे विरुद्ध विलक्षण घडाडीची चळवळ केली. एकराष्ट्रीयत्वाची भावना हीं लोकमान्य टिळकांच्या चळवळीचा जीव कीं प्राण होता. प्रांतिक दुरभिमान हा तर राहोच, परंतु देशहिताच्या बाबतींत अमुक हिंदी अगर अमुक युरोपियन असा भेदभाव त्यांनीं केला नाहीं. बिझांटबाई-सारख्या आंग्ल विदुषीसही त्यांनीं अपूर्व मान देऊन देशहित साधलें. महाराष्ट्रीय युवकांनीं ही गोष्ट केव्हांही विसरतां कामा नये. बंगाली, गुजराथी, पंजाबी वगैरेसारखे प्रांतविषयक शब्द राष्ट्रकार्याचे बाबतींत त्यांनीं विसरले पाहिजेत. त्यांशिवाय यापुढें देशकार्य परिणामकारक रीतीनें होणें अशक्य आहे. ज्याचे अंगीं विभूतिमत्व तो पुढारी. मग तो बंगाली असो, महाराष्ट्रीय असो, पंजाबी असो अगर गुजराथी असो. कर्मधर्मसंयोगानें

महात्मा गांधी यांना अखिल हिंदुस्थानानें हिंदुस्थानचा एकच एक पुढारी हा मान दिलेला आहे. त्यांच्या संबंधीं वेळीं अवेळीं शिष्टाचारास असम्मत अशा भाषेचा उपयोग करून राष्ट्रहितास धक्का पोहोंचविणें केव्हांही योग्य होणार नाहीं.

महात्मा गांधींची आज युवकांच्यापाशीं कोणची याचना आहे? जी भिक्षा लोकमान्यांनीं युवकांच्या पाशीं मागितली होती, त्याच भिक्षेची झोळी आज महात्मा गांधी आधुनिक युवकांच्यापुढें फिरवीत आहेत. एका काळीं लक्ष्मीनारायणस्वरूपी असलेला खेडेगांवांतील शेतकरी आज दरिद्र-नारायणाच्या अवस्थेला पोहोंचलेला आहे. आज तो गाईपेक्षांही गाय बनून गेलेला आहे. दारिद्र्य, उपासमार, रोगराई, कर्जबाजारीपणा वगैरे आपत्ति त्याच्या हात धुवून पाठीस लागलेल्या आहेत. या दरिद्रनारायणाला पुनश्च लक्ष्मीनारायण बनविण्यासाठीं 'हे युवकांनो! तुम्ही यावज्जन्म टिकणारी जिवंत फांशीची शिक्षा पत्करा,' अशी महात्माजींची युवकांना नम्रपणाची प्रार्थना आहे.

लोकमान्यांच्या वेळीं अनेक युवक राष्ट्रमातेच्या हांकेला ओ देऊन पुढें आले व त्यांनीं आपलें कर्तव्य केलें. आज त्या गोष्टीला अनेक वर्षें होऊन गेलीं आहेत. आजच्या घटकेला राष्ट्रकार्याविषयाची कल्पना पूर्वी-पेक्षां पुष्कळच जास्त स्पष्ट रीतीनें युवकांच्या पुढें मांडलेली आहे. अनत्या-चार व दरिद्रनारायणाची सेवा हीं आजच्या राष्ट्रकार्याचीं मूलभूत तत्त्वें आहेत. पस्तीस कोटि लोकांना दोन लाख लोकांकडून गेलेलें राज्य परत मिळविण्याकरितां अत्याचाराची कांस धरावी लागणें म्हणजे मुळ्याची भाजी चिरण्याकरितां भवानी तलवारीचा उपयोग करावा लागण्यासारखेंच आहे. पस्तीस कोटि सुसंघटित लोकांना दोन लाख परकीयांकडून राज्य हस्त-गत करणें म्हणजे तळहाताचा मळ होय. उलटपक्षीं पस्तीस कोटि विस्कळित स्थितींत असलेल्या अजागळ लोकांना हातांत शस्त्रें असून सुद्धां यश मिळणें अशक्य होय, असें आमचें स्पष्ट मत आहे. कॉंग्रेसनें अनत्याचाराचें तत्त्व कबूल करणें व विधायक कार्यक्रमावर प्रामुख्यानें जोर देणें यांतील रहस्य तरी हेंच होय व म्हणूनच तिनें भगतसिंगादिकांच्या उज्ज्वल देशभक्तीची व स्वार्थत्यागाची तारीफ करतांना त्यांच्या अत्याचारी कार्यक्रमाबद्दल स्पष्टपणें

नापसंती दर्शविलेली आहे. ही गोष्ट कॉंग्रेसनें केली नसती तर मात्र ती आपल्या कर्तव्यापासून पराङ्मुख झाली असती, अशी आमची समजूत आहे.

**लोकमान्यांनीं तुरुंगाचा पायंडा पाडला.** आजमितीस कोणीही तुरुंगांत जाऊं शकतो. पोरखेळाइतकी ही गोष्ट सुलभ व रोजच्या परिचयाची होऊन बसलेली आहे. युवकांनीं या कार्यक्रमांत बराच पुढाकार घेतलेला आहे ही आनंदाची गोष्ट होय. **दे. भ. नरीमन, मेहेरअल्ली, ग. वि. केतकर, न. वि. गाडगीळ** यांसारख्या युवकांच्या पुढाऱ्यांस व त्यांच्या साहाय्यकर्त्यांस या बाबतींत जितके धन्यवाद द्यावेत तितके थोडेच आहेत. कांहीं युवकांनीं स्वराज्याच्या लढ्यांत घेतलेला भाग अभिनंदनीय तर खराच, पण एवढ्यानें भागणार नाहीं. **खरें कार्य अजून व्हावयाचें आहे** व तें येरवड्याच्या चार भिंतींच्या आंतील तुरुंगाऐवजीं तीन बाजूनें समुद्र व चवथ्या बाजूला नगराज हिमालय या सीमांनीं मर्यादित अशा प्रचंड तुरुंगांतील सात लक्ष खेडेगांवरूपी कंगालखान्यांत बारान्बारा चोवीस तास राहूनच युवकांनीं केलें पाहिजे.

**हा प्रचंड तुरुंग येरवड्याच्या तुरुंगापेक्षां लक्षपटीनें जास्ती भयंकर आहे.** येरवड्याच्या तुरुंगांतील कैद्यांना सक्तमजुरी करावी लागली, तरी दोन्ही वेळेस डाळ-रोटी व सकाळीं कांजी हक्कानें मिळते. या प्रचंड तुरुंगांतील कैद्यांना तांबडें फुटल्यापासून तों आवशीपर्यंत सोळा तासांची सक्तमजुरी तर करावी लागतेच; पण दोन्ही वेळेला पोटभर अन्नही मिळत नाहीं. येरवड्याच्या तुरुंगांत कैद्यांना धड अंथरूण पांघरूण व कपडा मिळूं शकतो; उपरिनिर्दिष्ट प्रचंड तुरुंगांत कैद्यास फाटक्यातुटक्या मांजरपाटांतच दिवस काढावे लागतात. येरवड्यास खुट्ट झालें कीं, डॉक्टर हातीं थर्मामिटर घेऊन हजर असतो. बाहेरच्या तुरुंगांत कैद्याला नारू, पडसें, खोकला, ढाळ, उलट्या,क्षय,उपासमार वगैरेसारखे कोणतेही रोग झाले तरी त्या बिचाऱ्याची कोणीही वास्तपुस्त करीत नाहींत. म्हणूनच या प्रचंड तुरुंगांतल्या कंगालखान्यांतील अनंत कैद्यांची सेवा करणें म्हणजेच **जिवंत फांशी** अगर **मरण** होय, असें आमचें मत आहे व ही फांशी युवकांनीं पत्करावी अशी **महात्मा गांधींची** इच्छा आहे.

विकाराच्या तडाख्यांत सांपडून भगतसिंगादिकांसारख्यांचें आजपर्यंत रक्त सांडलें तें पुरें झालें. यापुढें अशा हिऱ्यांचें अमूल्य रक्त निष्कारण पांच मिनिटांच्या फांशीनें वायां जाऊं नये, अशी महात्माजींसारख्या पुढाऱ्यांची इच्छा आहे. या रक्ताचा देशाला भरपूर मोबदला मिळाला पाहिजे. तो पांच मिनिटांच्या फांशीनें मिळत नाहीं. तो वर उल्लेखिलेल्या आमरण, जिवंत फांशीनेंच मिळेल असा आमचा भरंवसा आहे.

'पांच मिनिटांची फांशी सोपी आहे' असें म्हणण्याचें धाष्टर्य आम्ही करणार नाहीं; पण जिवंत फांशीच्या मानानें ती मनुष्याला तडकाफडकी या जगांतील अनंत काळज्यांपासून व यातनांपासून मुक्त करिते. दरिद्रनारायणाची सेवा—जिला आम्ही जिवंत फांशी असें म्हणतों ती—पत्करितांना दारिद्र्य, कष्ट, हालअपेष्टा, निराशा, उपहास वगैरे पिशाच्चें रात्रंदिवस दत्त म्हणून पुढें असतात, असा अनुभव आहे व या फांशीला कवटाळून दरिद्रनारायणाला लक्ष्मीनारायणाच्या कोटीस पोहोंचविण्यानें मिळणारें जें स्वराज्य तेंच खरें व टिकाऊ स्वराज्य होईल, अशी आमची समजूत आहे. किंबहुना, देशांतील आबालवृद्धांच्या मेहनतीवांचून एकटे महात्मा गांधी अगर भगतसिंग यांच्या अनत्याचारी अगर अत्याचारी पुण्याईनें मिळालेलें स्वराज्य अंतीं हिंदुस्थानाला लाभदायी होईल असें आम्हांस वाटत नाहीं.

**तात्पर्य**— स्मशानाच्या स्थितीला पोहोंचलेल्या आजच्या खेडेगांवांचें नंदनवनांत रूपांतर करण्यास जरूर ती जिवंत, आमरण फांशी पत्करणाऱ्या युवकांची आज हिंदमातेला अत्यंत जरूर आहे. या फांशीनें आटणारें रक्त हेंच युवक व दरिद्रनारायण यांचीं अंतःकरणें सांधूं शकेल व हा सांधा बसल्याखेरीज हिंदुस्थाननें पूर्ण स्वराज्य मिळविण्याची आशा करणें व्यर्थ होय.



# पुष्प सातवें

# इहलोकींचा स्वर्ग

( स्वावलंबन, १।१।१९२७. )

सूनुस्सच्चरित:, सती प्रियतमा, स्वामी प्रसादोन्मुख: ।
स्निग्धं मित्रमवंचक: परिजनो, नि:क्लेशलेशं मन: ॥
आकारो रुचिर: स्थिरश्च विभवो, विद्यावदातं मुखं ।
तुष्टे विष्टपहारिणीष्टदहरौ संप्राप्यते देहिनाम् ॥

—राजा भर्तृहरी.

इहलोकींचा स्वर्ग म्हणजे काय? या स्वर्गाची कल्पना आरंभीं दिलेल्या भर्तृहरीकृत सुंदर श्लोकावरून येण्यासारखी आहे. सदाचारी पुत्र, प्रेमळ पत्नी, उपयोगी पडणारे मित्र, निष्कपटी नोकर, निश्चिंत मन, सुदृढ शरीर, स्थिर वैभव आणि विद्येच्या योगानें पुनीत झालेली वाणी, एवंगुणविशिष्ट गोष्टींनीं अलंकृत असलेली वास्तु म्हणजेच इहलोकींचा स्वर्ग. या स्वर्गाच्या प्राप्तीकरितां या जगामध्यें आतांपर्यंत अनेकांनीं अनेक खटपटी केलेल्या आहेत. मोठमोठ्या तत्त्वज्ञानविशारदांच्या कल्पनेप्रमाणें जगावयाचें कशाकरितां व मरावयाचें कशाकरितां—तर या इहलोकींच्या स्वर्गाची प्राप्ति व्हावी म्हणून.

प्रत्येक इंग्रज स्वत:च्या घरास अभेद्य असा किल्ला समजतो. या किल्ल्याकडे राजा किंवा प्रजा यांपैकीं कोणींही चुकून वांकडी नजर टाकण्याचें धाडस केलें तर त्याला ती गोष्ट खपत नाहीं. त्याचें कौटुंबिक स्वातंत्र्य हरण करण्याचा जर कोणाकडून प्रयत्न झाला तर तो त्याचें रक्षण करण्यासाठी जिवावर उदार होतो. मयूरकवींनीं म्हटल्याप्रमाणें पारतंत्र्यापेक्षां नरक पुरवला; स्वातंत्र्य म्हणजेच स्वर्ग; ही कल्पना त्याच्या रोमरोमांतून भिनलेली असते. जी स्थिति इंग्रजांची तीच थोड्याबहुत अंशानें इतर पाश्चिमात्यांची.

महायुद्धांत या इहलोकींच्या स्वर्गावर जर्मनांचा घाला आला म्हणूनच फ्रेंच लोकांनीं व्हर्डूनच्या किल्ल्यावर व इतरत्र लक्षावधि लोकांचे बळी दिले. चक्रवर्ती झारच्या जुलुमी अंमलानें या स्वर्गाचें निरयगतींत रूपांतर होऊं लागलें म्हणूनच हजारों रशियन देशभक्तांनीं सैबेरियाचा नरक पत्करला, अगर फांसावर चढून स्वातंत्र्यदेवतेला आपल्या शिरकमलांचा बळी अर्पण केला. देशभक्तांच्या भयंकर कत्तली झाल्या. शेवटीं निकोलस बादशहाला ह्या सर्व पातकांची भरपाई देहदंड देऊनच करावी लागली. जर्मनी, ऑस्ट्रिया, इटली वगैरे देशांचे इतिहास हीच गोष्ट कंठरवानें जाहीर करीत आहेत. सारांश, या क्षणीं तरी मनुष्यमात्राचे प्रयत्न या इहलोकींच्या स्वर्गाचीं द्वारें आपणांस सदैव उघडीं असावींत यासाठीं चालले आहेत.

**हिंदुस्थानची स्थिति काय आहे?** पारलौकिक सौख्याविषयीं प्राचीन व अर्वाचीन कालीं अनेक लहानथोरांनीं अनेक लहानमोठे ग्रंथ लिहिले आहेत. मोठमोठे साधुसंत घ्या, पट्टीचे विद्वान् घ्या अगर मोठ्या भक्तिभावानें हरिनामाचा गजर करणारे हरिभक्तिपरायण घ्या; पारलौकिक स्वर्गाची प्राप्ति कशी होईल, मोक्ष कसा मिळेल, जन्ममरणाच्या फेऱ्यांतून सुटका कशी होईल, याचा बहुतेकांना ध्यास लागलेला. आकाशस्थ ताऱ्यांची तपासणी करीत असतां पायांखालील खड्ड्यांत पडणाऱ्या ज्योतिषशास्त्रज्ञाची व त्यांची स्थिति जवळ जवळ सारखीच! तेहतीस कोटि देशबांधवांपैकीं कितीकांना पोटभर अन्न व अंगभर वस्त्र मिळतें याची चौकशी क्वचितच व्हावयाची!

**खेड्यापाड्यांतून** जा अगर मुंबई, अहमदाबादसारख्या शहरांतील बहुजनसमाजाच्या वस्तींत फिरून राजा भर्तृहरीनें वर्णिलेल्या गृहस्थितीची कसोटी लावा. किती लोक या परीक्षेंत उत्तीर्ण होतील? शेंकडा पांच तरी ह्या परीक्षेंत पार पडतील किंवा नाहीं याबद्दल आम्हांस जबरदस्त शंका आहे. मुलेंबाळें पहावीं तर पुरेशा पोषक आहाराच्या अभावीं अत्यंत हीन स्थितीप्रत गेलेलीं. खेडेगांवांत कांहींशी बरी स्थिति असते. बिचाऱ्यांना शुद्ध हवा व पाणी यांची तरी ददात नसते; तरी पण दोन्ही ठिकाणीं दुधातुपाच्या अभावीं शरीर पुष्ट होण्यास जरूर त्या पोषक द्रव्यांची हाकाहाकच! शहरांतील मुलगा अकरा बारा वर्षांचा झाला कीं, कुठच्या तरी कारखान्यांत त्याला कामासाठीं जावें लागतें; खेडेगांवांत तो गुरें वळूं लागतो. शहरांत वाईट

संगतीनें चहा, धूम्रपान, गोट्या, बैदूल वगैरेंच्या रूपानें जुगार, वगैरे व्यसनांत तो पारंगत होऊन त्याच्या भावी सर्वांगीण नाशाची तयारी त्याच्या बालपणापासून होतें. तो जसजसा मोठा होतो तसतसें धूम्रपानाच्या जोडीला मद्यपान येऊन बसतें. जुगाराचीच बहीण बाहेरख्याली. तिची ओळख होण्याला कितीसा अवकाश? सिनेमा, नाटकें व तमाशे इत्यादिकांच्या कृपेनें त्या गोष्टीशीं त्याचा बोलतां बोलतां परिचय होतो. विडी, दारू, बाहेरख्यालीपणा, गिरण्यांमध्यें नाकातोंडांत जाणारा धूर व कारखान्यांतील वातावरणांत वावरणारे इतर अनेक सूक्ष्म पदार्थ यांच्या कृपाप्रसादानें त्याचीं फुप्फुसें क्षीण होऊन तीं यमराजाच्या दलालाचें कार्य उत्कृष्ट रीतीनें करतात. बिचाऱ्याचें आयुष्य दहाबारा वर्षांनीं कमी होतें.

**पुरुषांची ही स्थिति!** बायकांची याहून चांगली कशी असणार? टीचभर जागेंत अनेक बायका, पुरुष व मुलें यांनीं रहावयाचें. दारूचे पिठे, जुगारीचे अड्डे व व्यभिचारांचे गड्डे यांनीं गजबजलेल्या बकाली, गलिच्छ वस्तींत दिवस कंठावयाचे. गिरण्यांच्या खबूतरखान्यांत आठ आठ, दहा दहा तास उभें राहून कामें करावयाचीं. पुरुषांनीं संध्याकाळीं पिठ्यांतून दारू ढोसून आल्यावर रस्त्यांतच प्रेतासारखें पडावयाचें. कारखान्यांत बायका, पुरुष, मुलें या सर्वांनीं एका ठिकाणीं राबावयाचें. बिचाऱ्या बायकांची अब्रू पुष्कळ अंशीं गिरण्यांतील दुय्यम प्रतीच्या कामगारांच्या हातीं. त्यांच्या तंत्रानें वागलें तरच सवलती मिळावयाच्या. अर्थात् या परिस्थितीला तोंड देऊन आपलें पातिव्रत्य कायम टेवणाऱ्या **सीता, सावित्री** किती असूं शकतील, हें परमेश्वरालाच माहीत! ही अतिशयोक्ति नव्हे. प्रत्यक्ष पाहिलेली वस्तुस्थिति आहे. खोटी वाटल्यास जा आणि पहा. आणि अशा नरकतुल्य कंगालखान्यांतून तयार होऊन आलेलें दहा आणे विदेशी कापड स्वदेशी म्हणून आम्ही व आमचे पुढारी वापरतों व स्वतःला धन्य मानून घेतों! अशा देशावर परमेश्वर कां कोपणार नाहीं?

**हीच स्थिति खेडेगांवांतली.** रेल्वेनें दळणवळण सुलभ झाल्याकारणानें शहरांतील विषारी वातावरणाची झळ खेडेगांवांस लागण्यास कितीसा विलंब लागणार? भाऊबंदकीमुळें हायकोर्टापर्यंत खटले भांडून अनेकांनीं अक्काबाईचा कृपाप्रसाद ग्रहण केलेला असतो. बरेच शेतकरी सावकारांच्या तावडींत.

कोष्टयांचीही स्थिति तीच. सावकारांनीं विलायती सूत घ्यावें, यांनीं मरेमरेतों काबाडकष्ट करावेत. वरची मलई खावी भांडवलवाल्यांनीं; मरावें मजुरांनीं. परदेशी व्यापाऱ्यांची धन.

**बहुतेक ठिकाणीं शेतकऱ्यांना वर्षांतून आठच महिने काम असतें.** चार महिने रिकामें बसून सावकारांच्या जिवावर जगावयाचें किंवा मुंबईची अगर इतर उद्योगधंद्यांच्या केंद्रांची वाट धरायची. तेथून धडपणें चार पैसे गांठीं टाकून परत घरीं आलेला कुणबी विरळा. शेतींत लक्ष्य नाहीं; कुटुं-बांतील एकादा पुरुष शेतीच्या वांट्याला यावयाचा; जमीन निकस झालेली; अर्धीं अधिक गुरें नाहींशीं झालेलीं; जमिनीला खतमूत कोठून मिळणार? जें कांहीं थोडें शेण असेल त्याच्या गोंवऱ्या होऊन गाड्यांच्या गाड्या शहराला जावयाच्या! एवंच, शहरांत काय किंवा खेड्यांत काय स्थिति एकच. जिकडे तिकडे लोकांच्या तोंडावर प्रेतकळा आलेली! इंग्रज सरकारच्या कृपेनें मिळा-लेल्या स्मशानशांततेचें अफाट साम्राज्य!

**हें सत्य आहे; त्रिवार सत्य आहे; परंतु याला उपाय काय?** काय केलें असतां आपण या कोंडींतून बाहेर पडूं शकूं? शंका बरोबर आहे; केवळ रोगाचें निदान करून काय उपयोग? वैद्यानें अचूक औषधयोजनाही केली पाहिजे; नाहींतर तो वैद्य व नाडीपरीक्षक वैदू यांची योग्यता सारखीच.

याला एकच उत्तर. **या रोगाला मात्रा एकच.** दारिद्र्य, उपासमार, नैतिक व शारीरिक अधःपात व तदंतर्गत राष्ट्रनाश या शत्रूंवर लागू पडेल असा एकच बाण राष्ट्राच्या भात्यांत आहे व तो म्हणजे वस्त्रस्वावलंबनाचे तत्त्वावर खादीप्रसार व या गोष्टीला मूलभूत असलेली पण हल्लीं जवळजवळ नामशेष झालेली जी सूत कांतण्याची कला तिचा पुनरुद्धार. यांशिवाय दुसरा मार्ग नाहीं.

खादी व स्वर्ग, म्हणजेच कौटुंबिक सुस्थिति यांचा निकट संबंध कसा आहे तो पाहूं. ही गोष्ट समजावयाला अत्यंत सोपी आहे. मात्र निर्विकार अंतःकरणानें या गोष्टीकडे पाहिलें पाहिजे. गढूळलेल्या चष्म्यानें याकडे पहाल तर जगाच्या अंतापर्यंत त्यांतील स्वारस्य लक्षांत येणार नाहीं.

**हिंदुस्थानांतील शेंकडा ऐशीं लोक शेतकरी आहेत.** यांपैकीं बहुते-कांना वर्षांतून चारपांच महिने काम नसतें ही गोष्ट सर्वमान्य आहे. या

रिकाम्या वेळीं पोट भरण्यासाठीं या लोकांस घरेंदारें सोडून पोटाकरितां देशोधडीला जावें लागतें. शहरांतील बकासुराच्या मायावी जाळ्यांत सांपडून त्यांची सर्वांगीण अवनति होते. चार पैसे मिळाले तरीही दारूपाण्यांत त्यांचा खर्च झाल्याकारणानें शरीर व अब्रू वगैरेंची राखरांगोळी करून घेऊन हात हालवीतच त्यांस माघारीं फिरणें प्राप्त होतें. एक वेळ परदेशी कापडासाठीं देशांतून बाहेर जाणारा ६०।७० कोटींचा खर्च पुरवला. पण परमेश्वरा! देशांतील कोट्यवधि लोकांची ही सर्वांगीण अवनति नको, असें म्हणण्याची पाळी येते. **हरिश्चंद्रानें सर्व राज्यावर तिलांजलि सोडून शेवटीं मुलांबाळांसह स्वतःला विकून घेतलें, पण सत्त्व सोडलें नाहीं; गेलेलें राज्य पुन्हां परत मिळविलें; इतकेंच नव्हे, तर विश्वामित्रासारख्या प्रतिसृष्टि निर्माण करूं पहाणाऱ्या महापराक्रमी राजर्षीला आपल्या तपश्चर्येच्या फलावरही पाणी सोडण्यास भाग पाडलें.** आमचें सत्त्व कायम राहिलें तर सातासमुद्रांपलीकडे गेलेल्या संपत्तीला आम्ही आपल्या नैतिक, मानसिक व शारीरिक तेजाच्या जोरावर परत खेंचून आणूं; पण आर्थिक संपत्तीबरोबर दैवी संपत्तीही आम्ही गमावून बसलों तर मग मोक्ष कसचा आणि स्वराज्यही कुठलें? **तुकारामबोवांच्या** उक्तीप्रमाणें '**गाढवही गेलें व ब्रह्मचर्यही नाहींसें झालें**' अशी स्थिति झाल्यास नवल तें काय?

ही आपत्ति टाळणें असल्यास तुम्हांस खादीकार्याच्या केंद्राभोंवतीं खेडेगांवांची संघटणा करणाऱ्या कार्यासाठीं शक्य तितक्या लवकर कंबर कसली पाहिजे. शहर व रेल्वे यांपासून दूर व जेथें पाऊस कमी पडतो व बागाईत शेती नसते अशाच ठिकाणीं हें कार्य जास्त सुकर व यशस्वी होणार हें उघड आहे. खादीकार्य ही गोष्ट अशी आहे कीं, यांत कुटुंबांतील सर्व लोकांस घरांतल्या घरांत काम मिळूं शकतें. बायका घ्या, पुरुष घ्या, अगर मुलें घ्या; वृद्ध घ्या अगर तरुण घ्या; या सर्वांस हातमाग व चरखा काम देऊं शकतात. सुतार, पिंजारी वगैरेंस मदत मिळते. योग्य दिशेनें प्रयत्न केल्यास खादीकार्याचें केंद्र ही एक उत्तम प्रकारची परस्पर-सहकारी संस्था बनूं शकते. मात्र ही गोष्ट आपोआप होणें कठीण. अनेक वर्षांपासून हा धंदा मरत आलेला आहे. यांत प्राण घालावयाचा म्हणजे बुद्धिमान, सुशिक्षित लोकांनींच जुने कोष्टी अगर बेकार अशिक्षित यांस हातीं धरून

हें कार्य केलें पाहिजे. बंगालमधील डॉ. पी. सी. रॉय यांच्या खादी-प्रतिष्ठानसंस्थेनें या बाबतींत फारच उत्तम उदाहरण घालून दिलेलें आहे. 'आमचे पूर्वज मोठे होते, मग आम्हीही कसे मोठे असणार नाहीं?' या शकारी अभिमानाला बळी पडून इतर प्रांतांकडे तुच्छतेच्या दृष्टीनें पाहण्याचे दिवस आतां गेले. 'सांगे वडिलांची कीर्ति। तो एक पढतमूर्ख।' ही समर्थांची उक्ति मोठी मार्मिक आहे. तुम्ही पराक्रम करा, सर्व हिंदुस्थान तुमच्या भजनीं लागेल. तुम्ही कराल ती खरी प्रगति मात्र असली पाहिजे; पुच्छप्रगति नसावी.

पुणें जिल्ह्याचेंच एक उदाहरण घेऊं. या जिल्ह्याची लोकसंख्या सुमारें १२ लक्ष आहे. माणशीं १८ वार या हिशेबानें एकट्या पुणें जिल्ह्याला सालिना दोन कोटि वार म्हणजे सरासरीनें पाऊण कोटि रुपयांचें कापड लागतें. एक हातमाग सरासरीनें रोजीं ८ वार कापड विणूं शकतो; अर्थात् हें कापड येथेंच विणावयाचें म्हणजे ८ ते १० हजार माग चालतील तेव्हां हें कार्य व्हावयाचें. एका मागाला लागणारें सूत पुरवण्यास रोजीं ८ तास काम करणारे दहा चरके फिरले पाहिजेत. या १० हजार मागांसाठीं १००,००० चरखे फिरतील तेव्हां पुरेसें सूत निघेल व जिल्ह्याला लागणारें कापड विणलें जाईल. बारा लाख वस्तीपैकीं दहा लाख वस्ती खेड्यांत रहाते. म्हणजे या दहा लाखांपैकीं दर शंभरांमागें दहांनीं जरी चरखा फिरविला तरी काम होण्यासारखें आहे.

आम्हीं जी खेडेगांवांची पहाणी केली आहे तीवरून आमचा अनुभव असा आहे कीं, प्रत्येक खेड्यांत शेंकडा १० माणसें अशीं असतात कीं, जीं रिकामपणांत आपला वेळ घालवितात. त्यांस घरच्या घरीं काम मिळालें तर हवें असतें. मग त्यांस रोजीं दोन किंवा अडीच आणे कां मिळेनात?

खानदानीच्या, पुरातन, अस्सल मराठा कुटुंबांपैकीं अनेक कुटुंबें आज कालचक्राच्या तडाख्यांत सांपडून खालावलीं आहेत. त्यांतील स्त्रियांस डोक्यावर पाट्या घेऊन उन्हातान्हांत दगड, माती, चिखल वहाणें अगर खडी फोडणें या गोष्टींची संवय नसते, लाज वाटते. हीच स्थिति गरीब ब्राह्मण, गुजर अगर मुसलमान कुटुंबांची. अस्पृश्यांना चरखा हा तर एक कामधेनु आहे असेंच वाटतें. बलुत्यांचें उत्पन्न पूर्वींप्रमाणें मिळत नाहीं; पुरातन हक्क

सोडून देशोधडीला कामासाठीं जाणें त्यांच्या जिवावर येतें. अशा स्थितींत सूत कांतून दोन आणे जरी रोजीं मिळाले तरी ते त्यांना पुष्कळ वाटतात. वस्त्रस्वावलंबनाची कांस धरली तर मग ही गोष्ट याहीपेक्षां सुलभ होणार आहे. ( ‘ स्वावलंबी ग्रामसंघटना ’ हें पुस्तक पहा. )

**तात्पर्य,** स्वराज्य—कीं ज्या एका गोष्टीवर बहुजनसमाजाची सुस्थिति, जिला आम्हीं ऐहिक स्वर्ग म्हटलें आहे ती, अवलंबून आहे—मिळावयाचें असलें तर दरसाल ७०।८० कोटि रुपयांचा झरा परदेशीं विलायती कापडाच्या किंमतीच्या रूपानें जात आहे तो बंद होणें जरूर आहे. ही गोष्ट घडवून आणण्यासाठीं आम्हांला वर वर्णिल्याप्रमाणें **ग्रामसंघटणा करावी लागेल.** त्यासाठीं चार महिने काम नसेल अशा शेतकऱ्यांना कांतणें व विणणें वगैरे कामें देऊन आपलीं घरेंदारें सोडून शहरांची वाट धरण्याच्या आपत्तींतून त्यांची सुटका करावी लागेल. ज्यांस नेहमींच रिकामपण असतें त्यांसही काम देऊन जनतेंत उद्योगीपणाची वृत्ति वाढवावी लागेल; अशा रीतीनें संघटणा केल्यामुळें गांवांतल्या गांवांतच उत्पन्न होणारें कापड त्याच गांवांतल्या लोकांनीं थोडें महाग पडलें तरीही —प्रथम तें महाग पडणारच—घ्यावें, त्यासाठीं जरूर तर कमी कपडे वापरावेत. फॅशन सोडून द्यावी; यासाठीं आम्हांला त्यांस शिक्षण द्यावें लागेल; त्यासाठीं घरोघर हिंडावें लागेल; बहुजनसमाजांत मिसळावें लागेल व इतर अनेक जरूर त्या गोष्टी कराव्या लागतील. त्यासाठीं सुशिक्षित लोकांना दारिद्र्याचें व्रत स्वीकारून, शहरांचा त्याग करून खेड्यापाड्यांची संघटणा करावी लागेल व ही गोष्ट आम्ही करूं शकलों तरच आमचा सर्वांगीण अधःपात थांबून आम्हांला लागणारें कापड येथल्या येथेंच उत्पन्न होईल. त्याबरोबर शिक्षण, आरोग्य यांचे बाबतींत सुधारणा होणें, जातीजातींत प्रेम नांदणें वगैरे ग्रामसंघटणेचीं जीं इतर अंगें त्यांबद्दलचे प्रश्न सुटतील; लोकांची आर्थिक स्थिति सुधारेल; लोकशाहीचें सामर्थ्य वाढेल; दुसऱ्याकडे पाहून आपला संसार थाटण्याची जनतेची प्रवृत्ति नाहींशी होऊन स्वावलंबनाची वृत्ति उत्पन्न होईल. थोडक्यांत बोलावयाचें म्हणजे **स्वराज्यसंस्थापनेची पूर्व तयारी होईल** व मग ईश्वराला या रीतीनें तपश्चर्या केलेल्या राष्ट्राला मदत करणेंच भाग पडेल; स्वराज्य स्थापलें जाईल व **इहलोकींच्या स्वर्गाचीं द्वारें गोरगरिबांस उघडीं होतील.**

# पुष्प आठवें

## यज्ञेश्वराय नमः

ब्राह्मण्य रक्षावें आदरें । उपासनेच्या भजनद्वारें ।
गुरुपरंपरा निर्धारें । चळोंच नेदावी ।। —श्रीसमर्थ.

**गुरुवर्य !**—आपल्या चरणांचा मी एक रजःकण आहें. आपणांला चार गोष्टी निवेदन कराव्यात असा माझा अधिकार नाहीं. तथापि आपली व आपल्या पूर्वजांची विद्वत्ता, तेज, तपश्चर्या, स्वसुखनिरभिलाषबुद्धि वगैरे देदीप्यमान दैवी गुणांनीं मोहित होऊन आपल्याशीं हितगुजाच्या चार गोष्टी करण्याची मला इच्छा झालेली आहे. जर एखादा दुसरा अधिक उणा शब्द निघून गेला तर त्याकडे दुर्लक्ष होईलच. कांहीं ग्राह्यांश असल्यास त्याचा स्वीकार व्हावा. 'बालादपि सुभाषितं ग्राह्यम्' हें सुभाषित आपणांस अवगत आहेच.

**काल विनूकाकांच्या घरीं पक्ष होता.** मी जेवायला गेलों होतों. रविवारची सुट्टी असल्याकारणानें फुरसद पुष्कळ होती. कोणताही खाजगी अगर सार्वजनिक प्रसंग किंवा समारंभ असो, त्यांतील सर्व गोष्टींचें व त्यांत भाग घेण्याऱ्या निरनिराळ्या व्यक्तींचें बारकाईनें सूक्ष्म निरीक्षण करण्याचा मला प्रथमपासूनच नाद आहे हें आपणांस माहीत आहेच; व एकाद्याकडे लक्ष लावून वेंधळ्यासारखें पहात बसण्याबद्दल माझी बाबांनीं अनेकवार खरडपट्टीही काढलेली आहे. माझी मित्रमंडळी तर नेहमीं या माझ्या संवयीबद्दल माझी थट्टा करितात. मी मात्र त्यांसच बावळट समजून त्यांच्या चेष्टांकडे दुर्लक्ष करितों व त्यामुळें जगाच्या व मनुष्यस्वभावाच्या निरनिराळ्या खुब्यांचें ज्ञान मीं जितकें करून घेतलेलें आहे तितकें फारच थोड्यांनीं घेतलेलें असेल असें मला वाटतें. असो. आत्मपुराण पुरें झालें.

मीं पक्षाचा सर्व विधि अथपासून इतिपर्यंत नीट बारकाईनें पाहिला व तपासला. अर्थात् त्यांतून भोजनसमारंभ वगळला नाहीं हें सांगणें नकोच. मनाची फारच

करमणूक झाली; पण त्याहीपेक्षां कांहीं प्रसंगीं अभिमान तर केव्हां केव्हां खेद वगैरे भावनांचाही मला अनुभव घ्यावयाला सांपडला. तेथें पाहिलेल्या गोष्टींचें मी खालीं थोडक्यांत वर्णन करीत आहें.

**पिलंभट, अण्णंभट** व आणखी दोघे—माझ्या ओळखीचे नाहींत असे— मिळून चवघे भिक्षुक आले होते. **पिलंभटांना** कोणतीही अर्धवट गोष्ट खपत नसे. त्यांचे व काकांचे तीनचारदां खटके उडाले. काकांना जेवण आटोपून ब्राह्मणसभेच्या डेप्युटेशनसंबंधीं कोणत्याशा साहेबाच्या बंगल्यावर जाण्याची घाई होती. 'कसेंतरी करून एकदां आटपा' असें त्यांचें **पिलंभटांच्या** पाठीमागें टुमणें चाललें होतें. पण **पिलंभट** कसला वस्ताद! एक नंबरचा निस्पृह. तो गरीब, श्रीमंत जाणत नाहीं; त्यानें काकांना चारदोनदां खडसावलें. '**सर्व यथासांग करावयाचें नसलें तर मला बोलावतां कशाला?** मला नाहीं हें असलें खपावयाचें,' **पिलंभट** म्हणाला. काका गारच झाले. मी मनांत खूप हंसलों. **पिलंभटांचा** व काकांचा खटका उडाला त्या वेळीं इकडे **अण्णंभटाची** जी म्हणतां धांदल उडत होती ती पुसूं नका. तो पिलंभटाला त्या वेळीं डोळ्यांनीं सारखा खुणा करून दाबण्याचा प्रयत्न करीत होता. त्याच्या मनांत कसेंतरी करून एकदां सर्व गोष्टी उरकून घ्याव्यात. रावबहादुरांना ( सत्याग्रहाच्या धामधुमींत आमच्या काकांना सरकारनें रावबहादूर केलें ) दुखवूं नये; भक्कम दक्षिणा व चमचमीत जेवण घडपणें पदरांत पाडून घ्यावें व मोकळें व्हावें हा त्याचा बेत! पण **पिलंभट** कसचा ऐकतो? त्यानें सर्व गोष्टी काकांच्याकडून यथासांग करून घेतल्या तेव्हां त्याच्या मनाचें समाधान झालें.

**मीं या प्रसंगापासून पुष्कळच बोध घेतला. पिलंभटांच्या** करारी व निस्पृही स्वभावाबद्दल मला जितकें कौतुक व आदर वाटला तितकाच **अण्णंभटाच्या** लटपटी स्वभावाचा तिटकारा आला. आमचे काका काय बोलूनचालून सरकारच्या नाकांतले बाल! करून करून भागले व देवपूजेला लागले! केवळ लोकांकडून 'काय धर्मनिष्ठ मनुष्य आहे हो हा? येवढा मोठा सरकारी अधिकारी पण हव्यकव्य, दानधर्म, श्राद्धपक्ष यांत रतिभरही कमतरता नाहीं!' असें म्हणून घेऊन वाहवा करून घेण्याची हांव! बाकीचे दोघे एकदां पिलंभटाकडे तर एकदां अण्णंभटाकडे टकमकां पहात होते.

**गुरुजी! पिलंभटांसारखे करारी भिक्षुक आज किती आहेत बरें?** माझ्या दृष्टीनें फारच थोडे. बहुतेक सर्व पोटार्थी झालेले; कशीं तरी चार अक्षरें घोकावीं; थोरांमोठ्यांची मर्जी संपादन करावी; घृतकल्या मधुकल्या झोडाव्यात; मजेंत काळ घालवावा ही वृत्ति. ‘**शापादपि शरादपि**’ अशी आपल्या पूर्वजांची परंपरा किती पाळतात? गृहस्थ काय, भिक्षुक काय सर्वच अधोगतीला गेलेले. ब्राह्मणेतरांनीं नांवें ठेविलीं तर कां राग यावा?

**गुरुजी! आपण या गोष्टींचा नीट विचार कराल काय?** आपणांला मी चांगलें ओळखतों, म्हणून माझ्या मनांतल्या आंतल्या कपाटांतील गोष्ट मी आपणांजवळ बोलून दाखवीत आहें. परवां परवां पुण्यास एका ब्राह्मणेतर जातीच्या नरपशूनें एका गरीब बिचाऱ्या निरपराधी ब्राह्मण बालिकेसंबंधीं अत्याचार करण्याचा प्रयत्न केला. गुरुजी! तुम्हांला खरें सांगतों, मला आठ दिवस झोंप आली नाहीं. डोक्यांत रात्रंदिवस नानाप्रकारच्या विचारांचें काहूर चाललें होतें. असे प्रकार आतांशा कां होऊं लागावेत? मला **बर्कनें** फ्रेंच राज्यक्रांतीसंबंधीं लिहिलेल्या पुस्तकांतील एका वाक्याची आठवण झाली. तो म्हणतो, ‘हाय! हाय! ज्या फ्रेंच लोकांच्या राणीकडे नुसतें वांकड्या नजरेनें कोणीं पाहिलें तर सहस्रावधि योद्ध्यांच्या समशेरी म्यानांतून खाडकन् बाहेर पडाव्यात, त्याच फ्रेंच लोकांच्या राणीला आतां फांसावर लटकण्याची वेळ यावी काय?’ माझ्या डोळ्यांपुढें हेंच वाक्य उभें राहिलें. मी मनाशीं म्हणालों, ‘अरेरे! केवढा हा अधःपात! ज्या **शिवाजीमहाराजांनीं** यावज्जन्म परस्त्री मातेसमान मानून तोच कित्ता आपल्या प्रजेस गिरवण्याबद्दलचा धडा घालून दिला, त्यांच्याच वंशजांकडून अशा प्रकारचीं कृत्यें होऊं लागावीं काय? शिव! शिव! ही भयंकर अवनति आमच्या राष्ट्रास कोठपर्यंत नेऊन पोहोंचविणार? कोणच्या खोल खड्डयांत लोटून देणार? राष्ट्राच्या यंत्रांतील कांहीं चक्रें, स्क्रू वगैरे ढिलीं होऊन घोंटाळा तर उत्पन्न झाला नाहीं ना?

**माझें मन मला सांगूं लागलें,** ‘गड्या! बरोबर कारण शोधून काढलेंस. अरे, हा **सर्व पारतंत्र्याचा प्रभाव!** ब्राह्मणापासून तों तहत शूद्र, अतिशूद्रांपर्यंत सर्व लोक धर्मापासून च्युत झाले त्याचा हा परिणाम. पुण्यांतला हा परवांचा अत्याचार भरदिवसां, मोठ्या रस्त्यावर, पुण्यासारख्या मोठ्या शहरांत

झाला म्हणून त्याचा एवढा गवगवा झाला. **आपल्याला माहीत नाहींत असे कितीतरी प्रकार रोज आडरस्त्यावर मुकाट्यानें चालले आहेत!** त्यांची कोणाला दादही नाहीं. ब्राह्मणांपैकीं बहुतेक साहेबांचे प्रत्यक्ष, अप्रत्यक्षपणें नोकर बनले. त्यांनीं परक्यांचें राज्ययंत्र सुरळीत चालण्याला मदत केली व आज करीत आहेत.

**धर्मगुरु बिचारे निस्सत्त्व दंडधारी.** त्यांना विचारतो कोण? पोट कसें भरेल याची चिंता. यजमानाला त्यासाठीं कसें तरी खूष ठेवावयाचें हें ध्येय. क्षत्रिय किंवा मराठे कोणी लष्करांत तर कोणी पोलिसांत भरती झाले. कोणी वर डोकें काढण्याचा प्रयत्न करूं लागले कीं, त्यांच्यावर गोळ्या घालायला अगर त्यांच्या हातापायांत बेड्या ठोकायला तयार! वैश्य धूर्त अशा परदेशी व्यापाऱ्यांचे दलाल बनले. विलायती माल आणावा; तो विकावा; जी कांहीं दलाली मिळेल तिच्यावर चैन करावी. राहतां राहिला शेतकऱ्यांचा वर्ग. तो अगदींच अडाणी. वाटेल त्यानें यावें, त्याला लुबाडावें. सरकार, सरकारी नोकर, वकील, सावकार, व्यापारी, दलाल सर्वच त्याचे यजमान; त्यांना खूष ठेवतां ठेवतां बिचारा अर्धमेला झाला; कर्जबाजारी बनला; शेतीवाडी जाऊन आतां पोटासाठीं मजुरी करण्याची पाळी आली; असा हा एकंदर प्रकार झाला. **' ब्राह्मण हा सर्व वर्णांचा गुरु. राष्ट्ररूपी इमारतीचा आधारस्तंभ. तो ढांसळला कीं सर्वच ढासळलें. ब्राह्मण सुधारला कीं सर्व सुधारेल. '**

**गुरुजी! ही विचारसरणी बरोबर आहे काय?** मला वाटतें त्यांत फारशी चूक आहे असें वाटत नाहीं. आपल्या बायकांच्या अब्रूचें रक्षण व्हावें म्हणून परकीय नोकरशाहीच्या लहान मोठ्या गुमास्त्यांकडे धांव घेण्याची आमच्यांतील मोठमोठ्या पुढाऱ्यांस बुद्धि व्हावी यापेक्षां शरमेची दुसरी गोष्ट कोणती? अशा लोकांचें मिंधेपण पत्करण्याचा प्रसंग तुमच्यासारख्या विद्वान् सत्त्वशील वेदोनारायणांवर यावा यापेक्षां दुसरी नामुष्कीची कोणची गोष्ट असावयाची!

**एकच आठवण झाली ती सांगतों.** परवां **बाबदेवभट** आमच्या घरीं आला होता. मी, **महात्मा गांधींचें** शनवारवाड्यासमोर व्याख्यान झालें त्या दिवसापासून, नखशिखान्त खादी वापरतों हें आपल्याला माहीत आहेच.

त्याचप्रमाणें मला बेळगांवच्या कॉंग्रेसपासून रोज प्रत्येकानें राष्ट्रधर्म म्हणून नियमानें अर्धा तास तरी सूत काढण्याचें महत्त्व आतां तंतोतंत पटलें आहे. मी सूत काढीत होतों. बाबदेवभट लागला माझी चेष्टा करायला. मी त्याला म्हणालों, ' बाबदेवभट ! तुम्ही वास्तविक आमचे धर्मगुरु. तुम्हीं या गोष्टींत आम्हांला उदाहरण घालून द्यावयास पाहिजे. तर तुम्हीच माझी चेष्टा करितां ? कमाल झाली बोवा ! अहो, तुम्हांला गिरण्यांचें अगर विलायती कापड वापरण्यांत कांहींच कमीपणा अगर अधर्म वाटत नाहीं ? आश्चर्य आहे खरें ! अहो, या कापडाच्या सुताला अपवित्र चरबी लावलेली असते, ही गोष्ट आतां जगजाहीर झाली आहे. तुमचे डोळे केव्हां उघडणार ? तुम्ही नाहींत सरकारी नोकर; तेही बिचारे आतां कोणी कोणी खादी वापरूं लागले आहेत. तुम्हांला वेळ असतो. अर्धा तास सूत काढावयाला तुम्हांला काय हरकत आहे ? कांहीं जनाची नाहीं तरी मनाची तरी लाज धरा. ' काय असेल तें असो, बिचारा शरमला; सूत काढून त्याचें विणलेलें कापड वापरण्याचें त्यानें कबूल केलें बोवा. मला फार आनंद झाला.

**गुरुजी ! पत्र फार लांबलें.** शेवटीं एकच विनंति करतों. ब्राह्मण उपासनेची कांस धरून ब्राह्मण्याचें रक्षण करावयाच्या मार्गास लागला कीं, सर्व कांहीं सुधारेल अशी आतां माझी बालंबाल खात्री झाली आहे. **गुरुजी ! तुम्ही या कामांत पुढाकार घ्याल काय ?** तुम्हीं मला लहानपणीं ब्रह्मकर्म शिकविलेंत; तुमच्या मांडीवर मी लोळलों आहें. येवढा आग्रह तुमच्याजवळ धरण्याचा मला हक्क आहे. तुम्ही आतां वृद्ध झालां आहांत हें मी जाणतों; पण माझी खात्री आहे, या कामांत तुम्हीं लक्ष घातलेंत तर खात्रीनें यश मिळवाल. माझी पक्की खात्री आहे कीं, जर आपणांसारखी पवित्र आचरणाची मंडळी जरा थोडीशी मेहनत घेऊन ब्राह्मण लोकांस सुधारण्याच्या कार्यास आपणांस मनापासून वाहून घेतील तर आम्हीही आपणांस लागेल तें साहाय्य करायला तयार होऊं. पण ही गोष्ट घडेल काय ? इतकें या गरीब बिचाऱ्या मातृभूमीचें भाग्य आहे काय ? **रामशास्त्री प्रभुण्यांसारखीं** ज्वलज्जहाल माणसें जेथें निर्माण झालीं ती भूमि मला वाटतें अजून वांझ झाली नाहीं. परमेश्वरावर श्रद्धा ठेवून या कार्याची धुरा कोणी तरी दैवी गुणांनीं युक्त अशा प्रभावशाली पुरुषानें

उचलली पाहिजे असें मला वाटतें. मी तर आतां या कार्याला आपलें तन, मन, धन वाहण्याचा निश्चय केला आहे. निदान आपले आशीर्वाद तरी आपण या कार्यास द्यावेत अशी आपणांजवळ माझी हात जोडून प्रार्थना आहे. आपल्या भेटीस मी लवकरच येणार आहें.

( स्वावलंबन–१-११-१९२६. ) आपला नम्र शिष्य—शंकर.

## पुष्प नववें

# यज्ञेश्वराचा यज्ञ

चि. शंकरभाऊ यांस–अनेक आशीर्वाद विशेष—पत्र पावलें. बहुत आनंद झाला. विशेषतः आपण केलेल्या निर्धारानें फार संतोष झाला. आधुनिक सुधारणेच्या गळफांसांतून ब्राह्मण तरुणांची सुटका होईल तो सुदिन.

माझीही आपल्याप्रमाणें स्थिति झाली. कांहीं काल मी परंपरागत उद्योगांत घालविला. त्या कार्यक्रमाचा वीट आला. पुणें सोडलें त्याचें कारण हेंच. अनेकांशीं वादविवाद केला. ब्राह्मणाच्या प्राचीन ‘ शापादपि शरादपि ’ या सामर्थ्याची आठवण करून दिली. पण व्यर्थ! कोणी ऐकेना. उपरति झाली + + + गांवीं येऊन राहिलों. बारा वर्षें गंगाकांठीं तप व चिंतन यांत घालविलीं. एके दिवशीं पहाटेस समर्थांचा साक्षात्कार झाला. त्यांनीं मस्तकावर वरदहस्त ठेवून कार्य करण्याची आज्ञा केली.

वि + + + हा छोटेखानी गांव आहे. वस्ती सुमारें १५००. गांवाजवळून गंगामाई वहाते. कांठावर रम्य असें शंकराचें देवालय आहे. गांवांतील ब्राह्मण सर्व पोटासाठीं शहरीं गेलेले. शेतकरी कर्जबाजारी. हातातोंडीं कारभार. पाऊस बरोबर पडत नाहीं. पिकांवर पोट भरत नाहीं. पूर्वीचा सूत काढण्याचा धंदा होता तो नामशेष झालेला. अर्धपोटीं रहावें लागतें. बहुतेक जमिनी सावकारांकडे गहाण. कशीबशी जमीन पेरून शेतकऱ्यांपैकीं पुष्कळ लोक मुंबईला पळतात. तेथें मरेमरेतों राबतात. पैसेही मिळवतात पण ते दारूपाण्यांत उडवतात. परत गांवीं हात हलवीत यावें लागतें. अब्रू व शरीर यांची मात्र राखरांगोळी होते.

१९२१ च्या मे महिन्यांत महात्मा गांधी या बाजूला आले होते. त्यांचे चार शब्द कानांवर पडण्याचा योग आला. चार घटका समागमही घडला. बहुत लाभ झाला. त्यांचें तत्त्वज्ञान, कार्याचें स्वरूप व दिशा हीं पटलीं. तदनुसार कार्य करण्याची शंकरासमोर प्रतिज्ञा केली. गांवीं आलों. कार्याला सुरुवात केली.

**पहाटें चाराला उठतों**—प्रातर्विधि उरकून स्नानाला गंगेवर जातों. संध्या उरकून शंकराची पूजा करतों. १०८ नमस्कार झाल्यावर थोडींशीं आसनें करितों. नंतर दासबोधाचा एक समास वाचून होतो तों सूर्योदय होतो. गांवांत प्रभातफेरीला निघतों. आठ साडेआठ वाजेपर्यंत गांवांतील सर्व मोहोल्यांतून भूपाळ्या, मनाचे श्लोक, राष्ट्रीय गीतें म्हणत फिरतों. प्रथम चेष्टा झाली. आतां गांवांतील दहावीस लोक बरोबर येतात व मोठ्या भक्ति-भावानें माझेबरोबर पद्यें वगैरे म्हणतात. कुटुंबाचे निर्वाहाला पुरून उरेल इतकी भिक्षा व रोख पैसे जमतात. प्रथम महिना दीडमहिना जवळ जवळ अर्धपोटीं होतों.

सदासर्वदा देव सन्नीध आहे ।
कृपाळूपणें अल्प धारिष्ट पाहे ।।

या समर्थोक्तींची प्रचीति आली. परमेश्वरानें परीक्षा पाहिली. गुरु-कृपेनें तींतून पार पडलों. ' तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ' हेंच खरें. अनन्य, अव्यभिचारी भक्ति होणें मात्र जरूर आहे. श्रद्धा पाहिजे तरच कार्य होतें; संशय उत्पन्न झाला कीं विनाश ठरलेलाच.

फेरी पुरी करून घरीं येतों. धान्य कुटुंबाच्या हवालीं करतों. बगी व सोन्या तें निवडून आईच्या स्वाधीन करतात. भाजीपाला कोठून तरी आलेलाच असतो. नको असें होतें. ईश्वराची कृपा. थोडीशी विश्रांति घेऊन पुनः बाहेर पडतों. गांवांत, महारवाड्यांत व इतर ठिकाणीं चरखे दिले आहेत त्यांची एकदां पहाणी करावी लागते. कोणाची कांहीं अडचण असल्यास ती दूर करतों. कोष्ट्यांकडेही फेरी टाकावी लागते. गांवांतील कांहीं सुखवस्तु लोक चरखे चालवितात, त्यांचीही विचारपूस करतों. बाजार-पेठेंत जरा हिंडून येतों तों ११ वाजण्याचा सुमार होतो. घरीं येतों. जेवण तयार असतें.

**भोजनोत्तर बगी व सोन्याला दीड दोन तास शिकवतो.** प्रथम हीं दोघेंच होतीं. आतां गांवांतलीं १५।२० मुलेंही येऊं लागलीं आहेत. एक शाळाच झाली म्हणावयाची. गेल्या पौर्णिमेपासून गांवांतलाच एक मराठी सातवी इयत्ता पास झालेला मुलगा आहे, त्याला मदतीला घेतला आहे. शिक्षणक्रम अगदीं साधा व व्यवहारोपयुक्त असा ठेवला आहे. उजळणी व जमा-खर्चावर माझा फार भर. त्याचप्रमाणें बहुतेकांची रूपावळी व अमरसारांतील निवडक श्लोक झाले आहेत. भर्तृहरीचे नीतिशतकांतील सोपे पांचपन्नास श्लोक पाठ करून घेतले आहेत. त्यांचा सामान्यतः अर्थ त्यांना कळूं लागला आहे. त्यांचेंच वामनी भाषांतरही पाठ करून घेतलें आहे. त्यामुळें उच्चार स्पष्ट होऊन वाणीवर व मनावर फारच उत्तम संस्कार होतात. तिवारी कवींचीं संग्रामगीतें पाठ करून घेतों. त्यामुळें इतिहास निराळा शिकवावा लागत नाहीं. मुलांना कंटाळा येत नाहीं. नाहींतर मुलें आपलीं सन व नांवें घोकताहेत. उपयोग कांहीं नाहीं. पांच सहा वर्षांच्या अवधींत मोरोपंती रामायण, भारत, मनाचे श्लोक, करुणाष्टकें व आधुनिक कवींच्यापैकीं राष्ट्रीय पदें, पोवाडे मुलांचे करून घेतले तर भाषा, इतिहास व धर्म, नीति व व्यवहार यांचें उत्तम शिक्षण होईल अशी माझी समजूत आहे.

**याप्रमाणें दोन तास बौद्धिक शिक्षण झाल्यावर मुलें तासभर सूत काढतात.** बगी व सोन्या आतां स्वतःच्याच सुताचे कपडे घालतात. इतर विद्यार्थ्यांमध्येंही अशीच चढाओढ लागली आहे. कांहीं मुलें पिंजण्याचें, सरकी काढण्याचें व नवार, फीत, नाडी वगैरे विणण्याचें काम करितात. त्यामुळें दरमहा १०–१५ रुपयांचें उत्पन्न होऊन त्यांतून दुय्यम मास्तरांचा अर्धाअधिक पगार निघतो. संध्याकाळीं परसांत कांहीं फुलझाडें, भाजीपाला वगैरेंची लागवड केली आहे. तेथें मुलें थोडेंसें काम करितात. व्यायाम होऊन फिरून शिक्षण. पाळ्या ठरविलेल्या आहेत. कांहीं मुलें काठीलाठी, कुस्ती वगैरेही शिकतात. अशा रीतीनें याचेंच एका लहानशा शाळेंत रूपांतर होईल अशी आशा आहे.

**तिसऱ्या प्रहरीं मी थोडेंसें पिंजण करतों.** कारण चरखेवाल्या बायांना पेळू पुरवावे लागतात. ती पेळू तयार करते. कधीं कधीं बगी व सोन्या तिला मदत करतात. एक घोडें ठेवलें आहे. साडेपांच वाजतां त्यावर बसून पाळीपाळीनें

पंचक्रोशींतील गांवें व वाड्या घेतों. आमच्या वैद्यभूषणांनीं काहीं नित्य उपयोगी पडणारीं औषधें दिलीं आहेत; त्यांचा उपयोग करतों. गुण येतो. ' औषधं जाह्नवीतोयं, वैद्यो नारायणो हरिः । ' ही मनामध्यें भावना असते. सारा श्रद्धेचा खेळ आहे. लोकांना आरोग्य, स्वच्छता, शुद्ध हवा व पाणी वगैरेंचें महत्त्व समजावून सांगतों. लोक देवाप्रमाणें पायां पडतात. मोठें लचांड झालें आहे!

आठाच्या सुमारास घरीं येतों. वाटेंतच एखाद्या विहिरीवर अगर ओढ्यावर सायंसंध्या, रामरक्षा उरकून घेतलेली असते. घरीं येऊन थोडासा फलाहार करून विसांवा घेतों तों कीर्तनाची वेळ होते. विठोबाच्या देवळांत रोज दीड दोन तास कीर्तन करण्याचा परिपाठ ठेवलेला आहे. ही गर्दी जमते! मागें सदोबा ( दुय्यम मास्तरांचे धाकटे बंधु ), बगी व सोन्या करतात; दुय्यम मास्तरांकडे त्या वेळीं रात्रीची शाळा चालविण्याचें काम दिलें आहे. पांच वर्षांत गांवांत एकही माणूस निरक्षर राहूं देणार नाहीं, अशी आम्हीं दोघांनीं प्रतिज्ञा केली आहे. ईश्वर काय करील तें खरें!

कीर्तनांत पूर्वरंगांत वेदांताचें आधुनिक पद्धतीनें प्रतिपादन करतों. गीता, दासबोध, ज्ञानेश्वरी त्याचप्रमाणें विवेकानंद, रामतीर्थ, टिळक, गांधी यांच्या वचनांच्या आधारानें निरूपण चालतें. टिळक व गांधी यांचा स्वावलंबनमूलक वेदांत लोकांच्या मनावर बिंबविणें हा मुख्य हेतु. आख्यानें प्रल्हाद, मार्कंडेय, ध्रुव, चिलया वगैरेंचीं व महाभारत-रामायणांतील ठळक प्रसंगांचीं असतात. तपश्चर्या, चित्तशुद्धि, प्रयत्नवाद यांचें महत्त्व लोकांना पटविण्याचा सारखा प्रयत्न. ११ ला कीर्तन संपून आरतीप्रसाद झाला कीं, घरीं येऊन चार घटका अंथरुणावर आंग टाकतों.

फलश्रुति—गांवांतील लोकांत अपूर्व जागृति झाल्याचीं स्पष्ट चिन्हें दिसत आहेत. शिक्षणाचें वेड लागलेलें दिसतें. पांच वर्षांमागें शेजारच्या * * * गांवीं दारूच्या गुत्त्यावर ही गर्दी असे! या वर्षी मक्तेदाराला भयंकर बूड आल्यामुळें पुढील वर्षीं मक्ता घेण्याची सोय नाहीं असें तो म्हणतो. गांवांतील खादीचें दुकान चांगलें चाललें आहे. कृष्णेश्वराच्या जत्रेच्या वेळीं या वर्षीं खादीचें प्रदर्शनही भरविलें होतें. खप पुष्कळ झाला. गांवांत पाऊणशें चरखे व तीन हातमाग चालू आहेत. जास्त मागणी आहे. लोकांनीं गेल्या तीन वर्षांत दोन अडीचशें खटले आपसांत तोडले. गांवांतील तीन

वकील काम नाहीं म्हणून गांव सोडून गेले. चवथे वकील **भगवंतराव** हे खटले तोडण्याचें काम करितात. त्यांनीं आतां शेती केली असून त्यांचें चांगलें चाललें आहे. सहकारी पेढी काढली आहे. तिचें कामही तेच बघतात.

**शंकरभाऊ, अशी एकंदर हकीगत आहे.** तुझ्या पत्राला निराळें उत्तर लिहिण्याची जरूर आहे असें वाटत नाहीं; आपल्या महाराष्ट्रांतील दहाबारा जिल्हे मिळून एकंदर १३००० वर खेडीं आहेत. शिवाय वारीकसारीक वाड्या निराळ्याच. **एकेकानें एकेक गांव घेऊन कार्य केलें तर दहा-पांच वर्षांतच पृथ्वीचें नंदनवन होईल.** स्वराज्य आपल्या हातांत आहे. जास्त काय लिहूं? तुम्हीं हेंच कार्य हातीं घेऊन तें करण्याचें ठरविलें आहे हें ऐकून तुम्हांला जितके धन्यवाद द्यावेत तितके थोडेच आहेत असें वाटतें. माझा आशीर्वाद आहे. अवश्य भेटीला यावें. घर आपलें आहे. कळावें हे आशीर्वाद.

मु. ×××, जिल्हा ×××.
विजयादशमी, शके १८४८

आपला हिंदमातेचा दास,
**यज्ञेश्वर.**

( स्वावलंबन, १-११-२६ ).

---

## पुष्प दहावें

# मीही एक कैदीच आहें

सुमारें दीडशें वर्षांपूर्वी पाश्चिमात्य राष्ट्रांत दोन अत्यंत महत्त्वाच्या गोष्टी घडून आल्या. एक अमेरिकेचें स्वातंत्र्ययुद्ध व दुसरी गोष्ट म्हणजे फ्रेंच राज्यक्रांति.

**फ्रेंच राज्यक्रांति आपणांस कोणचा धडा शिकविते?** श्रीमंतांनीं, सुशिक्षितांनीं म्हणजेच राष्ट्रांतील श्रेष्ठ समजलेल्या लोकांनीं कनिष्ठ मानलेल्यांच्या योगक्षेमाची चिंता वाहिली नाहीं, म्हणजे राज्यक्रांतीसारखे अनर्थ ओढवतात. रशिया व जर्मनी या दोन देशांमधील राज्यक्रांत्या हेंच आपणांस सांगतात. **जर्मन बादशहानें** जगांतील मी मी म्हणणाऱ्या सर्व राष्ट्रांचा

पराभव करून त्यांस पाणी पाजलें. पण स्वतःच्या देशांतले अर्धपोटी व असंतुष्ट अशा लोकांना त्याला खूष ठेवतां न आल्यामुळें ऐन हातघाईच्या वेळीं त्यास देशत्याग व राज्यत्याग करून हॉलंडचा आश्रय करावा लागला! रशियाच्या झारनें हजारों लोकांना यमसदनीं पाठविलें. लक्षावधि लोकांना सायबेरियाचा तुरुंग दाखविला. ज्या सैनिकांच्या साहाय्यानें हें त्यानें केलें त्यांनींच बंदुका उलट फिरवून त्याला परलोकाला पाठविलें.

**आपण यापासून धडा शिकला पाहिजे.** गरिबांची काळजी घेण्याची ही वेळ आहे. त्यांनीं तयार केलेल्या खादीचा स्वीकार करून शिकलेल्या व श्रीमंत अशा ऐपतदारांनीं त्यांचेविषयीं सहानुभूति दाखविली नाहीं तर काळ येतांच ते श्रीमंतांवर व पांढरपेशांवर उलटल्याखेरीज रहाणार नाहींत.

**भूक हा एक मोठा जहाल पुढारी आहे.** तो त्यांना मार्ग दाखवील व ह्मणेल ' तुम्हांला मदत करतील ते तुमचे मित्र; परदेशाला साहाय्य करतील ते तुमचे शत्रु. ' स्वदेशांतील गरिबांची काळजी घेणें अगर परकीयांना सामील होणें हे दोनच मार्ग आपल्यापुढें आहेत. आपल्या स्वतःच्या हिताच्या दृष्टीनें पहिला मार्ग पत्करण्याची बुद्धि आपणांस परमेश्वर देवो!

**मी एक गरीब खादीवाला मनुष्य आहें. मी एक कैदी आहें.** हिंदुस्थानरूपी भल्या मोठ्या तुरुंगांत मला कोंडून ठेवलें आहे; म्हणून मी कैद्याला शोभेल असाच कैद्याचा पोषाख घालतों. मोटमोटे शेटसावकार मोटारी उडवतात, चैन करतात; पण तेही कैदीच. **मी पायीं चालणारा कैदी, ते मोटारींतून हिंडणारे कैदी.** दोघेही इंग्रज नोकरशाहीचे कैदीच. या कैदेंतून केव्हां सुटूं असें प्रत्येकाला झालें पाहिजे. ही कैद कपाळची सुटल्याखेरीज तीस तीस रुपयांचे जरीकांठी रुमाल घालून अगर शेंकडों रुपयांच्या कपड्यांनीं शरिराला नटवून लोकांना दिमाख दाखवण्याचा आपणांला काय अधिकार आहे? कपाळीं कुंकूं नसलेल्या पण उंची वस्त्रालंकारांनीं नटलेल्या एकाद्या विधवेकडे, ज्याप्रमाणें जग तिरस्कारानें पहातें तशीच आपली स्थिति झाली आहे.

**खादी वापरणें हें तर सरकारी नोकर, वकील, डॉक्टर वगैरे लोकांचें आद्य कर्तव्य आहे.** शेतकरी लोक कर देतात. त्यामधून सरकार आपल्या नोकरांना पगार व पेन्शनें देतें. **शेतकरी उद्यां मेला तर सरकारला कर**

कोण देईल? सरकार मग नोकरांना काय विलायतेमधून पैसा आणून त्यांतून पगार व पेन्शनें देईल? शक्य नाहीं. अर्थात् शेतकरी जिवंत ठेवावयाचा असेल तर त्याच्या श्रमानें उत्पन्न झालेली खादी वापरा. तो जिवंत राहिला तर तुम्ही रहाल. तो मेला कीं, तुम्ही ठार झालांच म्हणून समजा. **इसापनीतीमधील सोन्याचें अंडें घालणाऱ्या हंसीप्रमाणें शेतकऱ्यांची स्थिति आहे.** हंसीला मालकानें ठार मारल्याबरोबर हंसीही गेली व सोन्याचीं अंडींही गेलीं. तसें शेतकरी मेला कीं, सरकारी नोकरांचे हाल कुत्राही खाणार नाहीं. शेतकरी जागा होऊं लागला आहे. बारडोलीनें करबंदीच्या रक्ताची चटक त्याच्या तोंडाला लावली आहे. त्याची हेळसांड करण्याची आतां सोय नाहीं. —(खेड–१९२९.)

---

## पुष्प अकरावें

# ‘वेडया! तें चित्र पहा आणि हें चित्र पहा!’

(स्वराज्य—१९२९.)

‘उद्यां १२ वाजतां नव्या कोर्टांत या. काम करून टाकूं.’ आमचे एक वकील मित्र म्हणाले. ‘ठीक आहे, येतों.’ आम्हीं उत्तर दिलें.

एका संस्थेसंबंधींचें काम होतें. आमच्या एका बहिणीनें त्या संस्थेला मरणापूर्वीं कांहीं रक्कम देणगी म्हणून दिली होती. ती रक्कम मिळण्याबद्दल अर्ज करावयाचा होता. ठरलेल्या वेळीं हजार कामें बाजूला ठेवून कोर्टांत हजर राहाण्याशिवाय गत्यंतरच नव्हतें.

ठरलेल्या वेळीं कोर्टांत हजर राहिलों. अर्जाबद्दलचें सर्व विधि यथासांग झाले. संस्थेचें काम. सार्वजनिक काम. अर्थात् आमच्या मित्रानें व त्यांच्या दुसऱ्या एका वकील मित्रानें नेहमींप्रमाणें आमचें काम इतर कामें बाजूला ठेवून मोठ्या कळकळीनें करून दिलें. सर्व कामें यथाक्रम होईपर्यंत तीन वाजले.

बारा ते तीन. तीन तास. या अवधींत आमचा वेळ कसा गेला? मोठ्या मजेंत गेला. मनाची करमणूक झाली. रंगभूमीवर ज्याप्रमाणें अनेक नट येतात व जातात व त्यांचे हावभाव, पोषाख, भाषणें वगैरे गोष्टींमुळें वेळ कसा जातो हें प्रेक्षकांना कळत नाहीं, त्याप्रमाणें आमची स्थिति झाली. ते नवेजुने वृद्ध-तरुण वकील, त्यांचे कारकून व पक्षकार, या सर्वांची धांदल, त्यांचे ते नाना प्रकारचे चित्रविचित्र पोषाख, निरनिराळ्या वकिलांचीं एकमेकांशीं चाललेलीं थट्टामिश्रित विनोदी भाषणें, हे सर्व प्रकार जींत चालू होते ती लक्षावधि रुपये खर्च करून बांधलेली टोलेजंग इमारत वगैरे वगैरे गोष्टी पाहून मोठी मौज वाटली.

या तीन तासांच्या अवधींत इतरही अनेक विचार मनामध्यें आल्याशिवाय राहिले नाहींत. वैभवसंपन्न अशा प्राचीन भरतखंडाची आठवण झाली. धनधान्यादिकांच्या समृद्धीमुळें सुखी असलेल्या त्या भरतखंडांतल्या बहुजनसमाजाचें स्मरण झालें. गांवांतल्या लहानमोठ्या तंट्याबखेड्यांचे गांवांतल्या गांवांतच पंचाइतीपुढें थोड्या खर्चांत होणारे निकाल आठवले. खेडेगांवांतील मारुतीच्या देवळाचें चित्र डोळ्यांपुढें उभें राहिलें. त्या देवळांतील मारुतिरायांच्या पायांवर हात ठेवून एकमेकांशीं करार करणाऱ्या व ते भोळ्याभावानें पाळणाऱ्या गांवकऱ्यांचा देखावा दृष्टीपुढें नाचूं लागला व मन लागलींच म्हणालें, 'वेड्या! तें चित्र पहा आणि हें चित्र पहा!'

पण गतगोष्टींबद्दल वृथा खेद करून उपयोग काय? 'कालाय तस्मै नमः' हीच गोष्ट खरी. आज उत्पन्न झालेला काल बदलायचा कसा, याचाच विचार करणें जास्त शहाणपणाचें होणार नाहीं काय?

दैवदुर्विपाकामुळें आज उत्पन्न झालेला काळ कोण बदलूं शकेल? नव्या कोर्टांत आपल्या ईश्वरदत्त बुद्धिमत्तेचा कीस पाडून मोठ्या अहमहमिकेनें आपल्या अशिलांचे खटले भांडणारा वकीलवर्ग या बाबतींत कांहीं कार्य करूं शकेल काय? कां करूं शकणार नाहीं? जरूर करूं शकेल.

इतिहास चाळा व त्याला विचारा कीं, 'अरे इतिहासा! या वकिलांचे पूर्वज कोण होते तें आम्हांस सांग पाहूं. यांच्या या पूर्वजांच्या मालिकेंत तो आपल्याला ज्यांनीं रावणाला धुळींत मिळविलें ते वसिष्ठविश्वामित्रादि क्रांतिकारक दाखवील. नंदकुलाचा निःपात करणारा चाणक्य तेथेंच आपल्याला दिसेल.

विजयनगरच्या साम्राज्याची मुहूर्तमेढ रोंवणारे राजकारणधुरंधर त्याच मालिकेंत आपल्याला आढळतील. शिवकालीन व शिवकालोत्तर दादोजी कोंडदेव, मोरोपंत पिंगळे, अमात्य, साचिव, चिटणीस, देशमुख, देशपांडे, प्रल्हाद निराजी, भट पेशवे, बक्षी, फडणीस वगैरे असंख्य राजकारणपटु मुत्सद्यांची रांगची रांग इतिहासाच्या चित्रफलकाला शोभा देत असलेली आपण पाहूं.

यांच्याच वाडवडिलांनीं व आजापणजांनीं कॉंग्रेस स्थापन केली. मेथा, तय्यबजी वगैरे राजनीतिनिपुण पारशी, मुसलमान वगैरे जातींना भूषविणारे पुरुष त्यांना मिळाले व त्या सर्वांनीं या नवीन लावलेल्या रोपाची रात्रंदिवस जिवापाड मेहनत करून जोपासना केली व त्यापासून आपल्या छायेंत ब्रह्मदेशासकट अखिल भारतवर्षाला कवटाळणारा प्रचंड वृक्ष निर्माण होऊन स्वराज्याचीं मधुर फळें त्याला येण्याची आशा वाटूं लागली.

गेल्या चाळीस वर्षांत परकीयांच्या मगरमिठींत सांपडलेल्या या दुर्दैवी हिंदुस्थानाला आसेतुहिमाचल जागृति करून खडबडून कोणीं जागें केलें? तें महनीय श्रेय बऱ्याच प्रमाणांत याच वकीलवर्गाला देणें प्राप्त आहे. किंबहुना अखिल भरतभूमींतील बुद्धिमत्ता, वाक्पाटव व राजकारणकौशल्य याच वर्गांत एकवटलेलें आपणांला आढळून येईल. दीनदुबळ्या हिंदी प्रजेविषयीं अहर्निश तळमळणारा व तिच्या उद्धारार्थ दीड हात खादीच्या फडक्यानें आपली कृश झालेली शरीरयष्टि झांकून देशभर वणवण फिरणारा व आज अखिल जगताला वंद्य होऊन बसलेला **गांधी** याच वकीलवर्गानें निर्माण केला. फार कशाला? **लोकमान्यही** वकीलच होते.

‘ बरं मग पुढें काय? आपलें म्हणणें तरी काय आहे? तें एकदां कळूं द्या. ’

आमचें म्हणणें दुसरें तिसरें कांहीं नाहीं. आमची, कॉंग्रेसची, हिंदुस्थानांतल्या जनतेची–वकीलसाहेबांना एक विनंति आहे. ती इतकीच कीं, आमच्याकडे आपण पुन्हा एकदां लक्ष पुरवावें. आपण स्वतः लावलेला वृक्ष आज फळाला येण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत. अशा वेळीं त्याची हयगय करूं नये.

तुम्ही वकिली करा. म्युनिसिपालिट्यांत जा. कायदे कौन्सिलांच्या निवडणुकीला उभे राहून त्यांत प्रवेश करून घ्या. ब्रिज, बिलिअर्ड, पिंगपाँग, बॅडमिंटन खेळा. टेनिसचे सेट एकमेकांवर लावा. विनंति इतकीच कीं, वाटेल तें करा, पण काँग्रेस व तदंतर्भूत गोष्टींना विसरूं नका. तुम्ही काँग्रेसला विसरलां असलांत तरी तुम्हींच तिचे जनक, पालक, चालक व मालक आहांत, हें ती विसरली नाहीं. तिला जास्त बळकट व कार्यक्षम करा. तिचे सभासद व्हा व इतर होतील अशी खटपट करा. आरंभीं ती एक केवळ विचारविनिमय करणारी व कांहीं ठराव पास करून लोकमत प्रदर्शित करणारी संस्था होती. वंगभंगाच्या सुरवातीला प्रत्यक्ष कार्य करणारी अशी एक संस्था ती व्हावी ही कल्पना **लोकमान्यांनीं** प्रथम काढली व **महात्मा गांधींनीं** या कल्पनेला मूर्त स्वरूप दिलें. तुम्हीं मनावर घेतलेंत तर तिला याहीपेक्षां जास्त कार्यक्षम असें स्वरूप देतां येईल. तिची एक मध्यवर्ति कचेरी असावी, चिटणीस पगारी असावेत, त्यांनीं बारानबारा चोवीस तास तिचेंच कार्य करावें, एक प्रकारचें मंत्रिमंडळ बनवून त्याच्या सभासदांनीं प्रांतानिहाय कामें वांटून घेऊन तीं करावींत, अशा कल्पना निघूं लागल्या आहेत व विचार, उच्चार व आचार या क्रमानुसार त्या थोड्याबहुत प्रमाणांत अंमलांतही येऊं लागल्या आहेत. या गोष्टी जास्त उत्साहानें व परिणामकारक रीतीनें व्हावयास एकाच गोष्टीची जरूरी आहे. ती गोष्ट म्हणजे तुमचें जास्त प्रमाणांत सहकार्य. तें मिळण्याचा अवकाश, निम्में काम होईल. गेल्या १० वर्षांत अखिल भरतखंडांत जी अपूर्व जागृति व खळबळ उडून गेली तिचें बरेंचसें श्रेय वकिली सोडलेल्या कांहीं वकिलांसच होतें हें लक्षांत ठेवा.

आहे. एक अडचण आहे. ती अडचण म्हणजे खादीच्या पोषाखाची अट. ती अट निघाली नाहीं. ती निघावी असा कोणाचाही कां आग्रह असावा? वकीलवर्गाचा तर मुळींच नसावा.

हायकोर्टांत व इतर अनेक सरकारी संस्थांत एक विशेष प्रकारचाच पोषाख तेथील काम करणाऱ्या कांहीं लोकांचा असावा हा नियम जगजाहीर आहे. तो आपण मुकाट्यानें मानतों व आपणच उत्पन्न केलेल्या संस्थेची आज्ञा आपणांस जड वाटते, हें जरा विस्मयकारक नाहीं काय? शिस्त, नियम व

ते पाळण्याची जरूरी व महत्त्व यांबद्दल विवेचन करण्याची जरूरीच नाहीं. त्या गोष्टी स्वयंसिद्ध आहेत; स्वराज्य, स्वातंत्र्य वगैरे गोष्टी शिस्तपालनाशिवाय कशा आटोक्यांत येणार ? टर्की, इटली, अफगाणिस्थान यांच्या आधुनिक इतिहासाडे लक्ष द्या.

हा पोषाख खादीचाच कां असावा, हा दुसरा मुद्याचा प्रश्न सकृद्दर्शनीं सरळसा वाटतो. पण जरा खोल विचार केला तर हा प्रश्न कसा उद्भवतो हेंच कळत नाहीं. खादी म्हणजे सोळा आणे शुद्ध स्वदेशी, हें कट्टर खादीविरोधकांनींही प्रांजलपणें कबूल केलें आहे. अर्थात् देशावर प्रेम करणाऱ्या प्रत्येक सुशिक्षित व्यक्तीनें तिला शिरसावंद्य मानणें हें त्या व्यक्तीचें पवित्र कर्तव्य होय. याबद्दल दुमत असणें शक्य नाहीं. जरा सूक्ष्म विचार केला तर कोणताही सुज्ञ वकील खादीला विरोध करणें शक्य नाहीं.

‘ तुम्ही हें कां व कशावरून म्हणतां ? ’ प्रश्न सरळ आहे. खादी हा जिन्नस कोठें निर्माण होतो ? तो कोण तयार करतो ? खेडेगांवांतील शेतकरी कापूस उत्पन्न करतो. खेड्यांतील गोरगरीब लोक व वर्षभर शेतीचें काम नसणारे शेतकरी त्याचें सूत काढतात व त्या सुताचें कापड खेडेगांवांतील कोष्टी विणून बाजारांत आणतात. बरें; वकिलीचा उद्योग कोणाच्या जिवावर चालतो ? त्यांच्या बुद्धिमत्तेला व कर्तव्यकुशलतेला कोणामुळें वाव मिळतो ? त्यांचा योगक्षेम, सुखसोयी, करमणुकी, मुलाबाळांचें शिक्षण वगैरेंना आधार कोणाचा ? बऱ्याच अंशांनीं खेड्यापाड्यांत रहाणाऱ्या शेतकरी पेशाच्या बहुजनसमाजाचा. या शेतकऱ्यांनीं अगर त्यांच्या भाऊबंदांनीं निर्माण केलेल्या खादीच्या कापडाच्या खरेदींत कोणी अहमहमिकेनें भाग घेतला पाहिजे ?

ऐपत, स्वदेशप्रेम, कृतज्ञताबुद्धि व दूरदृष्टि वगैरेपैकीं कोणतीही गोष्ट लक्षांत घ्या; खादी वापरण्यांत भूषण मानणें, नव्हे तिला आश्रय न देणें हें एक महापातक समजणें हें प्रत्येक वकिलाचें कर्तव्य होय. वकील अजून मोठ्या प्रमाणांत खादी वापरूं लागले नाहींत हा दोष त्यांचा नव्हे. तुमचा योगक्षेम ज्यांच्यावर अवलंबून आहे, तुमचा योग्य तो मेहनताना देण्यासाठीं ज्यांनीं मूर्खपणानें कां होईना आपल्या घरादारांचा प्रसंगीं लिलांव करून आपली भांडकुदळपणाची हौस फेडून घेतली, असा खेड्यापाड्यांतील शेतकरीवर्ग व

त्यांचे भाईबंद यांच्याविषयींच्या कृतज्ञताबुद्धींतून तुमच्या खादीविषयींच्या कर्तव्याचें उत्तर निघतें, हें साधें गणिताचें त्रैराशिक अजून कोणीं व्यवस्थित रीतीनें त्यांना पटवून न दिल्यामुळें हा सर्व घोंटाळा झाला असावा. या कारणाशिवाय इतर अनेक कारणें आहेत; पण हें एकच इतकें भरभक्कम कारण आहे कीं, दुसरीं कारणें नमूद करण्याची जरूरीच नाहीं.

तात्पर्य, विनंति इतकीच कीं, सर्व वकिलांनीं कॉंग्रेसचे सभासद व्हावें; इतरांचें त्याबद्दल मन वळवावें; निदान कॉंग्रेसच्या सभांत व कोर्टांत ( ओळखतां येणार नाहीं इतकी उत्तम खादी आतां मिळते व अत्यंत साधा पोषाख करूनही यशस्वी रीतीनें काम करणारे आज अनेक वकील आहेत ) जरूर खादीचाच पोषाख वापरावा. आज देशाला, शिस्त जाणणाऱ्या व ती पाळणाऱ्या स्वयंसैन्याची जरूर आहे. असें स्वयंसैन्य उभारण्याला तुम्हीं मदत करावी. या सैन्यांतील मानांच्या जागा घ्याव्यात. तुम्ही या सैन्याचे घटक झालांत कीं, त्याला एक प्रकारची इभ्रत येईल व मग शेंकड्यांनीं—नव्हे हजारांनीं, बहुजनसमाजांतील लोक स्वयंसैनिक होऊन राष्ट्रही शिस्तवान् अशा एका व्यवस्थित, संघटित व कार्यक्षम स्वयंसैन्याची छावणी बनेल; आणि मग अशा प्रकारच्या बुद्धिमान्, स्वार्थत्यागी व देशावर प्रेम करणाऱ्या स्वतंत्रवृत्तीच्या पुढाऱ्यांनीं नेतृत्व पत्करलेलें राष्ट्र कोणतें कार्य करूं शकणार नाहीं? स्वराज्य, स्वातंत्र्य यांच्याविषयीं पोकळ ठराव त्या वेळीं पास करण्याची जरूरी पडणार नाहीं. या गोष्टी न मागतां तुम्हीं स्वतःच्या बळानें मिळविल्याचा स्फूर्तिदायक देखावा जगाला दिसेल व स्वर्गांत दादाभाई नौरोजी, रानडे, गोखले, मेथा, टिळक, लजपतराय, देशबंधु दास वगैरे आनंदाचे अश्रु ढाळतील.

## पुष्प बारावें

# देशासाठीं आम्हीं फकीरी घेतली आहे

( स्वावलंबन—१-११-१९२५. )

**महात्माजींची इच्छा कीं, महाराष्ट्रानें खादीचा स्वीकार करावा.** परप्रांतीय व्यक्तीनें येऊन आम्हांस आमचें कर्तव्य शिकवावें ही गोष्ट आम्हांस मानहानीची वाटते. राष्ट्रीय सभा स्थापन होण्यापूर्वींच महाराष्ट्रानें स्वदेशीचें शिंग फुंकलें. कालांतरानें या शिंगाचे प्रतिध्वनि अन्य प्रांतांमधून ऐकूं येऊं लागले. वंगभंगाचे चळवळींत भारतवासियांनीं कमालीचा स्वार्थत्याग करून या चळवळीस पुढें ढकलण्याचा प्रयत्न केला. अनुभवानें असें ठरलें कीं, स्वदेशीचें शुद्ध व परिणत स्वरूप म्हणजे हातसुताची, हातमागावर विणलेली खादी. **महात्माजींच्या** ही गोष्ट लक्षांत आली. त्यांनीं खादीची चळवळ यशस्वी करण्याचा विडा उचलून आपल्या देशबांधवांपुढें अत्यंत नम्रतापूर्वक साहाय्याची याचना केली. महाराष्ट्राची खात्री झाली पाहिजे. खादीचे बाबतींतही सर्व प्रांतांच्या पुढें गेल्यावांचून तुकारामरामदासांचा व चिपळूणकर-लोकमान्यांचा महाराष्ट्र केव्हांही सोडणार नाहीं, अशा अर्थाचे उद्गार त्यांनीं अनेकवार काढलेले आहेत. **महाराष्ट्रा! साबरमतीकांठच्या या संताच्या झोळींत तूं एवढी खादीची भिक्षा घालणार नाहींस काय ?**

आम्हांस इतिहास विसरून कसें चालेल? शिवकालापासूनचीच गोष्ट घेऊं. **महाराजांनीं देशासाठीं फकिरी घेतली.** चालून आलेल्या आरामशीर जहागिरीवर लाथ मारून विचारी म्हणविणाऱ्या पुरुषांस अशक्य वाटणारी स्वराज्यसंस्थापनेची गोष्ट शक्य करून दाखविली. संभाजीच्या वधानंतर औरंगशहाच्या अफाट सैन्यास मराठ्यांनीं नामोहरम केलें. पेशव्यांच्या अमदानींत मराठ्यांचा भगवा झेंडा अटकेवर फडकून स्वराज्याचें साम्राज्यांत रूपांतर झालें. या सर्व गोष्टी राष्ट्रानें कशाच्या जोरावर केल्या? स्वराज्य नाहींसें झालें याचें तरी कारण काय? याला एकच उत्तर. आमची साधी,

काटक राहणी व धाडसाची, स्वावलंबी, संग्राहक वृत्ति कायम होती तोंवर स्वराज्य भरभराटलें. ती नाहींशी होत चालली तेव्हां त्याला उतरती कळा लागली. तिचा अंत होतांच स्वराज्याचा अंत झाला. या स्वतंत्र, स्वावलंबी बाण्याचें पुनरुज्जीवन झाल्याशिवाय स्वराज्याचे मार्गाला आम्ही कसे लागणार? बेगुमान स्वदेशी अगर परकीय भांडवलवाल्यांची मदत, परदेशीय यंत्रसामग्री, रेल्वे अधिकाऱ्यांची लहर व सरकारी अधिकाऱ्यांची मर्जी वगैरे परावलंबी गोष्टींवर ज्यांचा योगक्षेम अवलंबून नाहीं, अशा खादीचरख्यांचा मंत्र राष्ट्रास उपदेशिण्यांत तरी राष्ट्रांत स्वतंत्र वृत्तीचा उगम व्हावा याशिवाय **गांधीजींचा** दुसरा कोणता हेतु असणार?

चरखा व खादी यांचा बीजवृक्षाप्रमाणें अन्योन्य संबंध आहे. कोयीखेरीज आम्रवृक्ष संभवतच नाहीं. त्याप्रमाणें चरख्याच्या सार्वत्रिक प्रसाराखेरीज शुद्ध खादीची पुरेशी निपज कशी होणार? आज आपल्या देशांत लक्षावधि हातमाग आहेत. देशांत उत्पन्न होणारें निम्में कापड यांवर निघतें. पण सूत मात्र बहुतेक परदेशी. मुख्य अडचण सुताची आहे. चरख्यांचा सार्वत्रिक प्रसार करून सुताचा प्रश्न सोडविणें हें **महात्माजींनीं** आपल्यापुढें ध्येय ठेवलें आहे.

पण हे चरखे चालवावयाचे कोणीं? दोन तीन रुपयांपर्यंत रोजमुरा मिळविणाऱ्या मजुरांनीं! रोजीं दोन तीन रुपयांपासून शेंकडों रुपयांपर्यंत खिशांत टाकणाऱ्या नोकर, व्यापारी, वकील, डॉक्टर, बॅरिस्टरादि पांढरपेशांनीं? कां गजांत लक्ष्मींत लोळणाऱ्या राजेमहाराजांनीं? काय या सर्वांनीं रोजीं तीन चार आणेच देणाऱ्या चरख्याचें चाक तासानुतास फिरवीत बसावें? छे! छे! महाराज, **गांधीजींनीं** असें कधींच कोणाला सांगितलें नाहीं.

त्यांची याचना इतकीच--आज देशांतील लोकांचे तीन वर्ग करतां येतील- ( १ ) ज्यांना बारमहा कांहीं काम नसतें व जे आपला वेळ निव्वळ आळसांत घालवितात असे लोक. खालावलेल्या पांढरपेशांच्या स्त्रियांचाही यांत अंतर्भाव करतां येईल. त्या मजुरीसाठीं बाहेर जाऊं शकत नाहींत. चरख्याच्या साहाय्यानें यांना दरमहा पांचसहा रुपये मिळाल्यास त्यांचा फायदा होऊन सुताचा प्रश्न सोडविण्यास मदत होईल. ( २ ) वर्षांतून ७।८ महिने घरीं अगर दुसरीकडे मजुरी करून पोट भरणारे लोक; हे चार

महिने रिकामे असतात. यांपैकीं कांहीं शहरांमध्यें मोलमजुरीसाठीं जातात. पण सर्वच जात नाहींत. यांना चरखे अगर हातमाग चालवून प्रपंचास मदत करतां येण्यास हरकत नाहीं. तीन चार आण्यांपेक्षां जास्त मजुरी मिळत नाहीं, अशा बायकांसही चरखा घरबसल्या तितकीच मजुरी देऊं शकेल. पुरुषांस हातमाग ८ ते १२ आणे देईल. ( ३ ) तिसरा वर्ग किफायतशीर धंदे करणाऱ्या पांढरपेशांचा व गर्भश्रीमंतांचा. यांतील लोकांनीं उदाहरण घालून देण्यासाठीं राष्ट्रधर्म म्हणून अर्धापाऊण तास सूत कांतावें व तें राष्ट्रास अर्पण करून स्वस्त खादीची निपज करण्यास मदत करावी, असें **गांधीजींचें** म्हणणें आहे.

पण हें व्हावयाचें कसें? महाराष्ट्राला तरी यांत अडचण दिसण्याचें कारण नाहीं. स्वराज्याचे कालांत त्यानें अतुल स्वार्थत्याग करून संघटनाचातुर्य दाखविलें आहे. जें मागें करीत होतों तेंच आतां करावयाचें—यांत कठीण तें काय आहे? पूर्वींचीं साधनें निराळीं होतीं. आजच्या परिस्थितीप्रमाणें निराळ्या साधनांचा उपयोग करावा लागत आहे. कार्य तेंच. संघटना करून स्वातंत्र्य व स्वावलंबन—ज्याला आपण असहयोग हें नांव दिलें—यांची वृत्ति उत्पन्न करून स्वराज्य मिळविणें हेंच तें पूर्वींचें ध्येय व जीवर चालू व भावी पिढ्यांचें अस्तित्व व अन्न अवलंबून आहेत ती स्वावलंबी वृत्ति निर्माण करण्यासाठीं येवढा हा अल्प स्वार्थत्याग करण्याची आमची तयारी नसेल तर ‘ बस्स करा त्या स्वराज्याच्या बाता ’ असेंच म्हणावें लागेल!

महायुद्धांत स्वतंत्र राष्ट्रांनीं काय केलें? स्वातंत्र्य कायम ठेवण्यासाठीं राजापासून रंकापर्यंत त्यांनीं स्वार्थत्याग केला नाहीं काय? स्वातंत्र्य फुकटचें नाहीं. आपलीही आपल्या परिस्थितीप्रमाणें वागणूक होणें जरूर आहे. आपण आपल्या गरजा कमी केल्या पाहिजेत. पोशाखादिकांचे बाबतींत आपल्या संवयी बदलावयास नकोत काय? स्वराज्य नाहीं, सौख्य नाहीं, कोट्यवधि देशबांधव अर्धपोटीं, अशा स्थितींत दागदागिने व कपडेलत्ते यांचा नट्टापट्टा दाखवावयाचा तरी कोणाला?

तात्पर्य, परिस्थिति ओळखून आपण वागलें पाहिजे. आपल्या पूर्वजांनीं पूर्वीं असेंच केलें. **रामधर्मराजादिकांनीं** वल्कलें नेसून वनवास भोगले. **शिवाजीराजांनीं** फकिरी घेतली. **प्रतापसिंहानें** सुखशय्येचा त्याग केला.

तान्हाजीनें मुलाचें लग्न दूर सारून कोंडाण्यावर शत्रूच्या समशेरीशीं स्वतःचें लग्न लावलें. थोरल्या बाजीरावानें हुरड्यावर दिवस काढून दिल्ली गांठली. स्वराज्य उगीच मिळत नसतें.

महात्मा गांधी पंचा नेसून उघडेबोडके देशभर वणवण फिरत आहेत. उद्देश काय? काय, त्यांना उंची कपडे, पगड्या व फेटे मिळणार नाहींत? काय, त्यांना वेड लागलें आहे, कां ते पागल बनले आहेत? नाहीं; त्यांचा कट्टा दुष्मन् सुद्धां असें म्हणूं शकणार नाहीं.

आज देशांत शुद्ध खादी पुरेशी निघत नाहीं. फॅशन बोकाळली आहे. इला आळा बसावा; लोकांनीं अंथरूण बघून पाय पसरावेत; साध्या राहणीचा प्रसार व्हावा; इतरांस उदाहरण व्हावें, याशिवाय त्यांचे मनांत दुसरा हेतु कोणता असणार?

पांढरपेशांनीं रोज अर्धा तास राष्ट्राला देऊन खादीच्या साहाय्यानें परदेशी कापडाच्या बहिष्काराला मदत करावी. स्वाभिमानी पांढरपेशांनीं खेडेगांवांत वसति करून चरखे व हातमाग यांचा प्रसार करावा व गरिबांच्या पोटापाण्याचा प्रश्न सोडविण्याचें पुण्य संपादन करावें, एवढीच त्यांची मागणी आहे! महाराष्ट्रा! महात्माजींची ही मागणी तूं पुरविशील काय?

---

## पुष्प तेरावें

# एष पन्था, एतत्कर्म

( स्वावलंबन—१-३-१९२६ )

स्वराज्य हा जन्मसिद्ध हक्क; घोषणा मनमुराद झाली. पुढें काय? मुख्य प्रश्न हाच—हा हक्क हातीं कसा पडणार? सनदशीर (!) मार्गांनीं? अशक्य. त्रिवार अशक्य. हा प्रयोग होऊन गेला. हा मार्गच अगोदर निसर्गविरुद्ध. भिक्षांदेही कधीं काळीं राज्याच्या देवघेवींत फलदायी झाल्याचें कोणीं ऐकलें

आहे? वाटल्यास शिवाजीरामदासांस विचारा; जरूर तर मॅझिनी-गॅरी-बॉल्डींची साक्ष काढा; एवढ्यानेंहि न झाल्यास वॉशिंग्टनादिकांचा सल्ला घ्या. एकच उत्तर व तें हें कीं, 'बाबांनो, स्वराज्याची मागणी करणाऱ्यांच्या पाठीशीं सामर्थ्य असेल तर मागणीही करण्याची जरूर पडत नाहीं; नसेल तर कितीही कंठशोष करा, नकार घंटा ठरलेली!'

पुढें काय? राष्ट्रानें हरि हरि म्हणत स्वस्थ बसावें? कोण म्हणतो? स्वस्थ बसून काय मिळणार? मग यांला उपाय? उपाय आहे. जातीच्या ब्राह्मणांनीं कर्मानेंही ब्राह्मण झालें पाहिजे. सर्व जबाबदारी ब्राह्मणवर्गावर आहे. ब्राह्मणवर्ग म्हणजे कमानीचा मधला दगड. तो निखळला कीं, कमान ढांसळलीच. या वर्गानें आपलें परंपरागत स्थान स्वीकारलें म्हणजे इतर वर्ग आपोआपच ताळ्यावर येतील. हिंदुस्थान म्हटला म्हणजे दरिद्री, अर्धपोटीं राहणाऱ्या लोकांचा देश. हे लोक मुख्यत्वेंकरून खेडेगांवांत राहतात. यांची सध्यांची स्थिति फारच अनुकंपनीय झालेली आहे. यांना देश नाहीं, धर्म नाहीं, देशभक्ति नाहीं अशी यांची स्थिति. मिळेल तो भाकरतुकडा पोटांत भरावा व कसा तरी काळ कंठावा! ही स्थिति सुधारली पाहिजे. स्वाभिमानाची जागती ज्योत त्यांच्यांत उत्पन्न करणें जरूर आहे. पारतंत्र्य म्हणजे नरकवास, ही भावना त्यांना पटवून दिली पाहिजे. त्यांच्या संसाराला थोडी मदत होऊन त्यांची इहलोकची यात्रा जो थोडीफार सुखावह करूं शकेल त्यालाच वरील गोष्ट साध्य होईल.

ही गोष्ट इतरवर्णीय लोक करूं शकणार नाहींत असें नाहीं. त्यांना ही गोष्ट साधल्यास त्यांनीं इकडे अवश्यमेव लक्ष द्यावें. आमच्या मतें ज्यांच्या अनेक पिढ्यांस साध्या राहणीनें राहून उच्च आचरणाची व विचारसरणीची संवय आहे, त्यांना इतरांपेक्षां ही गोष्ट जास्त चांगली साधेल. मात्र रडतराऊत या कार्याला उपयोगाचे नाहींत. हा धकाधकीचा मामला आहे. ही सुळावरची पोळी आहे. हा फांसावरचा घांस आहे. या कार्यावर ज्यांची निष्ठा असेल त्यांनींच यांत पडावें. भलत्यांनीं श्रद्धा नसतां यांत पडून कार्यनाश करूं नये.

पण पोटाची वाट काय? अगोदर पोटोबा, मग विठोबा! याला उत्तरें दोन. 'भजति नर अनन्य जे मातें । धनंजया! मी चालविं त्यांच्या योगक्षेमातें ॥' हें पहिलें उत्तर. हें उत्तर बिनतोड आहे. मात्र ईश्वरावर श्रद्धा

असेल त्याला. स्थिरचर व्यापून भगवान् दशांगुळें उरला आहे. जनता हें त्याचें मूर्त स्वरूप. या जनार्दनाची निष्काम भावनेनें जो चाकरी करतो त्याला भाकरीची कधींच उणीव पडत नाहीं. हा सनातन त्रिकालाबाधित सिद्धांत आहे. भगवंतांनीं दिलेली ही अखंड फलदायिनी सनद आहे.

‘ आमचा या तुमच्या सनदेवर बिलकुल विश्वास नाहीं. कोरड्या थापा आम्हांला देऊं नका. दुपारचे बारा वाजले म्हणजे तुमची सनद रहाते बाजूला. ’ असें कांहीं म्हणतील. ठीक आहे. आमचे जवळ दुसरें उत्तर आहे. नाहीं तुमचा ईश्वरावर विश्वास तरी कांहीं हरकत नाहीं. त्याबद्दल आम्ही तुम्हांला दोष देणार नाहीं. कारण आम्ही जाणतों कीं, पाश्चिमात्य संस्कृतीच्या प्रचंड लोंढ्यांत सांपडून तुम्ही, किंचित्कालपर्यंत कां होईना, सनातन हिंदुधर्माच्या उच्च भूमिकेवरून च्युत झालां आहांत. दोष तुमचा नाहीं. [illegible] [illegible] जातील. काल अनंत आहे. ईश्वराच्या कृपेला मर्यादा नाहीं.

तुमच्या प्रश्नाला महात्मा गांधी यांनीं दुसरें उत्तर दिलें आहे. ‘ चरखा व खादी ’ हें त्यांचें उत्तर. हें वाचून कांहीं लोक प्रथम हंसणारच. आम्हांला त्याचें दुःख नाहीं. आमची सर्व गोष्टीला तयारी आहे. कारण आम्हांस बालंबाल खात्री आहे कीं, शेवटीं आमच्याच कार्याचा विजय व्हावयाचा आहे. प्रश्न फक्त कालाचा आहे. विजय हा ठरलेला. आणि विजय कां मिळणार नाहीं? विजयाबद्दल शंका केव्हां असते? ज्या वेळीं कोणतीही गोष्ट दुसऱ्यावर अवलंबून असते त्या वेळीं. गिरण्या फायदेशीर होतील का? शंका आहे. कां? कारण त्यांचें यश परकीय यंत्रें, परकीय तज्ज्ञ, सरकारची मर्जी, रेल्वेची लहर, संपांचा अभाव इत्यादि गोष्टींवर अवलंबून. लेख लिहून, व्याख्यानें झोडून, ठरावांचीं भेंडोळीं पाठवून स्वराज्य मिळेल का? शंका कां, नाहीं अशीच खात्री आहे; कारण सर्वच कार्यक्रम परावलंबी. अशीं कित्येक उदाहरणें देतां येतील. खादीचें मात्र असें नाहीं. कारण खादींत स्वावलंबन आहे, खादींत स्वाभिमान आहे, खादींत धर्म आहे, खादींत संघ-टण आहे, आणि म्हणून खादींत स्वराज्य व स्वातंत्र्यही आहे. जरा चिकाटी धरा म्हणजे तुमची खात्री होईल. जरा अनुभव घ्या म्हणजे ही गोष्ट किती सुलभ आहे याची तुम्हांस प्रचीति येईल. झाडाच्या खांदीला आपण कवटाळून बसलों आहों. ती सोडण्याचा अवकाश, कीं मुक्त झालोंच.

आपण जरा समतोल बुद्धीनें विचार करूं या. हिंदुस्थानची लोकसंख्या किती ? बत्तीस कोट. शहरांतील लोकसंख्या अदमासें चार कोट वगळून बाकीचे अठ्ठावीस कोट सात साडेसात लक्ष खेडयांत विभागल्यास प्रत्येक खेडयाच्या वांटणीस सरासरीनें किती लोक येतील ? अदमासें चारशें. यांस सालिना किती कापड लागेल ? प्रत्येकीं सामान्यतः वीस वार कापड धरून एका गांवास आठ हजार वार कापड लागेल. रोजीं एक माग सरासरीनें हातसुताचें दहा वार कापड काढूं शकतो व ह्या हिशेबानें सुट्टया, सणवार, आजार वगैरे खाडे वगळून वर्षांत कामाचे ३०० च दिवस धरल्यास एक माग दरसाल ३००० वार कापड काढील. म्हणजे कापडाचे बाबतींत स्वावलंबी होण्यास प्रत्येक गांवांत तीन माग असले म्हणजे झालें. या तिन्हींपैकीं एक माग आमच्या ब्राह्मणवृत्तीच्या कार्यकर्त्या माणसानें चालवावा. त्याचा पोटाचा प्रश्न सुटेल.

म्हणजे ! तुमचें म्हणणें तरी काय ? ब्रह्मकुलोत्पन्न पुरुषानें कोष्ट्याचें काम करावें ? होय. बेलाशक करावें. वीतभर पोटाची खांच भरण्यासाठीं परकीयांची गुलामगिरी करण्यापेक्षां इतर वाटेल तें करावें; व त्यांतल्या त्यांत देशाला ज्याची आज जरूर आहे व जें करण्यास दुसरें कोणी धजत नाहीं तें कार्य तर ब्राह्मणांनीं अगोदर करावें. तें त्यांचें आद्य कर्तव्य आहे. त्यांतच त्यांचा मोठेपणा आहे.

आज देशाला कशाची जरूरी आहे ? देशाला ग्रामसंघटणेची जरूरी आहे. देशाला भाकरीची जरूरी आहे. ही भाकरी देणाऱ्या धंद्याची, खादीच्या धंद्याची, देशाला जरूरी आहे. देश आज पाऊणशें ऐशीं कोटींचें कापड परदेशांतून विकत घेतो. हा पैसा देशांतल्या देशांत राहील अशी तजवीज होणें जरूर आहे. हें कापड येथेंच कांतल्या जाणाऱ्या सुताचें विणलें गेलें तर किती बहार होणार आहे ! आज हिंदुस्थानांत लक्षावधि कोष्टी आहेत. दुर्दैवानें ते परदेशी सुताचा उपयोग करतात. त्यांत त्यांचा दोष नाहीं. बोलून चालून ते अडाणी. त्यांना दूरवर विचार कोठून असणार ? त्यांना हातसूत हातीं धरावेंसें वाटत नाहीं; कारण त्यांना राष्ट्रीय दृष्टि नाहीं. ती ताकद ज्यांत आहे, त्यांनीं या धंद्यांत मन घालून अडाणी कोष्ट्यांस उदाहरण घालून देणें जरूर आहे. हातसुताचें कापड विणणें हेंच राष्ट्राचे दृष्टीनें फायदेशीर आहे हें स्वतःचे उदाहरणानें

त्यांच्या नजरेस आणून दिल्यास ते आपोआप इकडे वळतील. खानदेशांत आज प्रत्यक्ष ही गोष्ट घडून येत आहे. त्याचेंच इतरत्र अनुकरण झालें पाहिजे.

'मागावर पोट भरूं शकेल काय?' निर्वाहापुरतें अन्न–आच्छादन मिळूं शकेल. एक माग रोजीं कमींत कमी आठ वार कापड विणूं शकतो. वारामागें दोन ते तीन आणे मजुरी पडते. या हिशेबानें रोजीं एक ते दीड रुपाया मजुरी मिळूं शकेल. पुन्हा ही गोष्ट ज्या वेळीं हातसुताचा दर्जा अत्यंत निकृष्ट प्रकारचा आहे त्या दिवसांतील आहे. जसजशी हातसुतांत सुधारणा होत जाईल तसतसें रोजच्या विणीचें प्रमाण वाढत जाईल, यांत शंका नाहीं. उत्तम हातसुताचें रोजीं वीस वार कापड विणल्याचीं उदाहरणें आम्हांस माहीत आहेत. हातसुतांतही गेल्या तीन वर्षांत विलक्षण सुधारणा झाली आहे. महात्माजींनीं 'सुतास मत' ठेवल्याचा हा प्रभाव आहे. तात्पर्य, हातमागावर खेडेगांवांत पोट भरून आयुष्यांत दहा पांच वर्षांची भर पडल्याशिवाय रहाणार नाहीं.

## पुष्प चवदावें

# सुतानें स्वराज्य

गुरु गांधि वाजवी मुरली । या मुरलिंत जादू भरली ।
चिंता हरली ॥ गुरु गांधि० ॥ ध्रु० ॥
आणिलें चक्र हातांत । जें होतें वैकुंठांत ।
हें करिल यांत्रिकां चीत । ग्रहदशा सरली ॥ १ ॥
चक्रावर काढूं सूत । हें सूत निवारिल शीत ।
भरपूर अन्न पोटांत । जनता तरली ॥ २ ॥—विष्णु शाहीर.

" A nation, that can save sixty crores of rupees per year and distribute that large sum amongst its spinners and weavers in their own homes, will have acquired powers of organisation and industry, that must enable it to do everything else necessary for its organic growth. "

—M. K. Gandhi.

आतां ते जपानी अगर विलायती सूत वापरतात. या लोकांना चांगल्या हात-सुताचा पुरवठा केला पाहिजे व तेंच विणणें फायदेशीर आहे हें त्यांस पटवून दिलें पाहिजे.

आतां प्रश्न असा उद्भवतो कीं, इतकें कापड तयार होण्यास लागणारें हातसूत येथें उत्पन्न होऊं शकेल कीं नाहीं व तें विणणें फायदेशीर होईल कीं नाहीं? या बाबतींत आम्हीं जो अनुभव घेतला आहे त्यावरून असें निश्चयपूर्वक म्हणू शकतों कीं, या दोन्ही गोष्टी शक्य असून त्या फायदेशीरही होऊं शकतात. मात्र हें कार्य करणाऱ्या माणसांचे अंगीं ध्येयनिष्ठा, दृढनिश्चय व चिकाटी हे गुण असले पाहिजेत.

तात्पर्य, खेड्यांतील लक्षावधि गोरगरिबांच्या संसाराचा प्रश्न हलका झाल्या-शिवाय लोकांत त्राण उत्पन्न होणार नाहीं. ही गोष्ट सुशिक्षित लोकांनीं केली तरच त्यांच्यावर व त्यांच्या कार्यक्रमावर जनतेचें प्रेम बसेल. आज चरखाप्रसार व खादीनिपजच ही गोष्ट घडवून आणतील. या गोष्टी साध्य करण्यासाठीं जनतेंत फार मोठ्या प्रमाणावर जागृति व संघटना करावी लागेल. लोकांत स्वाभिमान व उद्यमशीलता हे गुण उत्पन्न होतील. परदेशी काप-डाचा बहिष्कार साध्य होईल. इंग्रजांच्या खिशाला चट्टा बसेल व ही गोष्ट जे लोक साध्य करतील ते स्वतःची एकी, स्वतंत्र बाणा व उद्योगप्रियता या गुणांच्या जोरावर जगांतील अत्यंत कठोर अशा पाशवी सामर्थ्यासही लोटां-गण घालावयाला भाग पाडतील; असा आमच्या दृष्टीनें सूत व स्वराज्य यांचा संबंध आहे. [ स्वावलंबन–१।४।२६. ]



# पुष्प पंधरावें

## –देह जाईल, जाईल । त्यासि काळोबा खाईल –

काया हे पंढरी, आत्मा हा विठ्ठल । नांदतो केवळ, पांडुरंग ॥
—श्रीएकनाथ.

**ईश्वराची लीला अगाध आहे.** जगाच्या इतिहासाचें बारकाईनें निरीक्षण करा, म्हणजे ही गोष्ट आपल्या लक्षांत येईल. जगाचा इतिहास आपणांस काय सांगतो? तो हेंच सांगतो कीं, 'हे मनुष्या! या पृथ्वीतलावरील मी मी म्हणविणारीं मोठमोठीं राष्ट्रें नामशेष झालीं आहेत; अखिल मानवजातीला सळो कीं पळो करून सोडणारे रोमन लोक आज कोठें आहेत? कालाच्या उदरांत ते गडप झाले. ग्रीस देशाचें तें प्राचीन वैभव! काय त्याचा बोलबाला! अरिस्टॉटल, प्लेटो, सॉक्रेटीस वगैरे विद्वद्रत्नांनीं विभूषित झालेलें तें राष्ट्र आम्हांला दाखवा पाहूं. शक्य नाहीं.

'देह जाईल, जाईल । त्यासि काळोबा खाईल ।'

या उक्तीप्रमाणें ग्रीक लोकही आज काळानें पचवून टाकलेले आहेत. तीच गत इराणची. तशीच मिसर देशाची. किती नांवें सांगावींत? पण आमचें भरतखंड? ईश्वरकृपेनें अजून तें हयात आहे. तें नामशेष झालेलें नाहीं; आणि म्हणूनच म्हणतों कीं, ईश्वराची लीला अगाध आहे.

**भरतखंड,**–ज्याला सुवर्णभूमि हें अन्वर्थक नांव प्राप्त झालें होतें–तें भरतखंड अजून हयात आहे, अस्तित्वांत आहे, ही गोष्ट सत्य आहे; पण कोणच्या स्थितींत आज तें आपला काल कंठीत आहे? आपल्या ज्ञानानें, आपल्या वैभवानें व आपल्या पराक्रमानें अखिल जगाला दिपवून टाकणारी ती भरतभूमि आज परतंत्र आहे. जगाच्या बाजारांत आज तिला किंमत नाहीं, भाव नाहीं. कारण पारतंत्र्याचा शिक्का आज तिच्या कपाळावर मारला गेला आहे. 'नरकवास पुरवला; पण हें परक्यांचें जूं मानेवर नको; तें शत-गुणांनीं जाच करतें' असा स्पष्ट अभिप्राय कविश्रेष्ठ मोरोपंतांनीं दिला आहे.

" एकाला तिघे मुलगे होते. मरतांना तो त्यांस म्हणाला, ' बाबांनो! आपल्या शेतांत मी पांचशें मोहरा पुरून ठेवल्या आहेत. माझ्या मागें त्या तिघांत वांटून घ्या. मुलांनीं सर्व शेत खणून खालचें वर केलें; मोहरा सांपडल्या नाहींत, पण त्या सालीं इतकें उत्कृष्ट पीक आलें कीं, त्याची किंमत पांचशें मोहरांच्या दुप्पट झाली. " —एक जुनी गोष्ट.

**प्रश्न मोठा नाजूक आहे;** कारण या प्रश्नावर आजपर्यंत मोठमोठ्या देशभक्तांनीं आपली पुण्याई खर्च केली आहे. अशा स्थितींत आमच्यासारख्या सामान्य मनुष्यानें या प्रश्नाला हात घालणें म्हणजे मोठेंच धाडसाचें काम आहे. तथापि, कार्याच्या नाजूकपणापेक्षांही त्याचें महत्त्व शतपटीनें अधिक असल्यामुळें हा प्रश्न हातीं आज घेतला आहे.

इंग्लिश भाषेंत 'All roads lead to Rome' अशी एक म्हण आहे. कोणत्याही मार्गानें जा, तुम्ही रोम शहरीं जाऊन पोहोंचाल, असा या म्हणीचा तात्पर्यार्थ आहे. तीच गोष्ट स्वराज्याची. कोणताही प्रश्न घ्या. सरतेशेवटीं त्याचा कोणत्याना कोणत्या तरी कारणानें स्वराज्याशीं संबंध येऊन पोहोंचतो. इतका हा स्वराज्याचा प्रश्न जिव्हाळ्याचा होऊन बसलेला आहे.

**हें स्वराज्य मिळावयाचें कसें?** स्वतः मेल्याशिवाय जसा स्वर्ग दिसत नाहीं, तद्वतच मुमुक्षू राष्ट्रानें स्वतः झिजून तपश्चर्या केल्याशिवाय स्वराज्य मिळणें अशक्य. मूठभर लोकांच्या प्रयत्नानें राज्य मिळणें कठीण! मिळालेंच दैववशात् तर टिकत नाहीं. इतिहासाचा हा अनुभव आहे. राज्यकर्ते अडचणींत आले म्हणजे स्वराज्य मिळेल अशी कांहीं लोकांची समजूत. दुसऱ्याच्या अपकर्षावर आपल्या उत्कर्षाची इमारत उभारण्याची समजूत मुळांतच आम्हांला नामर्दपणाची वाटते. दुसरी गोष्ट अशी कीं, एक परकीय राज्यकर्ता गेला तर त्याची ज़ागा घ्यावयाला दुसरा तयार असेलच. राष्ट्रांतल्या बहुजनसमाजाची जोंवर शारीरिक, मानसिक, नैतिक, धार्मिक व आर्थिक दृष्ट्या कांहीं विशिष्ट प्रमाणांत प्रगति झालेली नाहीं तोंवर कांहीं तरी अकल्पित गोष्ट घडून येईल व स्वराज्य मिळेल, ही कल्पनाच खोटी.

**ही सर्वांगिण उन्नति व्हावी कशी?** स्वराज्य मिळविण्याची लायकी आंगीं येण्यासाठीं राष्ट्रांत जी स्वातंत्र्यलालसा, स्वाभिमानाची वृत्ति व आत्मविश्वास वगैरे सद्गुण असणें जरूर आहे ते काय केलें असतां उत्पन्न होतील?

आमच्या दृष्टीनें कापडाचा प्रश्न सोडवून त्या बाबतींत पूर्णपणें स्वावलंबी व स्वतंत्र होणें ही एकच गोष्ट अशी आहे कीं, जी वरील हेतु तडीस नेण्यास आपणांस मदत करील. पूर्वीं दरसाल फक्त ६०।६५ कोटींचेंच परदेशी कापड आपण विकत घेत होतों. आज या रकमेंत आणखी ५।१० कोटींची भरच पडलेली आहे. या बाबतींत राष्ट्रापुढें केवढें प्रचंड कार्यक्षेत्र तयार आहे! राष्ट्रानें मनावर मात्र ही गोष्ट घेतली पाहिजे.

परदेशी कापडाचा बहिष्कार घडवून आणण्याचा प्रयत्न करणें ही गोष्ट काय करूं शकणार नाहीं? इंग्लंडच्या राजानें अठराव्या शतकांत अमेरिकन लोकांवर जुलूम केला; त्यांनीं इंग्लंडच्या मालावर बहिष्कार घालण्याचें ठरविलें. बंदरांतील जहाजांवर असलेल्या चहाच्या शेंकडों पेट्या समुद्रांत टाकल्या. आर्थिक व राजकीय बाबतींत स्वतंत्र होण्याचा निश्चय केला. सतत १०।१२ वर्षें चिकाटीचा प्रयत्न चालू ठेविला. राष्ट्र स्वतंत्र झालें. तद्वतच काय वाटेल तें होवो परदेशी कापडाची देशांतून कायमची—पूर्णपणें—हकालपट्टी केल्याशिवाय आम्ही कधींही राहणार नाहीं, अशी देशांतील पुढारी व अनुयायी यांनीं प्रतिज्ञा केली तर, अनायासें या एका गोष्टीनें इतर अनेक गोष्टी साध्य होऊन स्वराज्यप्राप्तीचा मार्ग सुलभ व मोकळा होईल.

**हा बहिष्कार साध्य कसा होईल?** याला उपाय एकच. जें कापड आज आपण परदेशांतून खरेदी करतों तें येथल्या येथेंच उत्पन्न केलें पाहिजे व तेंच कापड वापरण्याचा निश्चय करण्याबद्दल लोकांचें मन वळविलें पाहिजे. कारण परदेशी कापडाच्या बहिष्काराच्या बाबतींत मुख्यतः दोन गोष्टी होणें जरूर आहे. ज्या कांहीं थोड्याशा पांढरपेशा वर्गांतील लोकांस स्वदेशीचें महत्त्व समजलें आहे त्यांस शुद्ध स्वदेशीचें म्हणजे हातसुताच्या, हातविणीच्या स्वदेशी कापडाचें रहस्य समजून देणें व अशा तऱ्हेचें चांगलें, टिकाऊ कापड त्यांस पुरवणें ही एक गोष्ट व दुसरी गोष्ट म्हणजे खेड्यापाड्यांतील कोट्यवधि लोकांस अजून आजिबात स्वदेशीचें तत्त्वच समजलें नाहीं तें त्यांस समजून देणें. या दोन गोष्टी झाल्याखेरीज परदेशी कापडावरील बहिष्कार अशक्य होय.

**हें ७५।८० कोटींचें कापड येथें केव्हां तयार होईल?** त्याला लागणारें सूत येथें निघून तें येथेंच विणलें जाईल तेव्हां. आज आपल्या देशांत लक्षावधि कोष्टी आहेत. हे कांहीं वर्षांपूर्वीं येथें कांतलेलें सूतच विणीत; पण

आतां ते जपानी अगर विलायती सूत वापरतात. या लोकांना चांगल्या हात-सुताचा पुरवठा केला पाहिजे व तेंच विणणें फायदेशीर आहे हें त्यांस पटवून दिलें पाहिजे.

आतां प्रश्न असा उद्भवतो कीं, इतकें कापड तयार होण्यास लागणारें हातसूत येथें उत्पन्न होऊं शकेल कीं नाहीं व तें विणणें फायदेशीर होईल कीं नाहीं ? या बाबतींत आम्हीं जो अनुभव घेतला आहे त्यावरून असें निश्चयपूर्वक म्हणू शकतों कीं, या दोन्ही गोष्टी शक्य असून त्या फायदेशीरही होऊं शकतात. मात्र हें कार्य करणाऱ्या माणसांचे अंगीं ध्येयनिष्ठा, दृढनिश्चय व चिकाटी हे गुण असले पाहिजेत.

तात्पर्य, खेड्यांतील लक्षावधि गोरगरिबांच्या संसाराचा प्रश्न हलका झाल्या-शिवाय लोकांत त्राण उत्पन्न होणार नाहीं. ही गोष्ट सुशिक्षित लोकांनीं केली तरच त्यांच्यावर व त्यांच्या कार्यक्रमावर जनतेचें प्रेम बसेल. आज चरखाप्रसार व खादीनिपजच ही गोष्ट घडवून आणतील. या गोष्टी साध्य करण्यासाठीं जनतेंत फार मोठ्या प्रमाणावर जागृति व संघटना करावी लागेल. लोकांत स्वाभिमान व उद्यमशीलता हे गुण उत्पन्न होतील. परदेशी काप-डाचा बहिष्कार साध्य होईल. इंग्रजांच्या खिशाला चट्टा बसेल व ही गोष्ट जे लोक साध्य करतील ते स्वतःची एकी, स्वतंत्र बाणा व उद्योगप्रियता या गुणांच्या जोरावर जगांतील अत्यंत कठोर अशा पाशवी सामर्थ्यासही लोटां-गण घालावयाला भाग पाडतील; असा आमच्या दृष्टीनें सूत व स्वराज्य यांचा संबंध आहे. [ स्वावलंबन—१।४।२६. ]



## पुष्प पंधरावें

# –देह जाईल, जाईल। त्यासि काळोबा खाईल –

काया हे पंढरी, आत्मा हा विठ्ठल। नांदतो केवळ, पांडुरंग ॥
—श्रीएकनाथ.

ईश्वराची लीला अगाध आहे. जगाच्या इतिहासाचें बारकाईनें निरीक्षण करा, म्हणजे ही गोष्ट आपल्या लक्षांत येईल. जगाचा इतिहास आपणांस काय सांगतो? तो हेंच सांगतो कीं, 'हे मनुष्या! या पृथ्वीतलावरील मी मी म्हणविणारीं मोठमोठीं राष्ट्रें नामशेष झालीं आहेत; अखिल मानवजातीला सळो कां पळो करून सोडणारे रोमन लोक आज कोठें आहेत? कालाच्या उदरांत ते गडप झाले. ग्रीस देशाचें तें प्राचीन वैभव! काय त्याचा बोलबाला! अरिस्टॉटल, प्लेटो, सॉक्रेटीस वगैरे विद्वद्रत्नांनीं विभूषित झालेलें तें राष्ट्र आम्हांला दाखवा पाहूं. शक्य नाहीं.

'देह जाईल, जाईल। त्यासि काळोबा खाईल।'

या उक्तीप्रमाणें ग्रीक लोकही आज काळानें पचवून टाकलेले आहेत. तीच गत इराणची. तशीच मिसर देशाची. किती नांवें सांगावींत? पण आमचें भरतखंड? ईश्वरकृपेनें अजून तें हयात आहे. तें नामशेष झालेलें नाहीं; आणि म्हणूनच म्हणतों कीं, ईश्वराची लीला अगाध आहे.

भरतखंड,–ज्याला सुवर्णभूमि हें अन्वर्थक नांव प्राप्त झालें होतें–तें भरतखंड अजून हयात आहे, अस्तित्वांत आहे, ही गोष्ट सत्य आहे; पण कोणच्या स्थितींत आज तें आपला काल कंठीत आहे? आपल्या ज्ञानानें, आपल्या वैभवानें व आपल्या पराक्रमानें अखिल जगाला दिपवून टाकणारी ती भरतभूमि आज परतंत्र आहे. जगाच्या बाजारांत आज तिला किंमत नाहीं, भाव नाहीं. कारण पारतंत्र्याचा शिक्का आज तिच्या कपाळावर मारला गेला आहे. 'नरकवास पुरवला; पण हें परक्यांचें जूं मानेवर नको; तें शत-गुणांनीं जाच करतें' असा स्पष्ट अभिप्राय कविश्रेष्ठ मोरोपंतांनीं दिला आहे.

आणि हा अभिप्राय यथार्थ नाहीं असें कोण म्हणेल? पहा, पहा; एकदां काय प्रकार आहे तो पहा. तेहतीस कोटि देवांना रावणानें एकदां बंदिखान्यांत घातलें होतें; सूर्यचंद्रादिक झाडून सर्व देवदेवतांना रात्रंदिवस काबाडकष्ट करून लंकाधीशाची मर्जी संपादन करावी लागत होती. आज तीच स्थिति आमच्या तेहतीस कोटि देशबांधवांची झाली नाहीं काय? परक्यांच्या सुखसोयी यथास्थित चालाव्या म्हणून आम्हांस आज रात्रंदिवस गुरांप्रमाणें राबावें लागत आहे. निम्मे लोक अर्धपोटीं. खायला पुरेसें अन्न नाहीं. पांघरायला धड वस्त्र नाहीं. अशा स्थितींत जगून तरी काय तात्पर्य? जगणें आणि मरणें या दोन्ही गोष्टी सारख्याच आहेत. पुष्कळ वेळां वाटतें, परमेश्वर प्रचंड भूकंप उत्पन्न करून आम्हांस धरित्रीमातेच्या उदरांत गडप करून टाकून आमचा एकदां कायमचा सोक्षमोक्ष कां करून टाकीत नाहीं?

**पण छे! ही कल्पनाच चुकीची.** असला भ्याडपणा काय कामाचा? आमचें राष्ट्र मेलें तर जगाचें कसें होणार? आम्ही मेलों तर जगाचीही इतिश्री झाल्यावांचून कशी राहील? हीही कल्पना लागलीच मनांत येते. कारण लौकिकी दृष्टीनें आम्ही कंगाल व भुकेबंगाल झालों असलों तरी फार मोठ्या व अत्यंत पवित्र, आध्यात्मिक वैभवाचे आम्ही रखवालदार आहोंत. ज्या ब्रह्मविद्येची जगाला अजून जरूर आहे ती आमच्या मातृभूमींत शिल्लक आहे. अजूनही आमच्यांत रामकृष्ण परमहंस, विवेकानंद, रामतीर्थ, दयानंद, टिळक, गांधी, रवींद्रनाथ वगैरेसारखे दिव्य पुरुष उत्पन्न होऊं शकतात. अशा राष्ट्राला नामशेष होऊन कसें चालेल? कधींही ही गोष्ट होणें नाहीं. हिंदुस्थानाला अजून जिवंत ठेवण्यांत परमेश्वराचा कांहीं तरी हेतु आहे. ब्रह्मांडनायकाला कोणतें तरी पवित्र व उदात्त कार्य आर्यावर्ताकडून करून घ्यावयाचें आहे यांत शंका नाहीं. कोणतें बरें तें कार्य?

आज पाश्चिमात्य राष्ट्रें वैभवाच्या शिखरावर आरूढ झालेलीं दिसतात. आपण त्यांच्या ऐश्वर्यानें दिपून जातों; पण त्यांना खरें सुख आहे? खऱ्या शांतीचा लाभ त्यांना झालेला आहे काय? मनाचें समाधान व अंतःकरणाची निश्चितता त्यांचे जवळ आहे काय? नाहीं, नाहीं, त्रिवार नाहीं. त्यांच्यांतीलच मोठमोठे पुरुषश्रेष्ठ ही गोष्ट कबूल करीत आहेत. त्यांची ऐहिक सुखस्वास्थ्यानें तृप्ति होत नाहीं. कांहीं तरी कमी आहे ही जाणीव त्यांना होऊं

लागलेली आहे. आपलें कोठें तरी चुकतें आहे; आज नाहीं उद्यां ही आसुरी सुधारणा आपणांला खोल खड्डयांत गाडून टाकल्याशिवाय रहाणार नाहीं, ही भीति त्यांचेपुढें रात्रंदिवस दत्त म्हणून उभी आहे. या पिशाच्चा-पासून आपला बचाव करणारा कोणी मांत्रिक आपणांस भेटेल काय, या शोधांत ते आहेत. भरतखंडा! पश्चिमात्यांस हा शाश्वत शांतीचा मंत्रोपदेश तूं करशील काय?

**भरतखंडांतील महात्मे ही गोष्ट अलबत करूं शकतील.** त्याचसाठीं त्यांचा जन्म; पण अगोदर आपला देश जगाच्या बाजारांत श्रेष्ठ ठरला पाहिजे ही जाणीव त्यांना आहे. जो स्वतःचा प्रपंच नीट चालवूं शकत नाहीं, तो दुसऱ्याला काय शिकविणार? जो स्वतः आपल्या घरचा मालक नाहीं, तो दुसऱ्याला कसा वांचवणार? या विवंचनेंत ते आज आहेत. आपल्या देशबांधवांना मुक्त करण्यासाठीं, त्यांना ऐहिक मोक्षाचा लाभ करून द्यावा यासाठीं, त्यांची रात्रंदिवस धडपड चालूं आहे. भारतसंतानांनो! तुम्ही त्यांना या कामांत मदत करणार नाहीं का? तुमच्यापैकीं प्रत्येकजण पांडुरंगाचा अवतार आहे. प्रत्येकाजवळ कल्पनातीत सामर्थ्याची ठेव आहे; पण आपण शेळ्या-मेंढ्या आहोंत, असेंच तुम्हांस वाटतें. आपण सिंहाचे बच्चे आहोंत, ही जाणीव, हें ज्ञान, तुम्हांस केव्हां होईल?

**ही काया म्हणजे पंढरपूर, आत्मा म्हणजेच विठ्ठल,** हें संतवचन किती मार्मिक आहे! आज या पंढरीची काय हकीगत आहे? या पंढरपुरांत आज कोण घाण सांचली आहे! त्या पंढरपुरांत वास करणाऱ्या विठ्ठलाच्या मूर्तीवर काय हा धुरळा! छे! कल्पना करवत नाहीं इतकी घाण आपण या विठ्ठल-रखुमाईच्या मूर्तींवर सांचूं दिली आहे. हें पंढरपूर आज आपणांस झाडून-सारवून स्वच्छ केलें पाहिजे. या पंढरींतल्या विठोबारायाला अभ्यंग स्नान घालून त्याला पूर्वीप्रमाणें शुचिर्भूतपणा येईल अशी तजवीज केली पाहिजे. तरच आपण खरे भक्त, खरे वारकरी. ही गोष्ट केली तरच आपणांस जगाला अध्यात्माचा मंत्र शिकवितां येईल.

**या पंढरींत कसली घाण सांचली आहे?** जरा आत्मनिरीक्षण करा; दृष्टि बहिर्मुख आहे, तिला अंतर्मुख करा, म्हणजे सर्व कांहीं ध्यानांत येईल. त्याला उशीर तो किती? एकदां आपण या पंढरीची तपासणी सुरू केली म्हणजे

आपणांला दिसेल कीं, या पंढरींत काम, क्रोध, मद, मोह, मत्सरादि कचऱ्यांनीं सर्व पेठा चिकार भरून गेल्या आहेत. धडपणें चार पावलें टाकण्याची कांहीं सोय नाहीं. आपला देश, आपला धर्म, आपली प्राचीन संस्कृति यांविषयींच्या अज्ञानाची दुर्गंधि तर या पंढरींत जिकडेतिकडे इतकी भरून गेली आहे कीं, नाकाला पदर धरून चालल्याशिवाय एक मिनिटभर आपणांस फिरण्याची सोय नाहीं. गाईच्या चरबीनें माखलेल्या सुताचें कापड आपण बिनदिक्कत वापरतों. असे कपडे घालून आपण या पंढरीची वारी करतों व पांडुरंगाचें दर्शन घेण्याची इच्छा करतों; पण अशा अपवित्र, अमंगळ कपड्यांनीं नटलेल्या आपणांवर पांडुरंग कांहीं प्रसन्न होत नाहीं. कसा होणार? आपण साहेबापुढें नाक घांसतों, त्याला आपण देवळांत घेतों; पण आपल्या सात कोटि अस्पृश्य देशबांधवांना तेथें मज्जाव! अशा किती गोष्टी सांगाव्यात? हजारपांचशें पानांचा तो ग्रंथच होईल.

तात्पर्य, आपल्या देहरूपी पंढरींतील घाण आपण काढून टाकली पाहिजे. आत्मस्वरूपी विठ्ठलाला निर्मळ केलें पाहिजे. म्हणजे पंढरी पूर्वीप्रमाणें अध्यात्मविद्येचें केंद्र होईल. पूर्वीप्रमाणें खरे साधुसंत त्या पंढरीच्या वाऱ्या करूं लागतील. विठोबा प्रसन्न होईल. विठोबा प्रसन्न झाल्यावर पोटोबाचा प्रश्न सुटण्यास कितीसा अवधि? तर हिंदुस्थानांतील तेहतीस कोटि पंढरपुरांची स्वच्छता करणें, त्यांतील पांडुरंगांस ज्ञानगंगेचें स्नान घालून शुचिर्भूत करणें, त्यांच्या नैवेद्याची सोय लावून देणें, हेंच आजचें धर्मकार्य. हें धर्मकार्य सुशिक्षितांनीं करून ऐहिक व पारमार्थिक मोक्षाचीं कपाटें जनतेस खुलीं करून द्यावींत अशी प्रार्थना करून रजा घेतों. बोला—पुंडलीक वरदा हारि विठ्ठल—ज्ञानदेव तुकाराम.

—( ज्ञानसंग्रह. )



## पुष्प सोळावें

# .... आबाभटजी ....

### एक संवाद

( स्वावलंबन–१।९।१९२७. )

[ सकाळीं साडेआठाचा सुमार. केशवराव हातांत एक बोचकें घेऊन भीतभीतच निळा रंग दिलेल्या एका वाड्यांत शिरतात; मागून वामनराव व विष्णुपंत आंत जातात. दोघांच्या खांद्यांवर तीन–चार कापडाचे ताके असून विष्णुपंतांच्या हातांत एक गज व कात्री दिसते. ओटीवर एक चष्मा घातलेले गृहस्थ उभे असून त्यांच्या हातांत एक वर्तमानपत्र आहे. या गृहस्थांचें नांव सोनोपंत. ]

**सोनोपंत**—(खांकरून) ओहो! केशवराव! कां? आज इकडे कोणीकडे आपली स्वारी? आणि हातांत हें गांठोडें कसलें घेतलें आहे! या, वर या असे.

**केशवराव**—( थोडेंसें स्मित करून ) विशेष कांहीं नाहीं. आपल्याला कांहीं खादीचे नमुने दाखविण्यासाठीं आणले आहेत.

**सोनो०**—काय? खादी? अजून तुमचें खादीचें खूळ कायमच आहे वाटतें? आश्चर्य आहे बुवा!

**वामनराव**—तसें नाहीं पंत. आतां खादींत पुष्कळच सुधारणा झाली आहे.

**विष्णुपंत**—आणि दरही पूर्वीपेक्षां पुष्कळच कमी झाले आहेत.

**केशव०**—( कोटिंगचा एक ताका उलगडून दाखवून ) पंत, पहा तर खरी, याची ही वीण किती दणगट आहे ती.

**सोनो०**—( खादी हातानें चांचपून पाहून ) तें कांहीं नाहीं बुवा; तुमची ही खादी फार महाग पडते. ह्या खादीचा दर काय ?

वामन०—छत्तीस इंची पन्ह्याची ही खादी असून रुपया वार आहे.

सोनो०—( भुंवया वर चढवून ) ओह्हो! भलताच फरक. परवां मी खटावमिलचें कापड बारा आण्यांनीं घेतलें. कसें परवडणार हें?

विष्णु०—( आर्जवानें ) पंत, असें म्हणून कसें भागणार? आपल्या देशांतला बेकारीचा प्रश्न कसा सुटणार?

वामन०—त्याचप्रमाणें आपण पांढरपेशांनीं या कार्याला हातभार लावला नाहीं तर या कार्याचा उठाव तरी कसा होणार?

केशव०—परवांच मी लोकमान्य टिळकांचे लेख वाचीत होतों; त्यांत त्यांनीं महाग पडलें तरी आपण स्वदेशी कापडच घेतलें पाहिजे, वाटल्यास कमी कपडे वापरावेत, असा स्पष्ट उपदेश केलेला आहे.

सोनो०—पण आम्ही कोठें विलायती कापड वापरतों? आम्हीही देशी गिरणीचेंच कापड वापरतों.

विष्णु०—आम्हीही पूर्वीं तेंच करीत होतों. पण पंत, आपण मागल्या अनुभवानें कांहीं धडे घ्यावयाला नकोत का? सातआठ सालीं मोठी चळवळ झाली, बहिष्कार पुकारला, गिरणीवाल्यांनीं भलतीकडेच कापडाचे भाव चढवले, अपरंपार पैसा मिळविला, चैन केली. एका एका गिरणीवाल्यानें पांचपांच दहादहा मोटारी ठेवल्या; विलायतच्या यात्रा केल्या; लक्षावधि रुपये विलायतेंत जायचे ते गेलेच; आमचे खिसे मात्र रिकामे झाले! खादीनें तसें होत नाहीं. गिरण्यांचे शेअर्स कांहीं थोडेच लोक विकत घेतात. त्यांचाच फक्त कल्पनातीत फायदा होतो. हजाराच्या शेअरला हजार रुपये व्याज कधीं ऐकलें आहे?

केशव०—पुन्हा गिरण्यांचीं यंत्रें सर्व परदेशांतून आणावीं लागतात. तीं चालविण्याकरितां मॅनेजर पुष्कळ ठिकाणीं साहेब असल्याशिवाय चालत नाहीं.

वामन०—फिरून बहुतेक गिरण्या विलायती सूत वापरतात तें निराळेंच. आपण जीं तलम बारीक धोतरें वापरतां, तीं सर्व विलायती अगर जपानी सुताचीं असतात. अशा स्थितींत देशी गिरण्यांत होणारें कापड आपण वापरलें तरी आपल्या देशांत पैसा किती राहतो, याचा आपणच विचार करा.

विष्णु०—पुन्हां देशी गिरण्या तरी आज नीट कुठें चालत आहेत? कांहीं बंद पडल्या. कांहीं जपानी लोकांनीं विकत घेतल्या. माझी पक्की

खात्री आहे कीं, आज नाहीं तर उद्यां बहुतेक सर्व गिरण्यांची स्थिति अंबरनाथ येथील काड्याच्या पेट्यांच्या कारखान्याप्रमाणें झाल्याशिवाय रहाणार नाहीं. भांडवल विलायती. व्यवस्था परकीयांच्या हातांत. वर छाप मात्र "हिंदुस्थानांत बनविलेला माल" असा असावयाचा. तो शुद्ध विलायती माल आपले लोक स्वदेशी म्हणून मोठ्या अभिमानानें विकत घेणार! कां आहे कीं नाहीं मजा?

सोनो०—पण मजुरी तरी आपल्या देशांत रहाते कीं नाहीं?

वामन०—काय पंत हें? आपल्या लोकांनीं रोजीं आठआठ दहादहा तास उभेच्या उभे राहून गुलामांप्रमाणें राबावें एवढीच कां महात्त्वाकांक्षा धरावयाची आपण?

विष्णु०—शिवाय या मजुरीबद्दल आपणांस केवढी भयंकर किंमत द्यावी लागते, याची कल्पना करा. ईस्ट इंडिया कंपनीनें आपला कापडाचा धंदा बुडविला. देशांत बेकारी उत्पन्न झाली. नुसत्या शेतीवर लोकांचें भागेनासें झालें. खेडीं मोडण्यास सुरुवात झाली. तेथील बसति हळू हळू उठूं लागून मुंबईसारखीं शहरें भरूं लागलीं. तेथें रहावयास गेलेल्या लोकांच्या हालअपेष्टांची कल्पनाही करवत नाहीं. कोंदट, रोगी हवेंत, अपुऱ्या व अस्वच्छ अशा जागेंत दिवस काढावे लागतात. खेडेगांवांतील स्वच्छ व निरोगी हवापाण्यांची गोष्टच कशाला? दिवसां मरे मरे तों काम करावें. सुट्टी झाल्यावर पिठ्यांत जाऊन चार दोन ग्लास झोकावेत. कुठें तरी एखाद्या जागीं जाऊन शेण खावें, आणि चाळींच्या खुराड्यांत दाटी झालेली असते म्हणून रस्त्यावरच रात्रभर प्रेताप्रमाणें निपचित पडून रहावें! गुरांची स्थिति तरी यापेक्षां बरी असते.

केशव०—खादी हा एकच ह्या रोगावर उपाय आहे, असें तुम्हांला नाहीं कां वाटत? तिच्या योगानें मजुरांस फुरसतीच्या वेळेला उद्योगधंदा मिळेल. पंत, हल्लीं चालू असलेल्या या अनर्थाच्या योगानें आपल्या देशांतील लोकांची एकसारखी शारीरिक, नैतिक व आर्थिक अवनति चालू राहिली, तर आपल्या देशाची धडगत दिसत नाहीं. अहो, 'शीर सलामत तर पगडी पचास' अशी म्हण आहे. विष्णुपंतांनीं तर पुरुषांच्या स्थितीचेंच फक्त वर्णन केलें. स्त्रियांची स्थिति तुमच्या कानावर आली तर तुमच्या

काळजाचें पाणीच होऊन जाईल. परवां मला आगगाडींत एक गिरणींतले बडे अधिकारी भेटले होते. ' गिरण्यांत काम करणाऱ्या बायकांत अब्रू वड घेऊन बाहेर पडणारी स्त्री विरळा. ' असें त्यांनीं मला स्वतः सांगितलें. अशा स्थितींत घरीं व दारीं सर्वत्र ब्रह्मघोंटाळा असल्यास नवल तें काय? आपण एकदां मुंबईस गिरण्यांच्या प्रांतांत जाऊन याच म्हणजे संध्याकाळीं सुट्टी झाल्यावर चरकांतून ओढून काढल्यासारखीं पाप्याचीं पितरें कशीं एकामागून एक बाहेर पडत असतात हें तुम्हांला प्रत्यक्ष पहावयास सांपडेल.

**वामन०**—आणि हें सर्व शहरांतील विष हे लोक आपापल्या घरीं वर्षा-तून एखाद्या वेळेस जातात त्या वेळीं तेथें फैलावतात! खरोखर पाश्चिमात्यां-कडून घेतलेली ही नामधारी औद्योगिक सुधारणा म्हणजे एक भयंकर रोगाची सांथच आहे. त्यापेक्षां महामारी, प्लेग अगर इंन्फ्ल्युएंझा पुष्कळ बरा.

( **आबाभट** येतात. )

**केशव०**—हं, आबाभट, हे पहा शुद्ध खादीचे पंचे, तुमच्याकरितां आणले आहेत ( पंचे दाखवतात ).

**आबा०**—अं-हं, काय कामाचे हे पंचे? जाड किती आणि किमतही भारी! हें पहा, कालच मी नारायणशेठच्या दुकानांतन हे पंचे खरेदी केले. पहा तर, किती तलम आहेत आणि किंमतही माफक.

**वामन०**—शिव, शिव, आबाभट, काय बोलतां हें? अहो, तुम्ही आमचे धर्मगुरु. तुम्ही आम्हांला मार्ग दाखवावयाचा. तुम्हीं तरी निदान असें बोलतां कामा नये. अहो, तुम्हांला माहीत आहे कां, कीं या गिरणीच्या सुताला बळकटी येण्याकरितां गाई व इतर जनावरांची चरबी लावलेली असते? खुद्द विश्वकोशांत ही हकीगत प्रसिद्ध झालेली आहे. त्यांतून तुम्हांला फुरसद असते. रोज अर्धा पाऊण तास सूत काढून त्याचें कापड विणून घ्याल तर सहज काम होणार आहे. जर तुम्हांला गिरणीच्या सुताचें जानवें चालत नाहीं तर गिरणीचें कापड कसें चालतें?

**विष्णु०**—तुम्हीं आम्हांला उदाहरण घालून द्यावयास पाहिजे. आज तुम्ही आंखूड पंचे नेसलां तरी कोणी तुम्हांला नांवें ठेवणार नाहीं.

**आबा०**—( शरमून ) हं? आहे खरें तुमचें म्हणणें खरें. हा सर्व कलिकालाचा प्रभाव आहे. देवाला दया येईल तेव्हां खरें.

**विष्णु०**—वाः! युक्ति तर खाशी काढलीत! देवावर सर्व दोष टाकून मोकळेच्या मोकळे. ( सत्यंकाकू येतात. )

**केशव०**—काकू! हें चीट पाहिलंत का! काय फरमास खडी काढली आहे वर! मुलींच्या परकरांना, चोळ्यांना कसं नामी कापड आहे.

**सत्यंकाकू**—( चीट हातांत घेऊन ) इश्श बाई! किती जाडभरडं आहे हें चीट! आमची गंगी चुकून हात लावायची नाहीं याला!

**वामन०**—छे काकू! काय बोलतां असें? अहो, तुमच्या बायकांच्या-वर आमच्या देशाची व धर्माची फार भिस्त. तुम्ही बायका आहांत म्हणून आमचा धर्म आजपर्यंत टिकला असें लोक म्हणतात. आम्ही पुरुषांनीं नाना थेर केले, केंस ठेविले, तुमच्यासारखा त्यांचा भांग काढूं लागलों, नटण्या-मुरडण्यांतच मोठेपणा मानूं लागलों; साहेबांचे गुण मात्र घेतले नाहींत. त्यांचा देशाभिमान, त्यांची चिकाटी, उद्योगशीलता, कर्तव्यनिष्ठा हे गुण नेमके वगळले; ज्या नको त्या गोष्टी घेतल्या; त्यांच्या पोषाखाचें अनुकरण केलें आणि त्यालाच शिष्टाचार हें गोंडस नांव दिलें!

**विष्णु०**—खरें पाहिलें तर या भिक्षुकांप्रमाणें तुम्हांलाही दुपारचा वेळ रिकामा असतो. तुम्ही म्हणतां खादी जाडीभरडी असते. मी म्हणतों तुम्ही घरीं सूत कां नाहीं काढीत? घरीं चार दोन स्त्रिया देवकपाशीच्या टाकून द्याव्यात. दरसाल रगड कापूस मिळतो. बारीक सूत काढावें, कोष्ट्या-कडून फक्कड पातळें विणून घ्यावीत.

**केशव०**—काय सांगूं पंत तुम्हांला! अजून निम्में कापड हातमागावर निघतें. सूत मात्र जपानी किंवा विलायती; कारण देशी गिरणीचें सूत पर-वडत नाहीं. उद्यां एखादी बहिष्काराची चळवळ आपण केली आणि तिची तीव्रता सरकारला जाचूं लागली तर, लक्षांत ठेवा, सरकार तुम्हांला सूत मिळ-ण्याचें बंद केल्याशिवाय केव्हांही राहणार नाहीं. मग तुम्हांला या धर्ममार्तंड आबाभटजींच्या प्रमाणें अस्सल मँचेस्टरचें कापड तरी वापरावें लागेल किंवा नागडेंउघडें रहावें लागेल

**विष्णु०**—सोनोपंत, खात्रीनें एक दिवस असा येणार आहे कीं, ज्या वेळीं आपल्या देशांतल्या लक्षावधि कोष्ट्यांना घरीं स्वस्थ बसावें लागून उपाशी मरण्याची पाळी येईल. आज जवळजवळ तसा प्रसंग आलेलाच

आहे. गिरण्या चारचार पांचपांच रुपयांपर्यंतचीं तलम पातळें काढूं लागल्या आहेत. अशा स्थितींत कोष्ट्यांचे दहादहा बाराबारा रुपयांचे सुताडे घेतो कोण? म्हणून तर महात्माजींचा चरख्याबद्दलचा एवढा अट्टाहास चालू आहे. जोंपर्यंत आपला देश परतंत्र आहे व पारतंत्र्यामुळें गिरण्यांतील मजुरांची स्थिति सुधारणें—आपण मनांत आणलें तरी—आपल्या हातून होणें शक्य नाहीं, तोंपर्यंत आपल्या देशांतल्या देशांत होणाऱ्या कापसाचें चरख्यावर सूत कांतून गांवांतल्या कोष्ट्यांकडून कापड विणून घेणें, याशिवाय आपल्याला गत्यंतर नाहीं. शेतकऱ्याला तर ही गोष्ट सहज करतां येण्यासारखी आहे. त्यानें मनांत आणलें तर त्याला कापसाचा खर्च नाहीं. फुरसतीच्या वेळीं त्यानें अगर त्याच्या बायकांनीं सूत कांतलें तर कांतण्याचा खर्च नाहीं. फक्त विणण्याचा वारामागें दोन अडीच आणे जो खर्च येईल तेवढाच! म्हणजे खादी महाग पडते अशी कांहीं लोकांच्याकडून अडचण आणली जाते तीही नाहींशी होईल.

**केशव०**—हें पहा बन्याबापू! कसे नखशिखान्त मँचेस्टरच्या कापडानें नटलेले आहेत ते! यांच्या डोक्यावरची ही फर-कॅपच पहा! खरोखर यांनीं खादीची टोपी कां वापरूं नये? अवघ्या चार आठ आण्यांचा प्रश्न. वाटेल तेव्हां वाटेल तितक्या वेळां धुतां येते. पांढरी नको असल्यास रंगवून घ्यावी. कोणाची ना आहे?

**विष्णु०**—हें पहा पंत, मी सहा सालामध्यें खुद्द डेक्कन कॉलेजसारख्या सरकारी कॉलेजांत शिकत होतों. लोकमान्यांची अमदानी ती? मग काय पुसतां! स्वदेशी चळवळीला त्यांनीं ऐसा रंग भरला होता कीं, यंव! कॉलेजांत मी आपल्या खोलींत स्वदेशी वस्तूंचें त्या वेळीं दुकान काढलें होतें. इतकें त्या वेळच्या विद्यार्थ्यांत स्वदेशीचें वारें संचरलें होतें. त्या दिवसांची आठवण झाली आणि हल्लींचे हे परदेशी कापडांत नटलेले विद्यार्थी पाहिले म्हणजे हंसावें कां रडावें हें समजत नाहीं. बरं! ईशेच्छा! दुसरें काय?

**सोनो०**—ठीक आहे बुवा, तुमचें म्हणणें सर्व खरें आहे. लोकांचे डोळे उघडतील तेव्हां खरें. ठीक आहे. तेवढा कोटिंगचा ताका, दोन शाली व दहा वार शर्टिंग ठेवून जा.— ( तिघे खादीवाले तसें करतात. )

## पुष्प सतरावें

# –खबुतरांचीं खुराडीं–

( पुणें—१।१०।२५. )

स्वावलंबनाशिवाय आपला तरणोपाय नाहीं, ही गोष्ट ४० वर्षांपूर्वी सार्वजनिक काकांच्या लक्षांत आली. त्यांनीं स्वदेशी चळवळ सुरू केली. लोकांनीं मान्यता दिली. नुकसान सोसूनही लोक स्वदेशी कापड वापरूं लागले. गिरणीवाल्यांनीं फायदा घेतला. कापडांच्या किंमती भलतीकडेच वाढवल्या. अपार संपत्ति मिळविली. चैन व ऐषआराम यांत अलोट पैसा खर्च होऊं लागला. या नाहीं, त्या मार्गानें, चैनीच्या वस्तूंच्या रूपानें, पैसा विलायतेला जायचा तो गेलाच. पुन्हा यंत्रसामग्री विलायती. तज्ज्ञ बहुतेक परकीय लोक. गिरण्या जगणें अगर मरणें मँचेस्टरच्या हातीं. तिकडून फर्मान सुटेल त्याप्रमाणें नोकरशाही नाचणार, कायदे करणार. रेल्वे नोकरशाहीच्या ताब्यांत. कोळसा वगैरे गोष्टी वेळेवर मिळणें न मिळणें रेल्वे-अधिकाऱ्यांच्या मर्जीवर. सारांश, सर्वच शेंडी दुसऱ्याच्या हातीं.

महात्मा गांधींच्या लक्षांत ही गोष्ट आली. त्यांनीं खादीची चळवळ सुरू केली. खादी म्हणजे जादू आहे; ती एक कामधेनु आहे. कपाशीच्या लागवडीपासून तों खादी वापरण्यापर्यंत सर्व गोष्टी आपल्या हातीं. राष्ट्रानें ही गोष्ट मनावर मात्र घेतली पाहिजे. सर्व कांहीं आपण स्वतः करण्यावर अवलंबून. ' भाग्यासि काय उणें रे? । केल्यावांचून राहिलें ॥ ' असें समर्थवचन आहे. शिवकालीन महाराष्ट्रानें या वाणीला मान दिला. परक्यांकडे पाहून आपलें धोरण आंखण्याचें सोडून दिलें. प्रजा स्वावलंबी बनली. ' रुसावें फुगावें आपुलीयावरि ' हा तुकोब्बाराय यांची उक्ति. दुसऱ्यांस शिव्याशाप देणें, बोटें मोडणें हें दुबळ्यांचें काम. त्यायोगानें स्वतःचे ठिकाणीं सामर्थ्य उत्पन्न होत नाहीं. आत्मनिरीक्षण करून स्वतःची सुधारणा केल्याशिवाय

आत्मप्रत्यय कसा निर्माण होणार ? ही गोष्ट महाराष्ट्रानें ओळखली. त्यानें स्वराज्य–स्वतंत्र राज्य–स्थापन केलें. ' शिक्षण, कापड वगैरे बाबतींत पूर्ण स्वदेशी व्हा ' या लोकमान्यांच्या महामंत्राचा तरी हाच अर्थ. आमची बालंबाल खात्री आहे कीं, लोकमान्य हयात असते तर त्यांनीं गोर-गरिबांच्या पोटास देणाऱ्या खादीचा झेंडा रामेश्वरापासून तों गंगोत्रीपर्यंत नाचविला असता.

आज आमच्या खेडेगांवांची स्थिति काय आहे ? पहाल तिकडे कंगालपणाचें साम्राज्य. गुरांढोरांवांचून शेती उजाड पडलेली. लोकांच्या तोंडांवर प्रेतकळा आलेली. आळस रोमरोमांतून भिनलेला. वर्षांतून आठचार महिने शेती कशीबशी तरी ओढून काढावयाची. उरलेला वेळ चकाट्या पिटण्यांत घालवावयाचा वा मुंबईची वाट धरावयाची. तेथें तरी काय ? दिवसां मरे मरे तों काबाडकष्ट करावयाचे; रात्र खबुतरांच्या खुराड्यांत अगर उघड्या रस्त्यावर पडून काढावयाची. मिळेल त्या पैशापैकीं बरासचा भाग दारू, जुगार, नाटकें, तमाशे, सिनेमा, बाहेरख्याली वगैरे गोष्टींत घालवावयाचा. पैसा, शरीर व अब्रू यांचें खोबरें. पुन्हां खंक ते खंकच. हा रामरगाडा किती दिवसपर्यंत चालावयाचा ? याला केव्हां तरी, कोणीं तरी आळा घालावयाला नको काय ? राष्ट्राची ही एकसारखी झीज फलदायी कशी होणार ? धर्म, नीति व व्यवहारांत राष्ट्राचें बहुतेक दिवाळें निघालेंच आहे. वेळींच सावध झालों नाहीं तर शेवटचा 'राम' म्हणायला फारसा वेळ लागणार नाहीं. ग्रीस, रोम, कार्थेज, ॲसीरिया, बॅबिलोन, इजिप्त वगैरे प्राचीन राष्ट्रें अशींच विलयास गेलीं. आर्यावर्तच काय तें एक अजून शिल्लक राहिलें आहे. त्यानें मागल्यास ठेंच, पुढचा शहाणा, या न्यायानें वर्तन न केल्यास त्याचीही तशीच गत झाल्याशिवाय कशी राहील ?

ईश्वराची कृपा, कीं अजून आशेला जागा आहे. अमेरिकेनें स्वातंत्र्य-युद्ध चालू असतांना व तत्पूर्वी, चरखे व हातमाग यांचा उपयोग करून स्वावलंबनाचा मार्ग चोखाळला. इतिहास ही गोष्ट कंठरवानें सांगत आहे. जॉर्ज वॉशिंग्टनच्या सैन्याला देशांतील आबालवृद्धांनीं चरखे व हातमाग यांच्या साहाय्यानें कपडे पुरविले. स्वतःपुरतें कापड ते तयार करीत. त्यांनीं ही गोष्ट केली नसती तर अमेरिकन फौजेला व लोकांना थंडीवाऱ्यांत कुडकुडून

मरावयाची पाळी आली असती. आज आपणांवरही यापेक्षां भयंकर प्रसंग आहे. युद्ध चालू नसतांही देशांतल्या निम्या प्रजेस अर्धपोटीं रहावें लागतें. दरसाल ७५।८० कोटींवर रुपये कापडाच्या किंमतीच्या रूपानें परदेशीं जात आहेत. **म. गांधींनीं** या रोगावर रामबाण उपाय काढला आहे. शहरवासियांनीं आपला उद्योगधंदा सांभाळून रोज अर्धा तास तरी सूत काढावें व सुताच्या किंमतीच्या रूपानें कोट्यवधि रुपये परदेशीं जातात त्यांची बचत करण्यास मदत करावी. शेतकऱ्यांनीं फुरसतीच्या वेळांत सूत काढन व कापड विणून आपल्या उत्पन्नांत भर टाकावी. काम नसलेल्या लोकांनीं आपलीं घरेंदारें न सोडतां सर्वच काळ या कामांत खर्च करावा. सर्वांनींच खादी वापरून ७५।८० कोटि रुपये देशांतल्या देशांतच राहून गोरगरिबांचीं पोटें भरतील असें करावें. **हाच तो रामबाण उपाय. हाच तो त्रैलोक्यचिंतामणि. हीच ती मृतप्राय राष्ट्राला जिवंत करणारी अमृतसंजीवनी!**

आजवरी पांढरपेशे खेडेगांवांतील लोकांच्या जिवावर जगले, वाढले, मोठे झाले. त्यांनीं मेहनत करावी, व्यापाऱ्यांनीं गब्बर व्हावें. त्यांनीं भांडावें, वकिलांनीं हवेल्या उठवाव्यात. त्यांनीं कर्जबाजारी व्हावें, सावकारांनीं जमिनी जप्त कराव्यात. सारांश, खेडवळांचे कष्ट व अज्ञान यांवर नागरिकांची वडेजाव वाढली. शेतकऱ्यांत त्राण राहिलें नाहीं. गुरें गेलीं. शेतें जाण्याच्या रंगांत आहेत. आतां ते किती दिवस व कोणाशीं भांडतील? शक्य नाहीं. वाळूच्या घड्याळाप्रमाणें वरची वाळू आतां सर्व खालीं आली आहे. घड्याळ आतां उलटें केलें पाहिजे. परतभेटीची वेळ आली आहे. **महात्मा गांधींचा** हा संदेश आहे. **लोकमान्यांची** ही आज्ञा आहे. **मातृभूमीची** ही अपेक्षा आहे. **गोरगरिबांची** ही हांक आहे. ओ देणार काय? दिलीत तर खेडीं जगतील. शहरें तरतील. नाहीं तर उभयतांचा नाश ठरलेला! हें ब्रह्मवाक्य समजावें. आंतबट्ट्याचा व्यापार फार दिवस चालणार नाहीं. परिस्थिति ओळखिली पाहिजे. **राम, धर्मराज, हरिश्चंद्र, प्रतापसिंह, शिवछत्रपति** या विभूतींच्या चरित्रांपासून बोध घेतला पाहिजे. **ना. गोखल्यांच्या** उद्गारांप्रमाणें दिवसा देशहिताचा विचार झाला पाहिजे; रात्रीं त्याचीं स्वप्नें पडलीं पाहिजेत. लग्नकार्यादि प्रसंग, पोषाख, टेनिस, क्रिकेटादि परदेशी महागडे खेळ, ऐषआरामाच्या वस्तु वगैरेंत फुकट जाणारा पैसा वांचवून

त्याचा विनियोग गोरगरिबांस मदत करण्यांत झाला पाहिजे. शेटसावकार, व्यापारउदमी, डॉक्टरवैद्य, वकीलबॅरिस्टर, खाजगी, सरकारी नोकर, या सर्वांनीं आत्मशुद्धि करून, खादी वापरून, नखशिखान्त स्वदेशी वृत्ति बाणविली पाहिजे. परतंत्रांनीं यज्ञ व तप करून सामर्थ्यवान् बनल्याशिवाय स्वातंत्र्यलक्ष्मी कशी प्रसन्न होणार? खादीच्या मार्गे गोरगरिबांना पोटाला घालून दरिद्रनारायणाशीं आपण तन्मय होऊं त्याच दिवशीं पारतंत्र्याच्या शृंखला तोडण्यास समर्थ होऊं. हीच आजची तपश्चर्या; हाच आजचा यज्ञ; स्वराज्यमंदिराची सोपानपरंपरा तरी हीच.

---

## पुष्प आठरावें

# — क्रांतिकारक रामदास —

( पुणें—११।२।३१. )

आजचा दिवस अत्यंत महत्त्वाचा आहे. कारण तो **श्रीसमर्थ रामदास** व **नरवीर तानाजी मालुसरे** या दोघांही विभूतींच्या पुण्यतिथीचा दिवस होय. **रामदास** या शब्दापाठीमागें क्रांतिकारक हें विशेषण लावल्याकारणानें कांहींना कसेंसेंच वाटण्याचा संभव आहे; कारण तो शब्द आजपर्यंत कांहीं एका विशिष्ट सांप्रदायाबद्दल वापरलेला असल्याकारणानें त्या शब्दाच्या भोंवतीं कांहीं विशिष्ट कल्पना आलेल्या आहेत. पण माझ्या मतें यापुढें अशा शब्दांनीं आपण केव्हांही निष्कारण दचकून जातां कामा नये. क्रांति म्हणजे बदल. एखादी व्यक्ति, समाज अगर राष्ट्र काल रोजीं जेथें, ज्या अवस्थेमध्यें होतें त्या अवस्थेपासून आज रोजीं त्याला निराळ्या अवस्थेमध्यें आणून सोडणें याचें नांव क्रांति. क्रान्तीच्या कल्पनेशीं अत्याचार अगर हिंसा या कल्पनांचा संबंध जोडलाच पाहिजे असें मुळींच नाहीं.

**क्रान्तिकारक नव्हते कोण! राजा रामचंद्र** हाही एक बडा क्रान्तिकारक होता. फुलापेक्षांही कोमल व गंगेपेक्षांही पवित्र अशा जनककन्या **सीता-**

**देवीला** या क्रांतिकारकानें राज्याभिषेकाच्या समयीं परिधान करावयाच्या उंची उंची अशा रेशमी व जरतारी वस्त्रांचा त्याग करावयास लावून वल्कलें नेसावयास भाग पाडलें व तेहतीस कोटि देवांचें स्वातंत्र्य हें ध्येय पुढें ठेवून त्या माउलीनेंही अग्नि व ब्राह्मणांसमक्ष **धर्मे च, अर्थे च, कामे च। नातिचरामि, नातिचरामि॥** या विवाहकालीन त्रिवार उच्चारिलेल्या शपथ-विधीप्रमाणें पतीची आज्ञा शिरसामान्य केली व **खादीपेक्षांही अत्यंत कष्ट-दायक अशा वल्कलांचा स्वीकार आनंदानें केला. " अग्निकुंडामाजीं घातला प्रल्हाद। परी तो गोविंद विसरेना "** असें ज्याचें **तुकाराम-महाराजांनीं** वर्णन केलें आहे तो **महाभाग प्रल्हाद हाही एक बडा क्रांतिकारक नव्हता काय? ' न मरे यास्तव नेला पर्वतशिखरास; लोटिला खोलीं। परि तो निर्भय चित्तीं वाहे नारायणास लाखोली॥ '** अशा थाटानें या पुरुषानें कायदेभंग करून सत्याग्रहाच्या बळावर निर्गुण, निराकार अशा परमेश्वरालाही सगुण, साकार अशा प्रकारचें रूप धारण करावयास लाविलें व जगतांत अपूर्व अशी क्रान्ति घडवून आणिली. **' अहिंसा परमो धर्मः '** हा उपदेश सर्व जगाला घोषित करणाऱ्या **गौतमबुद्धाएवढा मोठा क्रांतिकारक** जगताच्या इतिहासांत सांपडणें शक्य नाहीं. महाप्रतापी पहिला पांडव, कुन्तिपुत्र **कर्ण** याच्या **' दैवायत्तं कुले जन्म। मदायत्तं च पौरुषं॥ '** या सुप्रसिद्ध वचनानुसार रामनामाच्या प्रभावानें **वाल्या** कोळ्याचा **वाल्मीकि** ऋषि बनून रामचरित्राच्या पूर्वींच रामायण लिहि-णाऱ्या पुरुषाचाही क्रान्तिकारकांमध्येंच अंतर्भाव केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. माझ्या मतें सत्य, अहिंसा व अनत्याचार या तत्त्वांच्या व्रताची दीक्षा घेऊन मातृभूमीच्या उद्धारार्थ बाहेर पडलेला प्रत्येक सत्याग्रही वीर हा क्रान्तिकारकच गणला पाहिजे. ही विचारसरणी पुढें ठेवूनच **रामदासांच्या** मागें क्रान्तिकारक हें उपपद लावून मी आज त्यांच्या ऋणांतून मुक्त होत आहें.

क्रान्तिकारक **रामदासांनीं** कोणती क्रान्ति घडवून आणली? या प्रश्नाचें उत्तर योग्य रीतीनें मिळावयास पाहिजे असेल तर **हिंदुस्थानच्या** गेल्या पांच हजार वर्षांचें अवलोकन करणें जरूर आहे. महाभारतीय युद्धाच्या होमकुंडांत भरतखंडांतील क्षत्रियांचा एकजात संहार झाला; परकीयांच्या स्वाऱ्यांना सुरवात झाली. या स्वाऱ्यांमुळें **हिंदुस्थानांतील** संपत्ति व त्याबरोबरच चौदा विद्या

व चौसष्ट कला यांची लूट करण्याची संधि परकीयांना मिळाली. **दिल्लीचें** मयूरसिंहासन अगर **रायगडची** भवानी तरवार या दोन वस्तूंना ज्याप्रमाणें आपलें वसतिस्थान बदलावें लागलें, त्याचप्रमाणें हिमगिरीच्या गुहरांत वास करून अखिल ब्रह्मांडाच्या संसाराची चिंता वाहणाऱ्या योगिराजांनीं लावलेल्या नानाविध शोधांचें ज्ञान पूर्वेकडून पश्चिमेकडे जाऊं लागलें. रॉजर बेकनची प्रयोगशाळा स्थापन झाली. **सर ऐझॅक न्यूटन, कोपरनिकस** व **ग्यालि-लिओ** हे आपापल्या वेधशाळांतून दुर्बिणी सज्ज करून अंतराळांतील अंत-रंग तपासूं लागले. पश्चिमेमध्यें आधिभौतिक तत्त्वज्ञानाची प्रचंड लाट उसळून आधुनिक पाश्चिमात्य संस्कृतीचा जन्म झाला. इकडे पूर्वेकडे भरतखंडांत निराळाच प्रकार दृष्टोत्पत्तीस येऊं लागला. परक्यांशीं झगडतां झगडतां अवशिष्ट राहिलेले क्षत्रिय रजपूत नामशेष होण्याच्या पंथाला लागले. **गौतमबुद्धाचा** उदय झाला. अहिंसाधर्माची मुहूर्तमेढ रोंवली गेली. कांहीं काळपर्यंत पौर्वात्य जगाला शांतिब्रह्माचा लाभझाला. परंतु हा काळ लवकरच पालटला. कुरुक्षेत्रावर **भगवान् श्रीकृष्णांनीं अर्जुनाला** उपदेशिलेल्या **सत्त्वगुणप्रधान तेजस्वी** गीताधर्माचा लोप होऊन निवृत्तिमार्गाच्या नांवाखालीं तमोगुणप्रधान अशा निष्क्रियता-धर्मीयांचा जिकडे तिकडे सुळसुळाट झाला. '**असेल माझा हरी। तर देईल खाटल्यावरी**' ही विचारसरणी देशाच्या या टोंकापासून त्या टोंकापर्यंत नंगा नाच घालूं लागली. क्रांतिकारक **रामदासानें** आपल्या अतुल तपश्चर्येच्या जोरावर **महाराष्ट्रांत** प्रचंड विचारक्रांति घडवून आणण्याचा प्रयत्न केला; नशिबावर हवाला न ठेवतां प्रयत्नवादाचा त्यांनीं समाजास उपदेश केला; भगीरथ प्रयत्न केल्यास जन्मकालीं प्रत्येक व्यक्तिमात्राच्या कपाळीं सटवाईनें लिहिलेली रेषाही मनुष्यास पुसून टाकतां येते, या तत्त्वाची घोषणा त्यांनीं **महाराष्ट्रांत** केली. '**यत्न तो देव जाणावा**' हा त्यांच्या कर्मयोगप्रधान तत्त्वज्ञानाचा मूलमंत्र होता.

क्रान्तिकारक **रामदासांनीं** दोन महत्त्वाच्या वर्गांना खडबडून जागें केलें.

**" हा धकाधकीचा मामला।**
**कैंचा घडे अशक्ताला ॥ "**

अशी इशारत त्यांनीं देशांतील शक्तिहीनांस दिली व सर्व प्रकारच्या सामर्थ्याचा

सागर, बुद्धिमंतांमध्यें बुद्धिमान् व संयमी पुरुषांमध्यें अत्यंत श्रेष्ठ असा जो परमप्रतापी **रामभक्त हनुमान** त्याच्या उपासनेची दीक्षा राष्ट्रानें घेतली. **' ब्राह्मण्य रक्षावें आदरें । उपासनेच्या भजनद्वारें । गुरुपरंपरा निर्धारें । चळोंच नेदावी ॥'** अशी गर्जना करून त्यांनीं हल्लींच्या प्रमाणें त्या काळींही आपल्या कर्तव्यशून्यतेमुळें अन्नाला मोताद झालेल्या ब्राह्मणवर्गाचें कर्णोत्पाटण केलें. नुसतें नामस्मरण केलें कीं, दुसरें कांहीं करावयास नको ही कल्पना **रामदासांना** मान्य नव्हती. नामस्मरणावर जरी त्यांचा दृढ विश्वास होता तरीही उत्क्रांतिचक्रामधील अनेक पायऱ्यांपैकीं एक महत्त्वाची पायरी, इतकेंच महत्त्व त्यांनीं नामस्मरणभक्तीला दिलें आहे. **दासबोधामध्यें** नवविधा भक्तीवर एक स्वतंत्र दशक लिहून श्रवणभक्तीपासून तों थेट आत्मनिवेदन-भक्तीपर्यंत त्यांनीं नवविधा भक्तीचें अत्यंत मार्मिक असें तपशीलवार विवेचन केलें आहे. त्यांच्या शिष्यवर्गांत प्रवेश करण्याला कोणालाही मज्जाव नव्हता. त्यांच्या **शिष्यसमूहांत पुरुष त्याचप्रमाणें स्त्रियाही होत्या.**

त्यांच्या सांप्रदायाच्या यादींत **छत्रपति शिवाजीमहाराज** व त्यांचे अनेक सरदार, दरकदार यांच्या बरोबर ब्राह्मण, वैश्य, न्हावी, परीट, धोबी, महार, चांभार वगैरे सर्व प्रकारच्या, सर्व जातींच्या व सर्व दर्जाच्या लोकांचीं नांवें सांपडतात. **' मराठा तितुका मेळवावा '** हा त्यांच्या सांप्रदायाचा दंडक होता. **' यारे यारे लहान थोर । भलते यातीं नारी, नर ॥ '** असें सर्वांस आमंत्रण देऊन त्यांचे पुढें त्यांनीं त्रयोदशाक्षरी **रामनामाचा** मंत्र व नवविधा भक्तिरूपी **विधायक कार्यक्रम** ठेवला. श्रवणभक्ति व कीर्तनभक्ति हीं हल्लींच्या साक्षरतेच्या चळवळीचीं व वृत्तपत्रें, व्याख्यानें यांचीं सोळाव्या-सतराव्या शतकांतील रूपें होत. **' शहाणे करावे जन । पतित करावे पावन । सृष्टीमध्यें भगवद्भजन वाढवावें ॥ '** हें सार्वत्रिक जागृतीचें धोरण आपल्यापुढें ठेवून त्यांनीं **आनंदवनभुवनाला** गदगदां हलविलें व कर्तव्योन्मुख केलें.

क्रांतिकारक **रामदासांची** दृष्टि अत्यंत व्यापक होती. संकुचितपणाचा तिला गंधही नव्हता. भौगोलिक मर्यादा तिला अपरिचित होत्या. **' रामकथा ब्रह्मांड भेदून । पैलाड न्यावी '** अगर **ब्रह्मगोळ अवघा भरावा । श्रीरामदास्यें '** या त्यांच्या वचनावरून ही गोष्ट स्पष्ट होते. क्रांतिकारक **रामदासांनीं गृहस्थाश्रमाची योग्यता** फार मोठी मानलेली आहे. स्वतः ब्रह्म-

चारी असूनहा त्यांनीं प्रपंच नेटका करावा, असा सर्वांस उपदेश केला.

अधिकार तैसा करूं उपदेश।
साहे ओझें त्यास तेंचि देऊं ॥

असें त्यांचें धोरण होतें. अधिकार पाहून—

देवाच्या सख्यत्वासाठीं।
पडाव्या जिवलगांसीं तुटी।
सर्व अर्पावें शेवटीं।
प्राण तोही वेंचावा ॥

असा उपदेश आपल्या शिष्यांना करण्यास त्यांनीं मागेंपुढें पाहिलें नाहीं.

हल्लींप्रमाणें तेव्हांही देशांत नास्तिकतेचा उद्भव झालेला होता. "उपासनेचा आश्रयो। उपासनेवीण निराश्रयो। उदंड केलें तरी जयो। प्राप्त नाहीं ॥" असा उपदेश राष्ट्राला करून, प्रत्येक चळवळीला भगवंताचें अधिष्ठान पाहिजे, हें तत्त्व लोकांच्या मनावर बिंबविण्याचा त्यांनीं यत्न केला. ना. गोखले यांच्या भाषेंत बोलावयाचें म्हणजे त्यांनीं Politics spiritualise केलें. नवविधा भक्ति, म्हणजेच विधायक कार्यक्रम, म्हणजेच उपासना. याचा आश्रय केल्याखेरीज देशांत सामर्थ्य उत्पन्न होणें शक्य नाहीं व सामर्थ्याशिवाय जय नाहीं हें त्यांचें आद्यतत्त्व होतें. 'समर्थाची नाहीं पाठी। तयास भलताच कुटी। यासाठीं उठाउठी। भजन करावें ॥' या त्यांच्या उपदेशांतील रहस्य तरी हेंच आहे. मात्र भजन शब्दाचा रामदासांचा अर्थ फारच व्यापक होता, हें केव्हांही विसरतां कामा नये. त्यांच्या दृष्टीनें भजन म्हणजे टाळ हातांत घेऊन, अर्थ न समजतां, घसा फुटेल एवढ्या मोठ्या आवाजानें चार अभंग म्हणत म्हणत त्या टाळांचा कीस पाडणें असा अर्थ नव्हता; किंवा घटपटादि शब्द अगर ब्रह्म आणि मायाविषयक वाद ह्यांच्या तडाख्यांत सांपडून कालापव्यय करणें म्हणजे भजन, अगर उपासना हें मतही त्यांस मान्य नव्हतें.

भजन म्हणजे कर्मयोग. जळजळीत कर्तव्यपालन हा त्यांचा अर्थ होता. त्यांच्या भजनांत लोकजागृति, बलसंवर्धन, बजरंगबलीची उपासना, शारीरिक, बौद्धिक व आत्मिक सामर्थ्य, धर्मशाळा, देवळें, पाणपोया वगैरेसारख्या लोकोपयोगी संस्था स्थापन करून अठरा कारखाने काढून देशाच्या आर्थिक संपत्तीचें

संवर्धन व सरतेशेवटीं जनताजनार्दनाच्या पायावर सर्वस्वाचें अर्पण करणारें आत्मनिवेदन इत्यादि हरएक प्रकारच्या गोष्टी येतात. या विवेचनावरून आमच्या मतें **रामदासांनीं** प्रत्येक बाबतीमध्यें राष्ट्राच्या विचारांत व आचारांत क्रांति घडवून आणली ही गोष्ट सहज सिद्ध होऊं शकते. आजच्या मनूंत **महात्मा गांधीही** तेंच कार्य करीत आहेत. विधायक कार्यक्रमापैकीं ज्याला जो झेपेल तो भाग त्यानें पार पाडण्याचा प्रयत्न करावा म्हणजे भविष्यकाळीं मिळणाऱ्या स्वराज्याबद्दल राष्ट्रांतील प्रत्येक व्यक्तीस आपलेपणा वाटेल व त्या मानानें स्वराज्यप्राप्तीचें कार्यही सुलभ होईल, हें **महात्माजींचें** म्हणणें आहे. या दृष्टीनें **रामदास व गांधी** हे दोघेही क्रांतिकारकच ठरतात.

---

## पुष्प एकोणिसावें

# —इंडो-ब्रिटिश साम्राज्य—

( पुणें—१।२।३१. )

जें स्वराज्य आज आपल्याला देऊं करण्यांत येत आहे तें **अस्सल आहे कां नकली** आहे याची आपण डोळ्यांत तेल घालून तपासणी केली पाहिजे. या स्वराज्यानें हिंदुस्थानांतील सर्व लोकांच्या पोटापाण्याचा प्रश्न सुटला पाहिजे, ही पहिली कसोटी. पण नुसता पोटापाण्याचा प्रश्न सुटल्यानेंच हिंदुस्थानाचें समाधान होणार नाहीं. पोटापाण्याचा प्रश्न जितका महत्त्वाचा आहे तितकाच किंबहुना त्याहीपेक्षां जास्त हिंदी अब्रूचा प्रश्न महत्त्वाचा आहे. शांतता आम्हांलाही पाहिजे आहे. पण ती स्मशानांतील शांतता असतां उपयोगाची नाहीं. **आमची इज्जत कायम राहून मिळालेली शांतता** आम्हांस पाहिजे आहे.

पाश्चिमात्य साम्राज्याच्या इतिहासाचें सूक्ष्म परीक्षण केल्यास प्रत्येकाच्या पाठीमागें एक प्रकारच्या अहंकारयुक्त महत्त्वाकांक्षेचें अस्तित्व असलेलें आपणांस आढळून येतें. उलटपक्षीं पौर्वात्य तत्त्वज्ञानाची मध्यवर्ति कल्पना अहंकाराच्या

वाऱ्यापासून व्यक्तिमात्रानें अलिप्त असलें पाहिजे अशी आहे. आमच्या साधुसंतांच्या उपदेशाचें हेंच रहस्य आहे. 'अशा अहंकाराच्या वाऱ्याचा स्वतःस स्पर्श होऊं देऊं नका; हिंदुस्थानला न्यायानें वागवा; त्याच्या न्याय्य हक्कांचा त्याला उपभोग घेऊं द्या' वगैरे प्रकारचा उपदेश प. पू. **दादाभाई नौरोजी, गोखले, रानडे, टिळक,** वगैरे हिंदी देशभक्तांनीं ब्रिटिश मुत्सद्द्यांस केला. पूर्व आणि पश्चिम या दोहींसही परस्परांची गरज आहे, ही गोष्ट आम्ही जाणतों व तुम्हींही ती गोष्ट विसरतां कामा नये, असें त्यांनीं त्यांस बजाविलें. एकाच आर्यवंशांतले वडील व धाकटे भाऊ हजारों वर्षांनीं हिंदुस्थानमध्यें एकत्र आणण्यामध्यें कांहींतरी **परमेश्वरी सूत्र** असलें पाहिजे, ही गोष्ट लक्षांत घेऊन आम्ही ब्रिटिश साम्राज्यांत समानतेच्या नात्यानें राहण्यास तयार आहोंत, असेंही त्यांनीं त्यांस स्पष्ट सांगितलें. हा समानतेचा दर्जा कबूल करून त्याप्रमाणें वर्तन करण्याच्या बाबतींत **कॉंग्रेसनें १ जानेवारी १९३० ची इंग्लंडला मुदत घातली.** दीडशें वर्षेपर्यंत नोकरशाहीच्या राज्यपद्धतीनें हिंदुस्थानचें हरएक बाबतींत अपरंपार नुकसान केलें. शस्त्रें काढून घेतलीं. सुशिक्षित व अशिक्षित लोक नामर्द बनले. त्यांची पूर्वपरंपरा सुटली. व्यापारी ठार झाला. या सर्व गोष्टींकडे कानाडोळा करून १ जानेवारी १९३० च्या आंत इंग्लंडनें हिंदुस्थानला न्यायानें व अब्रूनें वागविलें तरच हिंदुस्थान ब्रिटिश साम्राज्यांत रहावयास तयार आहे, असें **महात्मा गांधींनीं** इंग्लिश मुत्सद्द्यांना कळविलें. पण उपयोग झाला नाहीं.

यापुढें हिंदुस्थाननें नवीन कल्पना व नवीन महत्त्वाकांक्षा डोळ्यांपुढें ठेविली पाहिजे. **सीझरनें** ज्याप्रमाणें रुबिकॉन नदी ओलांडून आपल्या नशिबाचा एकदांचा कायमचा सोक्षमोक्ष करून घेण्याचें ठरविलें, तद्वतच हिंदुस्थाननें तारीख १ जानेवारी १९३० या मुदतीच्या रुबिकॉन नदीच्या पार होतांच कॉंग्रेसनें स्वातंत्र्याचें ध्येय पुकारलें. **महात्मा गांधींची साबरमतीपासून दांडीपर्यंतची यात्रा सुरू झाली.** या यात्रेचा शेवट आज ना उद्यां हिंदुस्थानला श्रेष्ठ पदवीला पोंचविण्यानेंच होणार आहे, यांत तिळमात्रही शंका नाहीं.

हें सहकार्याचें युग आहे, हें आम्ही ओळखितों. हें तत्त्व लक्षांत बाळगून अजूनही आम्ही गेल्या १५० वर्षांचा संबंध लक्षांत घेऊन इंग्लंडशीं सह-

कार्य करावयास तयार होऊं. मात्र या सहकार्याची भूमिका निराळी असेल. यापुढें इंग्लंडला **हिंदुस्थानचें** सहकार्य जरूरीचें वाटत असेल तर **इण्डो-ब्रिटिश साम्राज्य** अस्तित्वांत आणूनच तें मिळेल. हिंदी लोकांनीं आज-पर्यंत साम्राज्यें स्थापन केलीं आहेत व चालवूनही दाखविलीं आहेत. हल्लींच्या अवनत स्थितींतही हिंदुस्थानांत **रविंद्रनाथ टागोर, जगदीशचंद्र बोस, पी. सी. रॉय, महात्मा गांधी, प्रो. रामन्** वगैरेसारख्या विभूति निर्माण होऊं शकतात. हिंदी शिपायांनीं **इप्रेसच्या** रणांगणावर आपलें रक्त सांडन बादशहांच्या गादीचें रक्षण केलें, ही गोष्ट हिंदुस्थान अजून विसरला नाहीं. अशा स्थितींत काळ्यागोऱ्यांच्या साम्राज्याची कल्पना जर इंग्लंडला मान्य असली तरच भविष्यकाळांत दोघांचें सहकार्य संभवेल. या साम्राज्याचे **स्वतंत्र हिंदुस्थान, दक्षिण आफ्रिका, ऑस्ट्रेलिया, कानडा व आयर्लंडसह ग्रेट ब्रिटन** हे समान दर्जाचे घटक असले पाहिजेत. या सर्व घटकांचें मिळून **एक पार्लमेंट** असलें पाहिजे. या पार्लमेंटच्या अध्यक्षपदाचा मान या घटकांपैकीं प्रत्येक घटकाच्या प्रमुखाला आळीपाळीनें मिळाला पाहिजे. या पार्लमेंटांत हिंदुस्थानची लोकसंख्या व उच्च संस्कृति या दोन गोष्टी लक्षांत घेऊन त्या प्रमाणांत प्रातिनिधित्वाचे हक्क मिळाले पाहिजेत. या पार्लमेंटाची बैठक प्रत्येक घटकाच्या राजधानींत आळीपाळीनें झाल्यास **हिंदुस्थान** त्या गोष्टीला कबूल होईल. साम्राज्यविषयक प्रश्नांचाच फक्त या पार्लमेंटांत विचार होईल. प्रत्येक घटकाला अंतर्गत बाबतींत पूर्ण स्वातंत्र्य असलें पाहिजे. इंग्लिश मनुष्याला हिंदुस्थानचा व्हाइसरॉय होण्याचा हक्क पाहिजे असेल तर हिंदी मनुष्याला सुद्धां इंग्लंडचा मुख्य प्रधान नेमला जाण्याचा हक्क मिळाला पाहिजे.

तात्पर्य—**इंग्लंडसारख्या** टीचभर देशानें यापुढें **हिंदुस्थानांतील** ३५ कोटि लोकांवर वर्चस्व चालविणें शक्य असतां कामा नये.

ही योजना वाचून कित्येकांना हंसूं आवरणार नाहीं. आपण अशांची कींवच केली पाहिजे. गेल्या ८ महिन्यांत **हिंदुस्थानांत** अभूतपूर्व अशी चळवळ होईल, अशी फारच थोड्यांना कल्पना होती. कालाच्या उदरांतील गुप्त गोष्टी नेहमींच अतर्क्य असतात. कोणचीही अद्भुत गोष्ट प्रथम विचार-सृष्टींत जन्म पावते. नंतर तिचा उच्चार होतो व नंतर ती प्रत्यक्ष सृष्टींत दिसूं

लागते. या नियमानुसार आम्हीं **इण्डो-ब्रिटिश साम्राज्याची** योजना आज लोकांचेपुढें मांडलेली आहे. ही योजना आज नाहीं उद्यां मान्य केल्याशिवाय **इंग्लंडला** तरणोपाय असणार नाहीं. त्यानें ती मान्य न केल्यास हिंदुस्थानाला **स्वतंत्र हिंदी साम्राज्य** स्थापन करून योग्य वाटल्यास **लीग ऑफ नेशन्सचा** एक घटक होणें हाच एक मार्ग राहील.

---

## पुष्प विसावें

# नंगा फकीर

( स्वावलंबन— १।१।१९२६. )

निर्वाहापुरतें अन्नआच्छादन ।
आश्रमासी स्थान कोपीगुहा ॥ —श्रीतुकाराम.

या जगांत अन्न व वस्त्र या दोन गोष्टी अग्रगण्य मानल्या गेल्या आहेत. वेळेला दोन घांस तरी पोटांत गेलेच पाहिजेत. तद्वतच दोन हात चिंधी तरी मनुष्यास स्वतःभोंवतीं वेढून घ्यावी लागते. एक वेळ मनुष्य महिना महिना उपाशी राहील, पण क्षणभरही वस्त्रावांचून त्याच्यानें रहावणार नाहीं.

रूपयौवनादि गुणांनीं मंडित अशा युवतीच्या प्रशस्त भालपट्टावर सौभाग्य-तिलक नसला तर तिचे सर्व गुण मातीमोल होऊन जातात. **भरतभूमीची** आज अशीच स्थिति झालेली आहे. ग्रहदशेनें तिच्या स्वातंत्र्याचा कुंकुमतिलक पुसून टाकला आहे. जगाच्या व्यवहारांत तिला काडीचाही मान नाहीं. या दुःसह स्थितींतून ती कशी बाहेर पडणार? उत्तर एकच. स्वातंत्र्यरवि उदयाचलावर येऊन पूर्ववत् तळपावयास हवा असेल तर कालचक्राच्या सनातन सिद्धांतानुसार मातृभूच्या प्रत्येक आर्यपुत्रानें हल्लीं स्वातंत्र्य-देवतेची विधिपूर्वक उपासना करणें जरूर आहे. यज्ञाशिवाय ही देवी आजपर्यंत कोणासही प्रसन्न झाली आहे काय? इतिहासाला हा प्रश्न कराच. पहा काय उत्तर मिळतें तें! वेदकालीन राष्ट्रांचा इतिहास घ्या,

पुराणयुगांतील राष्ट्रांचीं दप्तरें तपासा अगर अर्वाचीन इतिहासाचीं पानें चाळा. एकच एक ध्वनि तुमच्या कर्णरंध्रांत दुमदुमून राहील व तुम्हांस सांगेल कीं, **बाबांनो ! मातृभूमीच्या स्थंडिलावर स्वतःचें बलिदान केल्या-शिवाय स्वातंत्र्याचा लाल हातीं लागणें अशक्य !**

स्वातंत्र्याची उपासना व पोषाखाचा काय संबंध ? वरवर प्रश्न ठीक दिसतो. जरा खोल विचार करा; त्यांतील फोलपणा लक्षांत येईल. निर-निराळ्या युगांचा निरनिराळा युगधर्म असतो. स्वातंत्र्याच्या उपासनेंत सत-राव्या शतकांत उपयोगी पडलेली सामग्री आज उपयोगी पडेलच असें नाहीं. त्या वेळची परिस्थिती निराळी; आजची निराळी. युद्धांत यशापयश शस्त्राच्या निवडणुकीवर अवलंबून असतें. फत्तरयुगीन शस्त्रांचा पराभव पोलादी सम-शेरीनें केला. तलवारीला बंदुकीनें चीत केलें. बंदुकतोफांना आज विमान नेस्तनाबूद करूं पहात आहे. दरिद्री हिंदुस्थानचा निभाव येथें कसा लागणार ? बिचाऱ्याजवळ तलवार नाहीं तर बंदूक कोठची ? विमानाची गोष्टच कशाला ? पण स्वातंत्र्यसंपादनाची जबर इच्छा ! बंदुकभाल्यांशिवाय ही गोष्ट कशी होणार ?

परमात्म्याची लीला अगाध आहे ! गीतेंतील अभिवचन फुकट कसें जाईल ? निराधार भक्ताची उपेक्षा अजून झालेली नाहीं. योग्य काळीं योग्य मनुष्य ईश्वरी संदेश घेऊन भूतलावर अवतीर्ण झालेला आहे. भगवंता-च्या कृपाकक्षेंतून **आर्यावर्त** वगळला जाणें त्रिवार अशक्य !

सत्तावन सालचें स्वातंत्र्ययुद्ध होऊन वीसपंचवीस वर्षें झालीं. दोन गोष्टी घडून आल्या. स्वराज्याच्या हक्कासाठीं राष्ट्रीय सभेच्या द्वारें सनदशीर ( ! ) चळवळीस प्रारंभ झाला. तत्पूर्वीं कांहीं वर्षें स्वदेशी चळवळ सुरू झाली. अर्ज, विनंत्या, सभा, लेख, डेप्युटेशनादि परावलंबी उद्योगाचें पहिल्या चळ-वळीस अधिष्ठान; स्वदेशीची चळवळ स्वावलंबनाच्या भक्कम पायावर उभार-लेली. पहिली दुसरीपेक्षां जास्त सुखाची व जास्त आरामशीर. अर्थात् प्रमुख पुढाऱ्यांनीं तिचाच स्वीकार केला; दुसरीकडे फारसें लक्ष दिलें नाहीं. कित्येक बडया पुढाऱ्यांनीं तर तिचा उपहासही केला. कोणत्याही खऱ्या सन-देचें बूड नसलेल्या नामधारी सनदशीर चळवळीचा फोलपणा **शास्त्रीबुवा व लोकमान्य** यांच्या नजरेस आला. वंगभंगाच्या शुभ मुहूर्तावर **महाराष्ट्र-**

केसरीनें स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण व स्वराज्य या चतुःसूत्रीचें शिंग फुंकून हिंदुस्थान त्याच्या प्रचंड निनादानें दुमदुमून टाकला; परावलंबी उद्योगाचा त्याग करून स्वावलंबी पराक्रमाची महत्त्वाकांक्षा धरण्याबद्दल राष्ट्रीय सभेस आव्हान केलें. पाठोपाठ म. गांधी यांचा तारा दृग्गोचर झाला. त्यांनीं स्वावलंबनाचा हा दिव्य संदेश शतगुणित जोरानें जनतेस समजावून सांगून स्वराज्यसंस्थापनेचें कार्य प्रत्यक्ष सृष्टींत आणून सोडलें. धनचक्कर भारतीय युद्धापूर्वीं पांडवांनीं उद्योगपर्वास सुरुवात करितांना उत्तर गोग्रहण-समयींच्या चकमकीद्वारां कौरवांस स्वतःच्या दैवी शक्तीची चुणूक दाखविली. निःशस्त्र अतएव दुबळ्या मानलेल्या प्रजेनें महात्माजींच्या तिरंगी झेंड्या-खालीं असहकाराच्या रूपानें नोकरशाहीपुढें किंचित्काल दिव्य तेजाचें प्रद-र्शन करून आधुनिक उद्योगपर्वास प्रारंभ केला. खरें युद्ध अजून पुढेंच आहे.

सारांश, स्वातंत्र्य व स्वदेशी यांचा साध्य व साधन या रूपांनीं अत्यंत निकटचा संबंध आहे. भरतखंड अन्नवस्त्रादिकांचे बाबतींत स्वतंत्र झाल्या-खेरीज स्वराज्य, वंध्येस पुत्र होण्याइतकें अशक्य आहे.

मनुष्य अनुभवानें शहाणा होतो. जुन्यापुराण्या स्वदेशीची कल्पना व आजच्या स्वदेशीची कल्पना यांत महदंतर पडलें आहे. देशी गिरण्यांचा माल वापरणें म्हणजे स्वदेशी ही पुराणी कल्पना. हातसुताची, हातविणीची खादी वापरणें म्हणजे स्वदेशी, ही आजची कल्पना. पूर्वीं विलक्षण स्वार्थ-त्याग करून लोकांनीं गिरण्यांचें कापड वापरलें. गिरणीवाल्यांनीं कल्पने-बाहेर नफा मारला; चैनीच्या विलायती वस्तु खरेदी करण्यांत तो खर्च झाला. या नाहीं त्या मार्गानें जनतेचा पैसा साहेबाच्या खिशांत जावयाचा तो गेलाच. पुढारी आज अनुभवानें शहाणे झाले आहेत. खादीचें महत्त्व त्यांना पटलें आहे. विचारक्रांति घडून आलेली आहे. ही लाट खेडवळांच्या खोंपटांपर्यंत फैलावणें जरूर आहे. हेंच आधुनिक भारतांतील उद्योगपर्व. हें पर्व यशस्वी रीतीनें लिहिलें गेल्याशिवाय स्वराज्यसंस्थापनेचें अनत्याचारी युद्धपर्व शक्य कोटींत येणें दुरापास्त. हें पर्व यशस्वी करून दाखविण्याची जबाबदारी ज्यांच्याकडे अखिल जनता पुढारी या दृष्टीनें पहाते त्या पांढरपेशा वर्गाकडे येते. आजपर्यंत जनता साधेपणानें व काटकसरीनें रहात आली आहे. गेल्या १०।१५ वर्षांत मात्र सुशिक्षित बांधवांचे पोषाख

व इतर चालीरीति यांचे बाबतींत अनुकरण करण्याची त्यांस इच्छा होऊं लागली आहे. ही राष्ट्रावर एक फारच मोठी आपत्ति नाहीं काय?

पौर्वात्य व पाश्चिमात्य या दोन संस्कृतींमध्यें फरक कोणता असेल तर तो हा कीं, पौर्वात्यांनीं नटणें मुरडणें याला केव्हांही महत्त्व दिलें नाहीं. त्यांची दृष्टि बहिर्मुख नसून अंतर्मुख आहे. **साधेपणानें राहून जगाच्या योगक्षेमाची चिंता वाहणाऱ्या द्विजाचा सत्कार करण्यास सार्वभौमाचें अर्धें सिंहासन सदैव तयार असे.** पूर्वेनें बाह्य डामडौल व पोषाखी मोठेपणा यांस केव्हांही मान्यता दिली नाहीं. सुशिक्षित वर्ग जोंपर्यंत पूर्वजांचें अनुकरण करण्यांतच धन्यता मानीत होता तोंपर्यंत त्याचेकडे जनता आदरयुक्त अंतःकरणानें पहात आली आहे. दुर्दैवानें हा मनु पालटलेला आहे. सुशिक्षित वर्गच चालीरीति, पोषाख व रोजची राहणी यांचे बाबतींत पाश्चिमात्यांना अग्रपूजेचा मान देऊं लागला. अशिक्षितांसही तसेंच करण्याची इच्छा होऊं लागल्यास नवल तें काय? अशा प्रसंगीं पांढरपेशांनीं वेळींच सावध होऊन जनतेस योग्य उदाहरण घालून दिलें पाहिजे.

पोषाखादिकांत उधळपट्टीचें धोरण ठेवणें केव्हांही वाईटच. हल्लींच्या बिकट परिस्थितींत तर ती गोष्ट केव्हांही क्षम्य नाहीं. हिंदु विश्वविद्यालयाचे उद्घाटनसमारंभाचे वेळीं राजेरजवाडे नटूनसजून आले होते. त्यांपुढें **म. गांधींनीं** हाच प्रश्न टाकला. प्रजेचें पुत्रवत् पालन करणें तुमचें आद्य कर्तव्य. ती दिवसानुदिवस अज्ञान व दारिद्र्यांत रुतत चाललेली. अशा वेळीं नंदीबैलाप्रमाणें नटून जगापुढें मिरविणें तुम्हांस शोभतें काय? हा त्यांचा रोकडा सवाल होता. अर्धवस्त्र परिधान करून आज तरी हाच सवाल त्यांनीं राष्ट्रापुढें टाकला आहे.

महाराष्ट्रांतील सुशिक्षित म्हणविणारांस नम्रपणानें आम्ही आज असें विचारतों कीं, आपण **महात्माजींच्या** या आचरणापासून योग्य तो बोध घेणार कीं नाहीं? कांहीं तरी विक्षिप्तपणा म्हणून अर्धवस्त्रानिशीं तो गृहस्थ आज वणवण फिरत आहे असें आमची मनोदेवता आम्हांस सांगत नाहीं. मजबारख्या रोगानें पोखरलेल्या मनुष्यासही अशा रीतीनें रहाण्याची परवानगी देण्याइतकें आपल्या देशांतील हवापाणी क्षमाशील आहे; इतरांनीं

हेंच तत्त्व टोकळमानानें आचरणांत आणल्यास अनर्थ ओढवेल असें नाहीं, हेंच सुचविण्याखेरीज त्यांचा दुसरा कोणचा हेतु असणार ?

आमचें म्हणणें थोडक्यांत असें—देश परतंत्र झाला आहे. तो स्वतंत्र झाला पाहिजे. शस्त्रांचे साहाय्यानें ही गोष्ट होणें शक्य दिसत नाहीं. ऐक्य, संघटना व काटकसर यांचे जोरावर स्वातंत्र्य मिळविणें कठोण नाहीं. अंधानुकरणामुळें कोट्यवधि रुपयांची पोपाखाचे बाबतींतील उधळपट्टी बंद केली पाहिजे. ७५।८० कोटींचें परदेशी कापड देशांत येतें. सर्वांची पैदास गिरण्यांच्यानें होणें कठीण. सुताची अडचण आहे. कोष्टी लागतील तितके आहेत. रोज अर्धा तास सूत काढून ही सुताची अडचण भरून काढली पाहिजे.

पोषाखाचे बाबतींतील सूचना येणेंप्रमाणें—महात्माजींप्रमाणें प्रत्येकानें अर्धवस्त्र गुंढाळून फिरावें असें आम्ही म्हणत नाहीं. प्रत्येक धडधाकट मनुष्यास **वर्षाचे काठीं तीन चार सद्रे, चार पंचे अगर अर्ध्या विजारी, चार टोप्या** अगर **दोन फेटे व दोन पिशव्या इतकीं** वस्त्रें ( पंचाखेरीज सर्व वस्त्रें रंगीत खादीचीं )–आपद्धर्म या दृष्टीनें विचार केल्यास–पुरीं आहेत. या सर्वांस मिळून १५ ते १८ रुपयांपेक्षां जास्त खर्च पडत नाहीं. हल्लीं सामान्यतः प्रत्येक मनुष्य कपड्यांत सालीना ( चार सद्रे, चार कोट, एक टोपी, दोन धोतरजोड्या मिळून ) २५ ते ३० रुपये कमींत कमी खर्च करतो. आमच्या सूचनेप्रमाणें बागल्यास शुद्ध पवित्र खादी वापरल्याचें श्रेय मिळून शिवाय प्रत्येकाचे सालीना १०।१५ रुपये वांचतील. स्त्रियांनीं रेशमी खण व लुगडीं वापरण्याऐवजी खादीचीं पातळें व चोळ्या वापराव्यात. चुलीची आराधना व गप्पाष्टकें यांत जरा कमी वेळ खर्च केल्यास त्यांस बरीच फुरसत मिळण्याचा संभव आहे. थोडीशी मेहनत केल्यास स्वतःच्या वस्त्रास लागणारें बारीक व मजबूत सूत कांतणें त्यांस मुळींच अवघड नाहीं. अन्नाचे बाबतींत चुलीचें जितकें महत्त्व तितकेंच वस्त्रांचे बाबतींत चरख्याचें आहे. आम्हीं वर केलेल्या या सूचना कांहींशा क्रांतिकारक आहेत, हें आम्हांस कबूल आहे. पण स्वातंत्र्य ही गोष्ट परसांतील भाजी नाहीं. इतकीही किंमत देण्यास आमची तयारी नसेल तर तोंडची वाफ कां दवडावी ? आमची ही किमान मागणी आहे. येवढीही पुरवतां आली नाहीं तर फुकटच्या लांब लांब बाता मारूं नयेत.

वंदे मातरम् ।

# थोडेसें आत्मनिवेदन

सन १९०९ ते १९३१ पर्यंतच्या २२ वर्षांत या नाहीं त्या मार्गानें दरिद्रनारायणाची सेवा केली. अंतःकरणांतील सद्बुद्धि लक्षांत घेऊन नारायणानें ती मान्य केली. हातून कांहीं चुकाही झाल्या; अनुभव आले; पुढील मार्ग कायम होण्यास मदत झाली.

**स्वावलंबी ग्रामसंघटना** हें ध्येय पुढें ठेवून उर्वरित आयुष्य त्याच **नारायणाचे** सेवेंत खर्चावें व त्याला **याच देहीं, याच डोळां लक्ष्मीनारायणाचे** स्वरूपांत पहावें ही इच्छा.

**उपरिनिर्दिष्ट कार्याचे तीन टप्पेः** (१) प्रारंभीं कमींत कमी सहा महिने **पुण्यापासून** २० मैलांच्या आंतबाहेर एक मध्यवर्ती गांव निवडून तेथें सुमारें ५० स्वयंसेवकांसह दरमहा १५ दिवस मुक्काम करणें व १५ दिवस पुण्यांत कार्य करणें. या सहामाहींत स्वयंसेवकांना ग्रामसंघटनेच्या नानाविध अंगोपांगांचें सप्रयोग शिक्षण देणें. (२) सहामाहीनंतर प्रत्येकीं चार प्रमाणें या स्वयंसेवकांची भोवतालच्या १०-१२ गांवांत प्रतिष्ठापना करणें व वस्त्रस्वावलंबनाच्या पायावर त्यांचेकरवीं तेथें कार्य सुरू करून फिरतें राहून त्यांचेवर एकसारखी देखरेख ठेवणें. (३) वस्त्रस्वावलंबनाचे बाबतींत या १०-१२ गांवांत पूर्ण यश मिळून तीं गांवें ग्रामसंघटनेसाठीं लागणाऱ्या खर्चाचे बाबतींत सर्वस्वीं स्वावलंबी होणें व तेथें पंचाईत, रात्रीची शाळा, सहकारी पेढी, सहकारी दूकान ... दवाखाना, शेती-सुधारणा वगैरे गोष्टी ... यासाठीं कमींत कमी ३ वर्षे लागतील. नंतर ... तुंगभद्रा व पूर्वपश्चिम समुद्र यांमधील महन्मा... करण्यासाठीं हजारों कार्यकर्ते शिक्षण देऊन तयार करणें हें कार्य रहातें. त्यासाठीं नदीकांठीं एक उत्कृष्ठ जागा पाहून तेथें **ग्रामसंघटना-महाविद्यालय** स्थापन करणें व त्याचेच शेजारीं एक आदर्श-नमुनेदार-असें खेडेगांव वसविणें ही गोष्ट करावी लागेल. त्याबद्दलची तपशीलवार हकीगत '**स्वावलंबी ग्रामसंघटना**' या ता. १ जुलैला प्रसिद्ध होणाऱ्या याच मालेंतील दुसऱ्या पुस्तकांत पहावी.

REFBK-0004610